शनिवार । १९ जुलै १९८० एक रुपया

# माणूस

● अटलबिहारी वाजपेयी ● मधू दंडवते ● यशवंतराव चव्हाण ● लालकृष्ण अडवानी ● शंकरराव चव्हाण ● शिवराज पाटील ● रामभाऊ म्हाळगी ● समर मुकर्जी ● अंबिका सोनी ● पिलू मोदी व इतर अनेक खासदार व युवक काँग्रेसचे कार्यकर्ते यांच्या भेटीगाठींवर आधारित विशेषांक.





□ दि. ५ च्या 'माणूस'च्या अंकातील 'इंदिरा कॉंग्रेस संजयनंतरची दिशा, समस्या' हा लेख वाचून फारच आश्चर्य वाटले.

श्री. वा. दा. रानडे हे एक चांगले व्यासंगी आणि सामान्यतः संयमपूर्वक लिहिणारे अशी माझी धारणा होती; पण या लेखातील त्यांची काही विधाने वाचून मला धक्काच बसला.

'संजयचा त्यांच्यावरचा (इंदिराजींवरचा) प्रभाव एवढा जबरदस्त होता की, त्याचा सल्ला पटो वा न पटो, संजयमातेला तो मानावाच लागे!' किंवा 'अधिकाराने इंदिरा गांधी पहिल्या असतील, पण प्रत्यक्षात संजयचाच क्रम पहिला होता.' किंवा 'महत्त्वाच्या प्रश्नावर तो झटपट निर्णय घेई आणि आग्रह धरून आपल्या मातेला ते मानायला लावी आणि (वर सफाईने सारवासारव करण्यासाठी लेखक म्हणतात) पुत्रप्रेमापोटी इंदिरा गांधी ते मान्य करीत.'

इतकी आग्रही आणि निश्चित विधाने इंदिराजींच्या प्रायव्हेट सेक्रेटरीला वा त्याहूनही निकट असणाऱ्या व्यक्तीला तरी करता येतील की नाही याची मला शंकाच वाटते. उलट, इंदिराजींच्या मनाचा थांगपत्ता कधीच लागत नाही असे म्हणणारेच अनेक. असे असताना, अशी विधाने करायला पुरावा तरी कोणता मिळाला आणि कसा याचे लेखकाने थोडे तरी दिग्दर्शन केले असते तर वाचकालाही ती विधाने पडताळून पाहता आली असती.

विशेषतः जनता पक्ष सत्ताधिष्ठित झाल्यानंतर वरच्या श्रेणीतील राजकारणासकट अनेकांना इंदिरा--फोबियाने पछाडले आणि जनतेने मतपेटीद्वारा त्यांना भिरकावून दिल्यावरही तो राग हटला नाही. त्याचप्रमाणे संजय-फोबियाने पछाडलेलेही अनेक आहेत आणि म्हणूनच अनेकजण संजय-इंदिराजी या मातापुत्रांच्या परस्पर संबंधावरून अनेक तर्क आणि अनुमाने करताना आढळतात. त्यातील काही तर अशी असतात की, इंदिराजी वा संजय यांच्या सहवासात अष्टौप्रहर असणाऱ्यांनाही ती छातीठोकपणे करता येतील की नाही याची शंका वाटते.

श्री. रानडे अशांपैकीच एक आहेत असं माझं मुळीच म्हणणं नाही; पण त्यांची विधानं तर्कांच्या कसोटीला उतरणारी वाटत नाहीत.

इंदिराजी संजयचा सल्ला घेत असतील, कदाचित् मानीतही असतील; पण संजयच्या सल्ल्याचा आधार असल्याशिवाय चालू न शकण्याइतक्या स्वतः इंदिराजी लेच्यापेच्या नाहीत अशीच इतिहासाची साक्ष आहे. १९६९ च्या बंगलोर अधिवेशनात सिंडिकेटकडून कोंडी होत असल्याचे आढळल्यानंतरही मोरारजींकडून अर्थखाते काढून घेताना वा व्ही. व्ही. गिरींचा पाठपुरावा करताना काय संजय सल्ला द्यायला होता? निक्सन-किसिंजर जोडीच्या राजकीय डावपेचांवर मात करून पाकिस्तानची युद्धयंत्रणा खिळखिळी करण्याचा आपला मनसुबा तडीस नेणाऱ्या आणि एकतर्फी युद्धबंदी जाहीर करून अमेरिकेचे डाव उधळून टाकणाऱ्या आणि दुनियेला चकित करून टाकणाऱ्या इंदिराजी संजयच्या ओंजळीने पाणी पीत असतील हे कसे मानायचे? बरे, संजयला आपला राजकीय वारस अथवा भावी पंतप्रधान करायचा असाच इंदिराजींचा मानस असता तर संजयला उत्तरप्रदेशाचा मुख्य प्रधान करण्याची अनायासे चालून आलेली संधी (पक्षाची तशी एकमुखी मागणी होती) त्यांनी का गमाविली असती? स्वतः संजयच्या मनात पंतप्रधान होण्याची महत्त्वाकांक्षा असती तर निदान 'Training ground' म्हणून तरी ही आलेली संधी त्याने राबविली नसती का? आई 'नाही' म्हणाली असती तरी, रानडे म्हणतात त्या प्रमाणे, आईला ते मानायला लावणे, संजयला सहज शक्य होते. मग उत्तरप्रदेशासारख्या सर्वांत मोठ्या राज्याचे मुख्यमंत्रीपद संजयने का नाकारले? लेखकाची विचारसरणी खात्री पटण्याजोगी वाटत नाही ती म्हणूनच.

र. वि. सोमण, कल्याण

□

उत्तरप्रदेशसारख्या सर्वांत मोठ्या राज्याचे मुख्यमंत्रीपद संजयने नाकारले याचे कारण हे, की अखिल भारतीय राजकारणावर व पंतप्रधानकीवर पकड बसवण्याच्या दृष्टीने इंदिरा कॉंग्रेस पक्षाचे सरचिटणीसपद हे अधिक मोक्याचे ठिकाण होते. खालून वर क्रमाक्रमाने चढत जायला संजय गांधी हे काही एखादं भीमथडी तट्टू थोडेच होते? रोज शौक म्हणून सहा हजार रुपये किंमतीचे विमानोड्डाण करू शकणारा तो एक राजपुत्र होता आणि या राजपुत्राला उत्तरप्रदेशच्या 'ट्रेनिंग ग्राउंड'ची जरूर नव्हती. ते ग्राउंड त्याच्या पायाखाली अगोदरच आलेले होते. शिवाय 'मारुती मोटार्स' सारखा एक साधा मोटारकारखाना सर्व सवलती असतानाही ज्याला चालवता आला नाही त्याला प्रत्यक्ष दैनंदिन राज्यकारभार इतक्यात जमलाच असता अशी खात्री कदाचित् इंदिरा गांधींनाही वाटली नसावी!

'फोबिया' म्हणजे विकृत वा अकारण भीती, तिरस्कार, घृणा. अकारण-अवास्तव स्तुतीची ही स्वाभाविक प्रतिक्रिया असते. जेवढी खुषामतगिरी, लाळघोटेपणा, भाट-


## साप्ताहिक माणूस

वर्ष : विसावे
अंक : सातवा
१९ जुलै १९८०
किमत : ७५ पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४ ३४ ५९

१ अकबर मार्ग
१ सफदरजंग मार्ग
६ रायसीना मार्ग
१० अशोक मार्ग
१२ विंडसर प्लेस
६ पंडारा पार्क
३ लोदी इस्टेट
६ कृष्णमेनन मार्ग
१ रेसकोर्स मार्ग
संसद मार्ग
९ विश्वंबरदास मार्ग
२२६ नॉर्थ अ‍ॅव्हेन्यू
करौल बाग.........

# नवी दिल्ली....

## २४ जून ते १ जुलै १९८०

□ सतीश कामत



२४ जूनला संध्याकाळी सूर्यास्ताच्या सुमारास संजय गांधीच्या पार्थिवदेहावर अंत्यसंस्कार झाले आणि पाठिराख्यांचं आशास्थान व विरोधकांना आव्हान ठरू पाहणाऱ्या एका वादग्रस्त व्यक्तिमत्त्वावर अखेरचा पडदा पडला. दिल्लीचं थोडंसं विस्कटलेलं जीवन पुन्हा पूर्ववत होऊ लागलं. लांब रुंद रस्त्यांवरून डोक्यावर लाल दिवे लावलेल्या गाड्या डौलानं विहरू लागल्या आणि रस्त्याच्या कडेला पाच पैशामध्ये थंडगार पाणी देण्याचं पुण्य जोडणाऱ्या हातगाड्यांपासून मोठमोठ्या एअरकंडिशंड दुकानांपर्यंत सर्वत्र नेहमीची वर्दळ सुरू झाली. दिल्लीतला उन्हाळा जवळजवळ संपुष्टात आला होता. हवेमध्ये थोडा उष्मा जाणवत होता; पण तोदेखील माध्यान्हीच्या कडक उन्हापेक्षा ढगाळ आकाशामुळं ! छोले–भटोरा आणि कुल्फी–मलईवाल्यांचे हात पुन्हा सफाईदारपणे फिरू लागले आणि जसं काही घडलंच नाही अशा थाटात दिल्लीकर आपापल्या उद्योगांमध्ये गढून गेले.

अर्थात २३ आणि २४ तारखेलाही दिल्लीतल्या सामान्य माणसामध्ये फारसा काहीच फरक पडल्याचं जाणवलं नाही. संजयच्या अनपेक्षित मृत्यूमुळं देशातल्या कुठल्याही नागरिकाला बसावा तेवढा धक्का दिल्लीतल्या माणसालाही बसला असेल; पण त्याची तीव्रता त्यापलीकडे फारशी गेली नव्हती. त्यामुळंच ‘ शोकाकुल वातावरण ’ हे संपूर्ण दिल्ली शहराचं वैशिष्टच न बनता १, अकबर रोड ते शांतिवन या दहा किलोमीटर लांबीच्या मार्गावरील ती तात्कालिक अवस्था राहिली. दिल्लीतला रिक्षावाला किंवा टॅक्सीवालाही या सर्व भागात वाहतूक रोखल्यामुळं जास्त नाराज होता, तर इतर माणसं दुकानं, बाजारपेठा बंद असल्यामुळं चरफडत होती. नाही म्हणायला सरकारी कचेऱ्यांतले कारकून आनंदात होते; पण तेदेखील ओळीनं चार दिवस सुट्टी मिळाल्यामुळं !

□

२५ जूनला सकाळी लोकसभेचं दर्शन घेण्यासाठी बाहेर पडलो. माजी राष्ट्रपती व्ही. व्ही. गिरी यांच्या निधनामुळं आजही लोकसभेचं कामकाज होणार नव्हतंच; पण ज्या इमारतीत सबंध देशाचं भवितव्य घडतं किंवा उद्ध्वस्त होतं ती इमारत आहे तरी कशी, हे कुतूहल निश्चितच मनात होतं.

लोकसभेच्या इमारतीचं कंपाउंड म्हणजे तर मनोरंजनाचा अमोल खजाना आहे. देशात कोणकोणत्या प्रश्नांवर रान उठवण्याचे प्रयत्न होत आहेत व कोणत्या गटांकडे त्यांचं नेतृत्व आहे याचं सम्यक ज्ञान व दर्शन लोकसभा–इमारतीच्या या कंपाउंडला प्रदक्षिणा घातली तर कोणालाही सहज होऊ शकतं. वाटेल त्या विषयावरची भित्तीपत्रकं इथं परस्परांशेजारी गुण्या-गोविंदानं नांदत असतात आणि त्यातल्या विषयांवरूनच आतल्या सभागृहात गदारोळ उठत असतो. एका पोस्टरवर सामान्य माणसाला दिलासा देणारं अंदाजपत्रक

←

गिरी अधिक तेवढा फोबियाही अधिक ! रानडे यांनी आपल्या लेखात ही दोन्ही टोके टाळलेली आहेत व ‘ संजयचा वरचष्मा वाढत होता ’ हे ढळढळीत दिसणारे सत्य तेवढे त्यांनी सांगितले आहे. यातून इंदिरा गांधी ‘ लेच्यापेच्या ’ आहेत असे रानड्यांना सुचवायचे आहे, असे म्हणणे ही उगाचच शब्दांची व अर्थाची खेचाखेच आहे.

शिवाय ७१–७२ सालच्या इंदिरा गांधी आज आहेत कुठे ? ती धमक, ती धडक ८० सालात अजून तरी प्रत्ययास आलेली नाही.

नजीकच्या भविष्यकाळात त्या पुन्हा तशी धमक दाखवू शकतील का ? का इतर कुणी पुढे सरसावतील ?

सगळे चित्र धूसर बनले आहे.

हा धूसरपणा थोडा कमी करावा या उद्देशाने हा एकलेखकी, एकविषयी अंक वाचकांच्या हाती दिला आहे.

ज्यात ‘ फोबिया ’ ही नाही, भाटगिरीही नाही, असा. —सं.

सादर केल्याबद्दल संजय गांधीचंच अभिनंदन केलं होतं, तर दुसऱ्या पोस्टरवर त्याला कॉंग्रेस आयचं सरचिटणीसपद दिल्याबद्दल इंदिराजींचं! त्याच्याच शेजारी निरंकारी बाबांच्या हत्येची त्वरित चौकशीची मागणी करणारं पोस्टर होतं, तर त्यापलीकडे 'लोक-परलोक' या हिंदी चित्रपटावर बंदी न घातल्याबद्दल लोकसभेवर मोर्चा आणण्याची धमकी दिलेली होती. कोणत्या तरी प्रखर हिंदु संघटनेने 'असली चेहरा सामने आया!' अशा शीर्षकाखाली "मुस्लिमांचा खरा देश 'अरब' आहे" हे दिल्लीच्या शाही इमामांचं वक्तव्य देऊन या इमामानाही तिकडेच पाठवण्याची विनंती केलेली होती. ही सर्व पोस्टरं कुतूहलानं वाचत असतानाच एक मोठी काळी चौकट असलेल्या भित्तीपत्रकाकडे माझं लक्ष गेलं. 'शोक! शोक! महाशोक!!' भित्तीपत्रकावरची पहिली ओळ आणि त्या खालोखाल 'महान राष्ट्रीय युवानेता, गरिबोंके मसीहा, सामाजिक–आर्थिक क्रांतीके अग्रदूत...' एव्हाना हे सर्व कोणाला उद्देशून आहे हे लक्षात आलं आणि पु. लं. च्या 'तीन पैशाचा तमाशा' मधील एका चांगल्या विनोदाची आठवण झाली. नाटकातला भटजी एका मृत शेटजीचे अंत्यसंस्कार उरकून येत असतो. वाटेत त्याला एक गृहस्थ भेटतो. कुठून आला, कुठे चालला असं विचारल्यावर, भटजी कुठून आलो ते सांगतो आणि म्हणतो, 'हा मनुष्य इतका थोर होता हे आज मसणात मला समजलं!' कारण भटजीबुवा पिंड ठेवत असतानाच श्रद्धांजलीपर भाषणांची मालिका सुरू झाली होती. पुढल्या आठ दिवसात संजय गांधीच्याबाबतीतही हाच अनुभव येणार होता.

¤

संजय गांधीच्या निधनानंतर दिल्लीत झालेल्या शोकसभा म्हणजे तर एकाच व्यक्तीठायी किती गुणांची उधळण झाली होती हे दाखवण्याची अहमहमिकाच होती. दिल्ली प्रदेश इंदिरा कॉंग्रेसच्या वतीने एक शोकसभा आयोजित करण्यात आली होती. सभेला दीड–दोन हजार श्रोते असावेत. ही गर्दी पाहूनही अनेकजण आश्चर्य व्यक्त करत होते. कारण दोनच दिवसापूर्वी लाखाच्या घरात असणारा जमाव आज पाच–दहा हजाराच्या आत आला होता. यावरूनही या युवा–नेत्याच्या जनमानसातील खऱ्या स्थानाची कल्पना यायला हरकत नव्हती. इंदिरा कॉंग्रेसच्या एका कार्यकर्त्यानं मलाच विचारलं; 'अवघ्या दोन दिवसात हा बदल का घडावा?' मी म्हटलं, 'कारण उघड आहे. दोन दिवसांपूर्वी पाहण्यासारखं खूप होतं. आज पाहण्यासारखं काहीच नाही. फक्त ऐकण्यासारखं आहे आणि ते दिल्लीकरानी यापूर्वीही अनेक वेळा ऐकलं आहे!' तो चक्रावून गेला–'मेरी समझमें नही आया!' मी म्हटलं, 'असं पहा, दोन दिवसांपूर्वी संजयचा पार्थिवदेह पाहयला लोकाची गर्दी उसळली. त्याचबरोबर अशा परिस्थितीत इंदिराजी दिसतात कशा, बोलतात कशा, वागतात कशा याचंही कुतूहल सामान्य माणसाला होतंच. काही बाया–बापड्याना मनेकालाही पाहण्याची इच्छा असेल. हे सर्व त्याना यापूर्वी कधीही पाहायला मिळालं नव्हतं आणि यापुढंही कधी पाहायला मिळण्याची शक्यता नाही. कारण माणसाच्या जीवनात एकदाच घडणाऱ्या घटना दोनच; एक त्याचा जन्म आणि दुसरी त्याचा मृत्यू! शिवाय या दोन्ही गोष्टी तो स्वतः पाहू शकत नाही. त्यामुळं मग त्या दुसऱ्याच्या पाहण्यातच तो समाधान मानत असावा. संजय गांधीच्या अंत्यदर्शनाला लोटलेल्या गर्दीची कारणमीमांसा करताना हे सारे विसरून चालणार नाही!' 'हे सर्व ठीक आहे; पण ज्यांचा संजयशी कधीही, काहीही संबंध आला नव्हता ते असं धाय मोकलून रडण्याचं कारण काय?' गृहस्थ स्वतः खोल चालला होता आणि स्वत.बरोबर मलाही नेत होता. मी त्याला ॲरिस्टॉटलची catharsis ची कल्पना समजावून द्यायला लागलो; पण एकंदर प्रकरण त्याच्या आवाक्याबाहेर जायला लागलं असावं. कारण मी आवंढा गिळायला थाबल्याबरोबर 'जरा सभेच्या काही ॲरेंजमेंटस् करून येतो' असं म्हणून तो जो सटकला तो पुन्हा पुढल्या चार शोकसभामध्ये कुठंही दिसला नाही!

केंद्रीय रेल्वेमंत्री कमलापती त्रिपाठीच्या अध्यक्षतेखाली शोकसभेला सुरुवात झाली. एकामागून एक वाचावीर उभे राहू लागले आणि जगातल्या सर्व थोरथोर व्यक्तीपेक्षा संजय गांधी थोर असल्याचं सिद्ध करूनच खाली बसायला लागले. येशू ख्रिस्त, अलेक्झांडर द ग्रेट, टिपू सुलतान आणि विवेकानंद ही चार माणसं ३३ व्या वर्षी मरण पावली, संजयजीही ३३ व्याच वर्षी मरण पावले, त्या अर्थी संजयजीही त्यांच्याइतकेच थोर होते, असं केंद्रीय दळणवळणमंत्री सी. एम. स्टीफनसाहेबांनी सांगितलं, तर त्यांच्यासारखी आणखी चार नावं न आठवल्यामुळं केंद्रीय उद्योगमंत्री चंद्रजित चनाना यांनी संजयला 'क्रांतिकारी अवतारी पुरुष' असं पदवीप्रदान केलं; पण दरम्यान माहिती व नभोवाणीमंत्र्यांना थोडा अवसर मिळाला आणि त्यानी 'जग जसं बुद्ध, महात्मा गांधी व पंडित जवाहरलाल नेहरूना विसरू शकणार नाही, तसंच ते संजयजीनाही विसरणार नाही,' अशी ग्वाही दिली. शिवाय आधुनिक भारताचे ते प्रतिनिधी होते अशीही नवीन माहिती देऊन मंत्रिमहाशयानी 'संपूर्ण देशच संजयमय होऊन जाऊ द्या!' असं दमदार आवाहन केलं. अर्थात म्हणजे नेमकं काय करायचं हे मात्र त्यानी सांगितलं नाही. परराष्ट्रमंत्री पी. व्ही. नरसिंह राव यांनी 'नव्या अंदाजपत्रकाचं मुख्य श्रेय संजयजीनाच आहे' असं सांगून अर्थमंत्र्यांनी घेतलेल्या कष्टावर पार बोळा फिरवला. पुन्हा तोंड दाबून बुक्क्यांचा मार! जगातली खरोखरच थोर असणारी माणसं आधीच्याच वक्त्यानी संपवल्यामुळं ज्याची पंचाईत झाली किंवा ज्याना कोणाचं थोरपण कशात होतं हे नेमकं माहीत नव्हतं त्या सर्व वक्त्यांनी 'संजयजी राष्ट्रीय संस्था होते.' 'आदर्शांचा स्रोत होते', 'आधुनिक भारताची 'ब्लू प्रिंट होते.' 'मार्क्स व लेनिनच्या दर्जाचे होते.' (दोघंही जण थडग्यात जागच्या जागीच चुळबुळले असतील) असं काही–बाही बोलून आवरतं घेतलं. सभा संपली. गर्दी रस्त्यावर आली. दोघाचं काही तरी जोरजोरात आर्ग्युमेंट चाललं होतं. 'संजयची थोरवी गायला माझा अजिबात विरोध नाही' एकजण म्हणत होता, 'पण त्यापायी जगातल्या इतर मोठ्या व्यक्तीच्या जीवनाची आणि कर्तृत्वाची ओढाताण कशाला?' दुसरा फक्त एवढंच म्हणाला— 'तुम अभी भी बच्चे हो।'

मी संवाद ऐकत ऐकत रस्त्यावर आलो आणि स्कूटर शोधायला लागलो. दिल्ली हे गावच अजब आहे. इथलं राजकारण अजब आणि इथले नागरिकही अजब! दिल्लीत रिक्षाला कुणीही 'रिक्षा' म्हणत

नाही. 'स्कूटर' म्हणतात आता पुण्यात दहा–बारा वर्षं काढलेल्या माझ्यासारख्या माणसाला या बदलाशी सामावून घणं जरा कठीणच गेलं. कारण 'स्कूटर' म्हटलं की आपोआप कुठं तरी मालकीची भावना जागी व्हायची. इथल्या रिक्षावाल्यांचा, चुकलो, स्कूटर-वाल्यांचा भाडं घेण्याचा हिशोबही नामी आहे. पुण्यातल्या रिक्षा-वाल्यांसारखं त्यांच्याकडे 'जुने दर–नवे दर' असं काही कार्ड वगैरे नसतं. ते फक्त मीटरवर जेवढे पैसे झाले असतील त्यापेक्षा सत्तर पैसे जास्त घेतात. त्यामुळं मीटरवरचं भाडं जर तीन–चार रुपयां-पेक्षा जास्त झालं तर दिल्लीतली 'स्कूटर' पुण्यातल्या 'रिक्षा' पेक्षा निश्चितच स्वस्त पडते. कारण तुम्हाला मोटरवरच्या आकड्या-पेक्षा फक्त सत्तर पैसे जास्त द्यावे लागतात. शिवाय हिशेबाची, टेरिफ कार्डाचीही कटकट नाही !

आणखी एक अजागळ वाहन दिल्लीत पहायला मिळालं. त्याला नेमकं काय म्हणावं हे मला अजूनही कळलेलं नाही; पण त्या वाहनाचं चित्रं डोळ्यांसमोर उभं करू शकेल असं नाव मिळणंच कठीण आहे. या वाहनाचा पुढचा भाग मोटारसायकलच्या चाल-काच्या सिटापासून पुढल्या चाकापर्यंतचा मिळून बनलेला असतो आणि मागला भाग छकड्यासारखा असतो. त्यामध्ये सहा ते आठ माणसं बसू शकतात. चालवणारा मोटारसायकलवर, तर मागे गिऱ्हाइकं बाकं असलेल्या छकड्यामध्ये; पण दिल्लीत रिक्षावाले किंवा टॅक्सीवाले माणसं वाटेल तशी कोंबतात हे ऐकीव दृश्य मात्र प्रत्यक्षात फारसं कुठं पाहायला मिळालं नाही.

¤

दुपारी लोकसभेच्या इमारतीमधून बाहेर पडलो आणि समोरच उभ्या असलेल्या बसनं शांतिवनात गेलो. महात्मा गांधी व पं. जवाहरलाल नेहरू यांच्या समाध्यांचं दर्शन घेऊन व संजयची पूर्णपणे जळलेली चिता पाहून लोकसभेजवळ आलो तेव्हा पाच वाजले असतील. सहज मनात आलं, संजयचं विमान ज्या ठिकाणी पडलं ते ठिकाण तरी पाहून यावं. स्कूटरवाल्याला थांबवलं; पण त्यालाही विमान नेमकं कुठं पडलं ते माहीत नव्हतं. थोडंसं शोधत, चौकशी करतच गेलो. चाणक्यपुरी हा दिल्लीतला एक अलिशान परिसर. इथंच विश्व युवक केंद्राची भव्य इमारत आहे. एखाद्या परदेशी वकिलातीसारखी दिसणारी. या रस्त्यावरून सरळ पुढं जात राहिलं की मुख्य रस्ता डावीकडे वळतो; पण समोरच एक कच्चा रस्ता दिसतो. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना खुरटी झुडपं, तारांचं मोड-लेलं कुंपण, काही बुटकी झाडं, उजव्या बाजूला सात–आठ फूट खोल असलेला नाला. इतर नाल्यांप्रमाणेच याही नाल्याला पाणी नव्हतंच. सगळीकडे नुसतं काँग्रेस–गवत माजलेलं. काटेरी वेली आणि कुंपण तुडवत तसाच पुढं गेलो. काही गाड्या, स्कूटर्स उभ्या होत्या. बरेच लोकही त्या दिशेनं जाताना दिसत होते. माझा स्कूटरवालाही स्कूटर कडेला लावून माझ्या मागोमाग घुसला. वीस–पंचवीस फूट आत गेलो. पुढं दोऱ्या लावून रस्ता अडवला होता. दहा–पंधरा पोलीसही होते. समोरच 'रेड बर्ड'चे अवशेष दिसत होते. विमान खरोखरच सुंदर असावं. पांढऱ्या आणि लाल रंगानं रंगवलेल्या त्या विमानाचे असंख्य लहान–मोठे तुकडे इतस्ततः विखुरलेले होते. पाच–सहा तज्ज्ञ त्या तुकड्यांचं निरीक्षण करत होते. आपापसात चर्चा करत होते.


# योजनाकाकू...

चांगलं सोन्यासारखं सुवर्णा माझं नांव. पण भावजीनीं चेष्टेनं ठेवलेल्या 'योजनाकाकू' नावानेच मी ओळखली जाते छान ! खरं तर, आता मलासुद्धां तेच आवडत नांव ! जेमतेम मॅट्रिक झालेली. चारचौघींसारखीच संसाराची स्वप्ने रंगविणारी एक सामान्य स्त्री मी. स्वभाव माझा काटकसरी. पैसे सांठविण्याचा छंद. त्या छंदातूनच विचार करीत होते भविष्यकाळासाठी पैसे साठविण्याचा. योगायोग गाठ पडली सांगली बँकेची निश्चित आकार आला माझ्या कल्पनांना.

मिळकत होती बेताची. सुरू केली छोटी बचत योजना. पाठोपाठ चालू झाली रिकरींग डिपॉझिट योजना. मुदत संपताच मग घेतली फिक्सड डिपॉझिटस. आणि मासिक व्याज योजना. सवडीनें घेतली डायमंड ज्युबिली सर्टिफिकेटस. झाले काय... प्रत्येक योजनेत माझा भाग ...वाढता पैसा... वाढते व्याज.

संसार माझा सुखी झाला ह्या योजनांनी... व्यवस्थित आंखणी... नीटनेटकी रहाणी... वेळच्यावेळी पैसा उभा राहिला... मुलगा डॉक्टर झाला... मुलींची लग्ने थाटात झाली.. छोटासा कां होईना बंगला झाला...नवीन वस्तूनीं तो सजत राहिला...खर्चाला कमी पडले नाही...व्याजाचा ओघ चालू राहिला... संवय माझी बचतीची...कल्पना डोक्यांत 'चिरंतन उत्पन्न ठेव' योजनेची ...म्हातारपणासाठी गंमत पहा—उत्तेजन ह्यांचे. योजना सांगली बँकेची खोटे श्रेय मला— तरीही 'योजनाकाकू' म्हणवून घेण्यात अभिमान वाटे मला.



**लक्षांत ठेवा,**
**पैशाच्या समस्येला**
**बचती शिवाय पर्याय नाही**

आपल्या उत्कर्षातील साथीदार
**दि सांगली बँक लि.**
रजि. ऑफीस-राजवाडा चौक, सांगली
चेअरमन : एम. आर. रणदिवे

Parkerson 8253

नोंदीही घेत होते. त्यापैकी एक–दोघेजण परदेशी दिसत होते. पलीकडेच एक पिवळ्या रंगाची जुनाट दिसणारी मुतारी होती. कडुनिंबाच्या झाडाची प्रचंड फांदी जमिनीवर आडवी झालेली होती. इतर काही झाडांच्या फांद्या नुसत्याच झोडपल्या गेल्या होत्या; पण त्यावरूनही विमान किती वेगानं जमिनीत घुसलं असेल याची कल्पना येत होती. मोरारजी देसाई पंतप्रधान असताना त्यांच्या विमानाला जोरहाटजवळ झालेल्या अपघाताची आठवण झाली. देशाच्या पंतप्रधानाचे प्राण वाचले पाहिजेत या निग्रहानं विमानाचं नाक हेतुपुरस्सर जमिनीत घुसवणाऱ्या त्या पाच नरवीरांची आठवण झाली आणि मन कृतज्ञतेनं भरून आलं. 'लाख मेले तरी चालतील, लाखांचा पोशिंदा मरता कामा नये', या उक्तीचीच नव्या संदर्भात केलेली ती बेहर अंमलबजावणी होती.

संजयच्या अपघाताचं वृत्त देताना अनेक वृत्तपत्रांनी 'विमानाजवळ रक्ताचं थारोळं साचलं होतं' अशी भडक वर्णनं दिलेली होती; पण प्रत्यक्षात तसं काहीच झालेलं नव्हतं. संजयच्या मेंदूचे काही 'टीशूज' आणि तुटलेला पाय वगळता काहीही दिसत नव्हतं. दोघांनाही बसल्या जागीच जबरदस्त मार बसून रक्त साकळलं होतं. पंतप्रधानपदाची स्वप्नं पाहणाऱ्या एका युवराजाला झाडं–झुडपं आणि काटेरी कुंपण असलेल्या जागेत जुनाट मुतारीमागल्या धुळीमध्ये मृत्यू आला होता! जेम्स शर्ले या सतराव्या शतकातल्या इंग्लिश कवीनं एक कविता लिहून ठेवली आहे – Death The Leveller. या कवितेत म्हणतो—

> There is no armour against fate
> Death lays its icy hand on kings
> Sceptre and crown
> Must stumble down
> And in the dust be equal made
> With the poor crooked scythe and spade

संजयचा मृत्यू ज्या तऱ्हेनं झाला त्याचं याहून चपलख वर्णन काय होऊ शकेल!

¤

आधी दिलेला न्यायालयीन चौकशीचा आदेश शासनानं मागं घेतल्याबद्दल राजधानीत बरीच चर्चा सुरू झाली. नागरी पर्यटनाचे डायरेक्टर जनरल एअरमार्शल जे. झहीर यांनी संजयच्या बेदरकारपणे विमान चालवल्यामुळं निर्माण होणाऱ्या धोक्याची पूर्वसूचना नागरी पर्यटनमंत्रालयाला दिली होती. 'इंडियन एक्सप्रेस'नं २६ जूनच्या अंकात झहीर यांचं ते पत्र पहिल्या पानावर चौकटीत लावलं आणि विरोधी पक्षांनी लोकसभेत व राज्यसभेत लक्षवेधी सूचना मांडू देण्याची मागणी केली. लोकसभेमध्ये सूचना नोंदवून घेण्यात आली; पण चर्चेचा दिवस निश्चित करण्यात आला नाही. राज्यसभेत तेही ठरलं. शुक्रवार ता. २७ जून रोजी दुपारी १२ वाजता राज्यसभेत ही सूचना मांडण्याची परवानगी देण्यात आली.

दरम्यान न्यायालयीन चौकशी मागं घेण्याचं खरं कारण कोणतं यावर उलटसुलट चर्चा सुरू झाली. एका स्थानिक वृत्तपत्रात 'न्यायालयीन चौकशी का रद्द करण्यात आली?' या शीर्षकाखाली एक तीन कॉलमी बातमी प्रसिद्ध झाली. या बातमीत असं म्हटलं होतं की, दिल्ली फ्लाइंग क्लबचे आर्थिक गैरव्यवहार बरेच असल्यानं न्यायालयीन चौकशी सुरू झाली तर ते प्रकार बाहेर येतील अशी भीती संबंधित अधिकाऱ्यांना वाटत होती. तसंच ज्या तऱ्हेनं अपघातातल्या विमानाला 'फिटनेस सर्टिफिकेट' देण्यात आलं त्याबद्दल विरोधी राजकीय पक्षांच्या नेत्यांना शंका वाटत होती. कारण दिल्ली फ्लाइंग क्लबमध्ये अंतर्गत राजकारण आणि मारामाऱ्या बऱ्याच होत्या. शेवटी अर्जुनदास या संजयच्या विश्वासू माणसाला कोर्टामार्फत क्लबचा 'रिसिव्हर' म्हणून नेमण्यात आलं.

या दोन मुख्य प्रकारांबरोबरच आणखी एक भाग म्हणजे शुक्रवार दि. ६ जून रोजी क्लबनं तीस हजार लिटर विमानाचं तेल खरेदी केलं. इंडियन ऑइल कॉर्पोरेशनकडून हे तेल विकत घेण्यात आलं आणि क्लबच्या इमारतीच्या मागच्या बाजूला असलेल्या गॅरेजमध्ये ते ठेवलेलं होतं. हे गॅरेज विमानतळाच्या धावपट्टीपासून अवघ्या चाळीस मीटरवर क्लबच्या हँगरपासून फक्त पाच मीटर अंतरावर होतं. इतक्या धोकादायक अंतरावर विमानाचं तेल ठेवण्यासाठी दिल्ली पोलीस किंवा फायरब्रिगेडचीही परवानगी घेतलेली नव्हती. तसंच एवढ्या मोठ्या प्रमाणावर साठा करण्यासाठी आवश्यक असणारा परवानाही क्लबकडे नव्हता!

प्रत्यक्ष अपघाताचं विश्लेषण करताना काही जणांनी असंही सांगितलं की, जूनच्या सुरुवातीला क्लबनं दोन हजार लिटर पेट्रोल विकत आणलं होतं. संजय गांधीनं वापरलेल्या पिट्स्–२ मध्ये त्या दिवशी जर विमानाच्या तेलाऐवजी पेट्रोल वापरलं असेल तर त्यामुळंही विमानाला अपघात झाला असण्याची शक्यता आहे कारण विमानाच्या तेलापेक्षा पेट्रोलचा 'कोम्ब्युशन पॉइंट' जास्त असतो व त्यामुळं इंजिनच बंद पडण्याची शक्यता असते. तसंच या विमानाचा 'फ्युएल गॉज' जर काम करेनासा झाला असेल तर त्यामुळं संजयला टाकीत किती तेल आहे याचा नेमका अंदाज आला नसेल. त्यामुळं विमानात बसण्यापूर्वी जर टाकी चेक केली नसेल तर अचानक तेल संपूनही अपघात झाला असेल. या दोन्ही शक्यता व्यक्त करताना त्यांच्या पुराव्यार्थ या मंडळींनी हेही निदर्शनाला आणून दिलं की, विमान पडत असताना इंजिनाचा आवाज बंद झालेला होता.

अर्थात आता हा सगळा विषय जरतरचा भाग आणि शास्त्रज्ञांची डोकेफोड असाच झाला आहे. यामधून फारसं काहीही निष्पन्न होण्याची शक्यता नाही.

¤

२३६, नॉर्थ अॅव्हेन्यू. ठाणे मतदारसंघातून दुसऱ्यादा निवडून गेलेले भारतीय जनता पक्षाचे खासदार रामभाऊ म्हाळगी यांचं निवासस्थान. रामभाऊ मूळचे पुण्याचे. पुण्याहूनच ते आमदार म्हणून निवडून गेले होते; पण १९७७ च्या लोकसभेच्या निवडणुकीत त्यांना ठाणे मतदारसंघ देण्यात आला. गेल्या तीन वर्षांत हा नवा मतदारसंघही रामभाऊंनी इतका उत्तम बांधून काढला आहे की, १९८० च्या इंदिरा–लाटेतही

ते घट्ट उभे राहिले; पण यामुळे काही वेळा रामभाऊंची अडचण होते. एकाच वेळी पुणेकर आणि ठाणेकर हे दोघंही त्यांच्यावर हक्क सांगतात! मी रामभाऊंकडे गेलो तेव्हाही एक ठाण्याचा मनुष्य आला होताच. रामभाऊंनी त्याचं शंकानिरसन केलं आणि मग आमच्या गप्पा सुरू झाल्या. संजय गांधींच्या मृत्यूबद्दल बोलताना रामभाऊ म्हणाले –

: एका तरुणाचा अपघाती मृत्यू या दृष्टीनं संजयचा मृत्यू दुःखद आहे; पण इतके दिवस पंतप्रधानाच्या मुलाच्या छत्रीखाली वावरणारे आता ती छत्री मिटली गेल्यामुळं साफ उघडे पडतील! त्यांचे गुण-दुर्गुण अधिक स्वच्छपणे लोकांसमोर येतील.

: संजय गांधींनी जी संस्कृती राजकारणात आणण्याचा प्रयत्न केला त्याला 'कॉंग्रेस कल्चर' म्हणणं चुकीचं ठरेल. त्यांच्या या प्रयत्नाला फार तर 'राजकारणाला त्यांच्या पद्धतीनं द्यायचं ठरवलेलं वळण' असं म्हणता येईल. कारण राजकारण किंवा प्रशासन फक्त परिणामाभिमुख (result-oriented) असून चालणार नाही. भारतीय राजकारणात आम्ही साधनशुचिता मानणार की नाही? आम्हाला ती मानली पाहिजे. कारण इथली भूमी निराळी आहे. आजच्या भारतीय राजकारणात हा कटाक्ष कमी झाला आहे आणि त्याचा परिणाम जीवनाच्या सर्व क्षेत्रांवर आज होत आहे. केवळ परिणामाभिमुख राजकारणाचा परिणामही तात्कालिक, क्षणभंगुर ठरतो. तसंच दुसऱ्याला तो प्रेरणा देऊ शकत नाही.

: संजयच्या पश्चात इंदिरा कॉंग्रेसमधले जुने कार्यकर्ते कसे वागतात किंवा काय धोरण अवलंबतात हे त्या दृष्टीनं पाहणं उद्बोधक ठरेल. आज त्या पक्षातली सर्वच माणसं स्वाभिमान विकून टाकलेली आहेत असं मी म्हणणार नाही. काही जणांना इंदिराजींची तत्त्वं, धोरणं आणि कृती मनापासून पटल्यामुळं ते त्या पक्षात गेले आहेत; पण त्यांनी जर या राजकारणातल्या साधनशुचितेचं भान ठेवलं नाही तर त्या पक्षानं 'कॉंग्रेस' हे नावदेखील सोडून द्यावं!'

रामभाऊंच्या घरातून बाहेर पडलो तेव्हा अंधार होता. नॉर्थ अॅव्हेन्यू हा सगळा खासदारांचे ब्लॉक्स असलेला परिसर; पण याची रचना पुण्यातल्या लोकमान्यनगरपेक्षा फारशी वाईट नाही. लोकमान्यनगरप्रमाणेच इथल्या ब्लॉक्सनाही नंबर दिलेले आहेत आणि इथंही ७१ नंतर ७२ नंबरचा ब्लॉक समोर येईलच किंवा ८८ च्या आधी ८५, ८६, ८७ असतीलच याची हमी देता येणार नाही!

समोरच स्कूटरस्टँड दिसला. एक स्कूटर केली. सारी दिल्ली आपण अर्धा डझन वेळा तरी पालथी घातली आहे अशा आविर्भावात स्कूटरवाल्याला 'करोलबाग' म्हणून सांगितलं आणि जीव मुठीत धरून आत घुसलो. कारण दिल्लीच्या स्कूटर–टॅक्सीवाल्यांबद्दल बरंच ऐकलं होतं. त्यातून दिल्लीतले लांब–रुंद रस्ते, भव्य इमारती, वेगानं धावणारी वाहनं. नवख्या माणसाला एकाच रस्त्यावरून चार वेळा फिरवलं तरी लक्षात यायचं नाही!

¤

माजी राष्ट्रपती व्ही. व्ही. गिरी यांच्या निधनानिमित्त दुखवटा सुरू झाला होता. दिल्लीतल्या सर्व शासकीय इमारती, लोकसभा–राज्यसभांवरचे ध्वज अर्ध्यावर आले होते. अर्थात सामान्य माणसाला मात्र रेडिओवर सिनेमातली गाणी लागत नाहीत याचंच दुःख जास्त होतं. करोलबाग आज पुन्हा झगमगत होती. गुरुद्वारारोड आणि अजमल खाँ रोड या आर्यसमाज–मार्गाला छेदून जाणाऱ्या रस्त्यावरून भरपूर बाजार पसरला होता. चिनीमातीच्या भांड्यांपासून आंब्या–अननसाच्या ज्यूसपर्यंत विविध वस्तू आणि पदार्थ मांडलेले होते. गिऱ्हाइकांची वर्दळही चांगली होती. मी नुसताच फिरत होतो. कारण इथल्या बाजारात दिसणाऱ्या सर्व वस्तू मी पुण्यातल्या बाजारातही पाहिल्या होत्या. त्यामुळं त्या मुद्दाम इथून उचलून, सांभाळून पुण्यापर्यंत नेण्याचा आटापिटा महंमद तुघलकालाच शोभून दिसला असता. दिल्लीमध्ये माझं खाद्य–जीवन मात्र चांगलं समृद्ध झालं. इथले कुल्फी–मलईचे विविध प्रकार, छोले-भटोरा, ज्यूस, लस्सी यांसारखे पदार्थ पोटापेक्षा जिभेची भूक अधिक शमवायचे.

करोलबागेतच 'नॅशनल रेस्टॉरंट' या नावाचं एक चांगलं हॉटेल आहे. पुण्यातल्या 'द्वारिका' सारखं हेही हॉटेल तळघरातच



खा. रामभाऊ म्हाळगी

¤

आहे; पण स्वच्छता चांगली. जरा बऱ्यापैकी हॉटेलात असतो तसा अंधुक प्रकाश. जोडीला इंग्लिश ट्यून्स आणि त्या संपल्यानंतर 'आप जैसा कोई जिंदगी में आए...! (या गाण्यानं मात्र सध्या अगदी उच्छाद मांडला आहे.) या हॉटेलवाल्याची पदार्थाविषयीची कल्पना मात्र अजब आहे. एकदा मी टोमॅटो-ऑम्लेटची ऑर्डर देऊन काही तरी डाळीच्या पिठाचा पदार्थ समोर येईल अशी अपेक्षा करत बसलो. थोड्या वेळानं वेटर थाळी घेऊन आला. थाळीमध्ये अंडं-आम्लेट होतं. फक्त त्याची मसालाडोशासारखी घडी घातली होती, आणि त्या घडीमध्ये टोमॅटोचे काप ठेवून दिलेले होते. या मसाला डोशांवरून आठवलं. दिल्लीत एकूण दाक्षिणात्य डिशेस रद्दीच बनवतात.

¤

रात्री कॉटवर पडल्या पडल्या 'इंडिया टुडे' चा जूनच्या दुसऱ्या पंधरवड्याचा अंक वाचत होतो. नुकत्याच झालेल्या ९ राज्यांच्या विधानसभांमध्ये इंदिरा कॉंग्रेसनं मिळवलेल्या घवघवीत यशाची स्टोरी दिलेली होती. मुखपृष्ठावर मध्यभागी इंदिराजींचा धूसर चेहरा आणि त्याच्या पार्श्वभूमीवर ठळकपणे दिसणारा संजय–तामिळनाडू वगळता उरलेल्या आठ राज्यांमध्ये आसनस्थ झालेले पक्षाचे मुख्यमंत्री कव्हरच्या दोन्ही बाजूंना.

सुरुवातीलाच एस. निहाल सिंग यांचं 'अ टेस्टिंग टाइम' हे फीचर होतं. नव्या

परिस्थितीत विरोधकांना इंदिराजी आणि त्यांच्याबरोबरच वेगानं वर येत असलेल्या संजयशीही कसा मुकाबला करावा लागेल याचा इशारा त्यांनी आपल्या या लहानशा लेखात दिला होता. लेखाच्या दुसऱ्याच परिच्छेदात त्यानी म्हटलं होतं –

'आता संजयला कायदेशीर स्थान प्राप्त झालं आहे. इंदिराजीही त्याला राज्याचा मुख्यमंत्री करण्यापेक्षा पक्षाच्या दोऱ्या संजयच्या हातात देणं जास्त पसंत करताहेत. त्यामुळं पक्षाची धोरणं नीट अमलात येताहेत की नाही याची पाहणी करण्याच्या निमित्तानं तो शासनाच्या कारभारात हक्कानं ढवळाढवळ करू शकेल. इथून पुढं राजकीय निरीक्षकानी केवळ संजयच्या शासनाचा कारभार स्वत च्या हातात घेण्याच्या प्रगतीवरच लक्ष ठेवून चालणार नाही, तर त्यामधूनच हळूहळू माय–लेकामध्ये ज्या ठिणग्या उडणार त्याकडेही लक्ष ठेवणं जरूर आहे. कारण मूळ धोरणाच्या बाबतीत जरी नाही तरी अंमलबजावणीच्या पद्धतीवरून त्याच्यामध्ये संघर्ष निर्माण होणार आहे.'

आता या भविष्यवाणीचा पडताळा पाहणं शक्यच नव्हतं; पण तरीही भारतीय राजकारणात विरोधकांना जबरदस्त आव्हान देऊ पाहणाऱ्या या माणसाविषयी कोण काय बोलत–लिहीत होतं याचं कुतूहल होतंच. निहाल सिंगसाहेबानी पुढं लिहिलं होतं –

'इंदिराजी आता किमान पाच वर्षं तरी जनतेला सत्तास्थानी हव्या आहेत. त्यामुळं त्याचं केंद्रसरकार किंवा राज्यातली सरकारं उलथून पाहण्याच्या विरोधकांच्या प्रयत्नाना जनतेकडून अजिबात साथ मिळणार नाही; पण कदाचित त्यांच्या पक्षातच एक विरोधी फळी निर्माण होण्याची शक्यता आहे. ज्याची निष्ठा इंदिराजीपेक्षा संजयवर अधिक आहे ते कदाचित पक्षांतर्गत एक छोटा पक्ष निर्माण करतील आणि जर त्यामुळं इंदिराजीचे पाठिराखे असंतुष्ट झाले तर कदाचित ते पक्ष सोडण्याचीही भाषा करायला लागतील. अर्थात हे भविष्यकाळातले प्रश्न आहेत; पण कित्येकदा भविष्यकाळ वर्तमानकाळातच विरघळून जातो.'

निहाल सिंग याच्या या भीतीला निश्चितच आधार होता. कारण केंद्रीय मंत्रिमंडळातल्या काही जणाना डच्चू देऊन तिथं आपली माणसं घुसवण्याचा विचार संजयच्या मनामध्ये अलीकडेच घोळायला लागला होता अशा तऱ्हेनं डच्चू मिळणाऱ्यामध्ये चिकमंगळूरला इंदिराजीविरुद्ध जनता पक्षाच्या तिकिटावर निवडणूक लढवणाऱ्या आणि आता त्यानाच जाऊन मिळणाऱ्या महाभागाचाही नंबर लागणार होता म्हणे. कारण कोणालाही दरवाजातून आत घेण्यापूर्वी त्याची निष्ठा हा संजयचा मुख्य निकष असे म्हणून तर इंदिराजीना अटक झाल्यावर इंडियन एअरलाइन्सचं विमान पळवणाऱ्या माणसाला उत्तर प्रदेशात आमदारकी देण्यात आली आणि नंतर त्याची परतफेड म्हणून त्यानंही 'संजयजीनाच उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री करा' असा नारा पुकारला. 'हे उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्रिपदाचे घोळ जेव्हा चालू होते तेव्हा ज्या विमानतळावरून संजयनं अखेरचं उड्डाण केलं तो विमानतळ रात्रंदिवस गजबजलेला असायचा. संजयचे साथीदार व पाठिराखे लखनौ ते दिल्ली अशा सारख्या वाऱ्या करत होते आणि त्यासाठी हाच सफदरजंग विमानतळ वापरला जात होता.

¤

गुरुवारी २६ जून सकाळी पुन्हा लोकसभेच्या गोलाकार सुंदर इमारतीकडे मोर्चा वळवला. भव्य गोल खांबांच्या आधारावर उभ्या केलेल्या कमानीनी बनलेली ही गोलाकार इमारत लाबूनच अप्रतिम दिसते. शिवाय इमारतीच्या सर्व बाजूना सुरेख कापलेली लॉन्स, कारंजी आणि सरदार वल्लभभाई पटेल, बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या सबंध देश गाजवणाऱ्या व्यक्तींचे पूर्णाकृती पुतळे ! खरंच लोकसभेत चालणारं कामकाज पाहून हे दगडाचे पुतळेदेखील काही वेळ हर्षभरित होऊन उठत असतील आणि काही वेळा हताश होऊन दगडासारखे गपगार पडत असतील !

लोकसभेच्या इमारतीत प्रवेश करण्यासाठी बरीच सव्यापसव्यं करावी लागतात. मुख्य म्हणजे प्रेक्षकांच्या गॅलरीत बसायचं असेल तर एखाद्या खासदाराची ओळख असावी लागते. कारण गॅलरीत बसण्यासाठी जे पास दिले जातात त्यावर कोणा तरी खासदाराची सही लागते. म्हणजे त्यासाठी कोणीतरी खासदार ओळखीचा पाहिजे. बरं, एवढं करून जो पास मिळतो तो फक्त एकच तास चालतो. एका तासानंतर तुम्हाला बाहेर पडावं लागतं. राज्यसभेच्या बाबतीत मात्र हा नियम थोडा शिथिल आहे. इथे एकदा पास मिळाला की तुम्हाला तो संपूर्ण दिवस राज्यसभेचं कामकाज पाहाता येतं. ही दोन्हीही सभागृहं तशी पाठीला पाठ लावूनच आहेत.

गुरुवारी दोन्ही सभागृहामध्ये विमान–अपघाताची न्यायालयीन चौकशी मागं घेण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयावर गदारोळ उठेल असा अंदाज होता शासनालाही तो होताच. केंद्रीय नागरी पर्यटनमंत्री ए. पी. शर्मा यांनी एक निवेदन तयार करून आणलव होतं दोन्ही सभागृहामध्ये ते वाचवून दाखवण्यात आलं; पण तरीही विरोधी पक्षाच्या सदस्यांचं समाधान झालं नाही. त्यामुळं सभापतीनी लक्षवेधी सूचना दाखल करून घेतल्या. राज्यसभेत तर ही चर्चा उद्या दुपारी बारा वाजताच सुरू होणार होती.

¤

त्या दिवशी संध्याकाळीच खासदार प्रा. मधु दंडवते यांच्या घरी गेलो. १० अशोक रोड. हा संपूर्ण परिसरच अतिशय सुंदर आहे. भव्य रस्ते हे दिल्लीचं सर्वसामान्य वैशिष्ट्य इथंही आहेच. शिवाय जोडीला मोठमोठी आयलंड्स. एका आयलंडमध्ये सरदार वल्लभभाई पटेलांचा पूर्णाकृती पुतळा आहे. त्या पुतळ्याकडे मी जवळजवळ रोज जाता–येता पाहायचो आणि मला जीवनातील लहानपणी एक ऐकलेला प्रसंग आठवायचा. टिळक मंडालेच्या तुरुंगात असताना चिमण्यांना तादूळ वगैरे खायला घालत आणि चिमण्यादेखील टिळकांच्या अगाखाद्यावर नाचत तादूळ खात. इथं पटेलांच्या पुतळ्यावर एक पारवा नेहमी बसलेला दिसे. कधी तो त्यांच्या डोक्यावर बसलेला असायचा, कधी खांद्यावर तर कधी पायांपाशी; पण तो पुतळा काही सोडत नसे !

या परिसराचं स्वतःच्या गाड्या नसणाऱ्यांच्या दृष्टीनं तापदायक वैशिष्ट्य म्हणजे इथं स्कूटर हे वाहन मोठ्या कष्टानं आणि भाग्यात लिहिलेलं असेल तरच दृष्टीला पडतं. कित्येक वेळा दिसलं तरी रामाला फसविणाऱ्या मायावी मृगाप्रमाणं भुर्रकन

निघून जातं ! फक्त चालत राहणं एवढाच पर्याय राहतो; पण चालताना फारसे कष्ट वाटत नाहीत. कारण रस्त्याच्या दोन्ही बाजूना रुंद फूटपाथ आहेत. त्यावर उंचच उंच, सावली देणारी झाडं आहेत. शिवाय रस्त्याच्या कडेला थंड पेयाचे, पान-सिगारेटीचे स्टॉलसही आहेत. दिल्लीमध्ये पाच पैशात कुलरचं पाणी प्यायला देण्याचा धंदाही अतिशय तेजीत चालतो. इथं उकाड्यामुळं घामाच्या इतक्या धारा सतत वाहात असतात की, पंधरा-वीस मिनिटं चाललं तरी या पाच पैशाच्या पाण्याच्या ग्लासाचं मोल कोका-कोलाच्या-भारतात न मिळणाऱ्या-बाटलीएवढं वाटायला लागतं. नाथानी तडफडणाऱ्या गाढवाला पाणी पाजून जेवढं पुण्य मिळवलं असेल त्यापेक्षा किती तरी जास्त पुण्य ही मंडळी प्रत्येक ग्लासमागं पाच पैशासह मिळवत असतात !

प्रा. दंडवतेंचे घर शोधणं फारसं कठीण गेलं नाही. कारण नॉर्थ अॅव्हेन्यूमधल्या बंगल्याच्या मानान इथल्या बंगल्याची रचना अधिक सरळ आणि सुसंगत आहे. तरीही ३४ व ३६ हे बंगले रस्त्याच्या एका बाजूला आणि ३५ किंवा ३७ हे बंगले कुठे तरी समोरच्या बाजूला हा प्रकार इथही आहेच.

प्रा. दंडवते घरी आलेलेच नव्हते. प्रमिलाताई होत्या. काणी तरी पाहुणही आले होते. प्रा. दंडवतेंचा कसली तरी सल्लागार समितोची बैठक उशीरापर्यंत चालू होती. त्यामुळ ते घरी आलेले नव्हते. रात्री यायला उशीर होणार होता, त्यामुळं 'दुसऱ्या दिवशी पुन्हा येतो,' असं सांगून बाहेर पडलो. परत चालायला सुरुवात. जरा काही खावं म्हटलं तर एखाद इराण्याचं सुद्धा हॉटल या परिसरात नजरेला पडायच नाही ! चहा हा प्रकार तर दिल्लाकराना लागतच नसावा.पुण्यात गल्लोगल्ला भेटणारी 'अमृततुल्य भवन' इथं मोठमाठ रस्ते ओलांडून गेल तरी कुठही दिसत नाहीत !

## बुखारी म्हणतात ...

सध्याकाळी करोलबागत हिंडत असताना 'माया' नावाचं एक हिंदी नियतकालिक रस्त्यावर विक्रीला ठेवलेलं आढळलं. सहज उचलून घेतलं. जुलै महिन्याचा ताजा अंक होता. मुखपृष्ठावर इंदिराजींचं विचारात बुडलेलं चित्र. उजव्या कोपऱ्यात लिहिलेलं- 'चुनाव परिणाम विशेषांक' नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीमागचं काळंकुट्ट राजकारण अंकात उलगडून दाखवल्याचा दावा होता. कारण मुखपृष्ठावरच डाव्या हाताला लिहिलेलं होतं-' हिंसामें डुबे चुनाव और सरकारोंके नये गठनकी कहानी ' किंमत फक्त दोन रुपये ' लगेच अंक विकत घेतला आणि रूमवर येऊन वाचत पडलो. ज्याच्याबद्दल एवढी मोठी जाहिरात केली होती त्या विषयाचा बार अगदीच फुसका होता; पण दिल्लीच्या शाही इमामाची एक पानभरच घेतलेली मुलाखत वाचनीय होती. त्यामध्ये बुखारीसाहेब म्हणतात-

'आपण जर सत्तेवर आलो तर मुसलमान, हरिजन, अल्पसंख्याक या सर्वांचे प्रश्न प्राधान्यानं सोडवू असं इंदिराजींनी आम्हाला १९८० च्या लोकसभा निवडणुणीपूर्वी आश्वासन दिलं होतं. या गटाना नोकऱ्यांमध्ये राखीव जागा ठेवण्याच्या दृष्टीनं त्या एक आयोगही नेमणार होत्या म्हणून आम्ही त्याना पाठिंबा दिला.

'पण यातील एकही वचन सत्तेवर येऊन शभर दिवस झाले तरी इंदिराजींनी पूर्ण केलेलं नाही. त्या दिशेनं काही पावलही उचललेली नाहीत. हेमवतीनंदन बहुगुणानीही इंदिराजीना याची वारंवार आठवण करून दिली; पण त्यानी दुर्लक्षच केलं. इंदिराजी आणि आमच्यामध्ये पुन्हा दरी निर्माण व्हायला लागली व शेवटी 'मजबूर होकर हमें अलग होना पड़ा।'

'इंदिराजींचं शासन येऊन तीन-साडेतीन महिने झाले, पण या कालावधीत एकही नाव घेण्यासारखं काम झालेलं नाही. कायदा आणि सुव्यवस्था दिवसेंदिवस खालावतच आहे. आसाम उर्वरित देशापासून तुटून पडण्याच्या मार्गावर आहे. नागालँडच सरकार बरखास्त करून तिथली परिस्थिती विनाकारणच बिघडवून टाकली आहे. मणिपूर सैन्याच्या ताब्यात देऊन टाकलेलं आहे. मिझोराममध्ये लाल डेंगाबरोबर केलेला करार कृतीमध्ये उतरवलेला नाही. एकूण सर्वच आघाड्यावर हे शासन कुचकामी ठरलं आहे आणि त्यामुळं देशाच्या एकात्मतेला धोका निर्माण झाला आहे.

'आज संजय गांधींचा हस्तक्षेप सर्वत्र वाढत चालला आहे हे नाकारून चालणार नाही. कोणतीही जबाबदारी न घेता तो आपली शक्ती वापरत आहे. मी तर असं म्हणेन की संजयची ही काम करण्याची पद्धत अतिशय चुकीची आहे आणि त्यातून सबंध देशाचं नुकसान होत आहे'.

देशात आणीबाणी पुन्हा आणली जाईल का, या प्रश्नाला उत्तर देताना इमामसाहेब म्हणाले-

'इमरजेन्सीके बगैर ही जब वे सारे काम हो सकते हैं, जो इमरजेन्सीके दौरान होते रहे, तो फिर इमरजन्सी लगाने की क्या जरूरत ?'

इमामसाहेबांच्या या छोट्याशा मुलाखतीमधूनसुद्धा इंदिराजीना पाठिंबा देण्यामागील त्याचा उद्देश स्पष्ट दिसून येतो. जे मुस्लिमाच्या हिताचं रक्षण करणार असतील, त्यांच्यासाठी जास्त सोई-सवलती देणार असतील त्यांच्यामागं आपण उभं राहयचं आणि दोन-तीन महिन्यात जर ती मंडळी आपल्याला अनुकूल अशी पावलं टाकताना दिसली नाहीत तर लगेच त्यांच्यावर टीकास्त्र सोडायचं असं इमामाचं साधं सरळ गणित आहे. सौदेबाजीच्या राजकारणात आपलाही वाटा उचलण्याचा ते प्रयत्न करताहेत एवढच यातून स्पष्ट होतं. याच मुलाखतीत बहुगुणासबंधी त्याचे उद्गारही नोंद घेण्यासारखे आहेत. १९८० च्या निवडणुकीपूर्वी इंदिराजीशी हा जो करार झाला तो मुख्यत्वे बहुगुणांच्या मध्यस्थीमुळ, असं इमामसाहेबानी मुलाखतीत स्पष्ट म्हटल आहे आणि पुढ असही म्हटल आहे, की, जर इंदिराजीनी सत्तेवर आल्यावर करारातल्या अटी पूर्ण करण्याच्या दृष्टीन हालचाल केली नाही तर आपण इंदिरा काँग्रेसचा आणि खासदारकीचा देखील राजीनामा देऊ, असं वचन बहुगुणानी दिलं होतं. आमच्या मित्रान आपलं वचन पाळलं याचा आम्हाला अभिमान वाटतो. केंद्रीय तसच उत्तर प्रदेशच्या राजकारणातही मुस्लिम वर्गात बहुगुणाच असलेलं वजन आणि त्याना त्या वर्गामध्ये असलेली मान्यता यातून स्पष्ट होते. कदाचित ते तरी कायम राखण्यासाठी बहुगुणानी सध्या फार मोठा धोका पत्करलेला दिसतो. अर्थात एकदा सत्ता मिळाल्यावर इंदिराजीनी आपल्या नेहमीच्या सवयीप्रमाणे इमामसाहेब व बहुगुणा या

दोघानाही धाब्यावर बसवलं हा भाग अलाहिदा!

इंदिराजींच्या कारभाराबद्दल स्पष्ट नापसंती व्यक्त करताना इमामसाहेबानी संजयलाही वगळलेलं नाही. 'देल्ही रेकॉर्डर' या दिल्लीमधूनच प्रसिद्ध होणाऱ्या नियत-कालिकाच्या जून महिन्याच्या अंकात संज-यच्या राजकीय कर्तृत्वाबद्दल प्रतिक्रिया विचारली असता ते म्हणतात–

'संजयबद्दल खास बोलण्यासारखं काय आहे? आपल्या सर्वांप्रमाणेच तोही एक माणूस आहे. पांढरे कपडे घालतो आणि कमी बोलतो. आता तो लोकसभेचा सदस्य झाला आहे; पण भारतासारख्या देशात पंत-प्रधानाच्या मुलालाही लोकसभेच्या इतर पाचशेपन्नास सभासदाप्रमाणेच वागवलं पाहिजे. भारत हा लोकशाहीवादी देश आहे, राजेशाही नव्हे!

'गेल्या काही वर्षांत संजयवर विशिष्ट वर्गाकडून कठोर टीका झाली आणि सध्याही तो टीकेचं लक्ष्य बनला आहेच; पण लोक सुतावरून स्वर्गाला जातात असं म्हटलं तरी मुळात कुठं तरी तसा धागा खरोखरच असल्याशिवाय असं होत नाही. लोक जर संजय वाईट आहे अस म्हणत असतील तर निश्चितच त्यानं काही तरी दुष्कृत्यं केली असली पाहिजेत!'

¤

शुक्रवार, ता. २७ जून. आज राज्यसभेत विमान–अपघाताची न्यायालीन सूचना मागं घेतल्याबद्दल विरोधकातर्फे लक्ष्यवेधी सूचना माडण्यात येणार होती. या चर्चेला उपस्थित राहयलाच हव होतं. म्हणून कालच 'महा-राष्ट्र टाइम्स'चे दिल्लीतले वार्ताहर अशोक जैन यांच्यामार्फत भारतीय जनता पक्षाचे राज्यसभेतले खासदार जगदीशप्रसाद माथुर याच्याशी संपर्क साधला होता. कारण राज्य-सभेत प्रवेश मिळवण्यासाठी देण्यात येणाऱ्या पासावर कुणा तरी राज्यसभेतल्याच खास-दाराची सही हवी होती, माथुरजीनी सकाळी ९॥ ला घरी बोलावलं. उगीच वेळ चुका-यला नको म्हणून ९। च त्याच्या घरी हजर झालो, पण माथुरजी त्याआधीच कुठे तरी बाहेर गेलेले. आता आज काही राज्यसभेत जाता येणार नाही म्हणून थोडासा निराश होऊन बसलो असतानाच साडेनऊ वाजले आणि माथुरजीची फियाट पोर्चमध्ये हजर.

मला दिवाणखान्यातच बसायला सागून ते आतमध्ये गेले. दिवाणखान्यात समोरच पं. दीनदयाळ उपाध्याय, शामाप्रसाद मुखर्जी यांची भव्य तैलचित्रं. परदेशात थंडीमध्ये शेकण्यासाठी प्रत्येक घरात 'फायरहाउस' असतं. माथुरजींच्या दिवाणखान्यातही तसलच एक 'फायर हाउस' होतं. किंबहुना दिल्लीतल्या दोन खोल्यांच्या घरातही असं एक 'फायर हाउस' प्रत्येक खोलीत असतं; पण ही केवळ शोभेसाठीच असतात. कारण शेकोटी पेटवण्यासाठी आवश्यक असणारी खोली या फायर-हाउसेसना ठेवलेली नसते. त्यामुळ त्यांचा तसा उपयोग काही नसतो. नाही म्हणायला वरच्या कठड्यावर घड्याळ, छोट्या तसबिरी, पुस्तक असं काही सामान ठेवता येतं; पण मग ही अशी तयार करतात तरी कशाला? असा विचार माझ्या डोक्यात घोळत असतानाच माथरजी बाहेर आले. ड्रायव्हरला गाडी आणण्याचा हुकुम झाला आणि एका निळ्या रंगाच्या फियाटमधून आमची वरात राज्यसभेकडे निघाली. याच रंगाला काहीजण म्हणे 'चितामणी कलर' म्हणतात! आता खरं म्हणजे गणपतीचा आणि या रंगाचा काय संबंध? पण 'अव्यापारेषु व्यापार' करताना आपण आकाशस्थ देवादिकानाही सोडलेलं नाही. म्हणूनच तर ते आकाशात पळून गेले असावेत किंवा एकदम गोमातेच्या उदरात! त्या मानानं मग सीतामाईनं आपली सोय चागली लावली.

¤

राज्यसभेतल्या ऑफिसमधून पास हस्तगत करीपर्यंत साडेदहा वाजून गेले होते. सभेचं कामकाज अकरा वाजता सुरू होणार होतं आणि पहिल्या तासानंतर म्हणजे दुपारी बारा वाजता लक्षवेधी सूचना माडण्यात येणार होती. त्यामुळं मला पासावरही दुपारी बारानंतरच प्रवेश मिळणार होता.

सकाळी माथुरजीना गाठण्याच्या धादलीत नाश्ता राहिलाच होता. त्यामुळं मी लोक-सभेच्या कँटिनकडे वळलो. बाहेरून फक्त बुटकी, गोलाकार, लाल इमारत दिसत होती. दार उघडून आत गेलो आणि एकदम गार वाटलं. कँटिन एअरकंडिशंड होत. वेटरनं पाण्याचे दोन ग्लास टेबलावर आदळले. जगात कुठंही गेलं तरी इराण्याच्या चहाची चव जशी बदलत नाही तसंच पुण्यातल्या 'रिगल' पासून दिल्लीतल्या 'पार्लमेंट कँटिन' पर्यंत वेटर लोकाची वागण्याची आणि वागवण्याची तऱ्हा सारखीच असते हे पाहून बरं वाटलं.

या गोलाकार हॉलचे दोन भाग केलेले आहेत. एका भागात, उंच प्लॅटफॉर्मवर कँटिन आहे, तर दुसऱ्या भागात पार्लमेंटचं रिसेप्शन–सेंटर आहे. या रिसेप्शन–सेंटरकडे काही कामासाठी येणाऱ्यांना लाल फितीच्या कारभारातून काम पूर्ण होईपर्यंत टेकण्यासाठी गुबगुबीत बाकं आहेत. रिसेप्शन–सेंटरवर जवळजवळ प्रत्येकाकडे माईक असतो आणि महाराष्ट्र बँकेच्या नारायणपेठेतल्या शाखेत जसा नंबर पुकारला जातो किंवा एस. टी. स्टँडवरचा कंट्रोलर जसा एस. टी. केव्हा येणार किंवा सुटणार यापेक्षा 'प्रवाशानी खिसेकापूपासून सावध राहावे' अशा प्रत्यक्ष प्रसंगात उपयोगी न पडणाऱ्या सूचना देत असतो, तसंच इथंही चाललेलं असतं. ज्याची नावं पुकारली जात असतात त्यापैकी बरेच-जण कुठं तरी 'लापता' झालेली असणं हा बँकेतलाच अनुभव इथंही येतो. कँटिन उंच प्लॅटफॉर्मवर असल्यानं तिथं बसून या रिसेप्शन–सेंटरकडे पाहिलं की आपण कुठल्या तरी नाटकात रंगमंचावर बसून खाण्याची भूमिका बजावत आहोत असं वाटतं. प्रत्यक्षात आजपर्यंत अशी भूमिका माझ्या वाट्याला आली नसल्यामुळं तशी भूमिका करणाऱ्याचा मला फार हेवा वाटा-यचा. नाटकात एका विंगेतून निघून नायिके-कडे तुच्छपणे पहात असलसं करून समोरच्या विंगेत लुप्त होण्याच्या भूमिका पुष्कळ केल्या; पण नायिकेबरोबर तर सोडाच, पण कधी एकट्यानंसुद्धा रंगमंचावर निवांत बसून ग्लासभर पाणी पिण्याचा अभिनय करणं माझ्या नशिबी आलं नव्हतं. आज मात्र ती मनोकामना अशी चमत्कारिकपणे (रंगमंचावर बसलंस करून) पूर्ण होत होती.

कँटिन अतिशय स्वच्छ होतं. खाद्य-पदार्थही रुचकर होते. त्यामुळं पावणेबाराच्या सुमारास पोटावरून हात फिरवत 'उदर-भरण नोहे, जाणिजे यज्ञकर्म' असं मनाला बजावत राज्यसभेकडे निघालो.

## राज्यसभेत

राज्यसभेच्या अनेक लहान-मोठ्या दरवाजांपैकी एका दरवाजात दारावरच्या शिपायाला पास दाखवल्यावर त्यानं एका काउंटरकडे बोट दाखवलं. तिथं माझ्या हातात, खिशात, शर्टाच्या आत काय काय वस्तू आहेत आणि नाहीत याची तपासणी झाली. डायरी ताब्यात घेतली गेली. तेवढ्यात शेजारच्याच जिन्यानं वर चढून गेलेल्या एक बाई काउंटरवर आल्या. काउंटरवर दिलेल्या त्यांच्या पर्समध्ये त्यांचा चष्मा राहिला होता. बाईंना राज्यसभेच्या गॅलरीत चष्मा बाळगू द्यावा किंवा नाही यावर तिथल्या जागरूक अधिकाऱ्यांमध्ये कच्छच्या रणाचा भाग सोडावा की न सोडावा या पातळीवर मिनिटभर खल झाला आणि शेवटी चष्मा दिला नाही तर बाईंनी आत जाऊन तरी काय उपयोग, हे लक्षात आल्यावर चष्मा बाळगू देण्याचा धोका पत्करण्यात आला.

काउंटरशेजारच्या जिन्यानं वर आल्यावर पुन्हा एक टेबल आडवं आलं. तिथं माझ्या पासवर काही फुल्या, काही सह्या झाल्या. पुन्हा एकवार माझी सर्वांगसुंदर तपासणी झाली आणि तुरुंगातल्या कोठडीकडे न्यावं तितक्या गंभीरपणे व जड अंतःकरणानं एकजण मला गॅलरीकडे घेऊन गेला. तिथं तिघे-चौघेजण माझ्या पासवर झडप घालायला टपलेले होतेच. त्यापैकी नेमका कुणाच्या हातात माझा पास गेला याचा उलगडा होण्यापूर्वीच एका मोकळ्या बाकाकडे मला नेऊन बसवण्यात आलं.

खाली सभागृहात लक्षवेधी सूचना माडण्यात येणार होती. सभापती हिदायतुल्ला यांनी खुर्चीची सूत्रं उपसभापतीकडे दिली आणि 'सभागृहाच्या परंपरेला साजेशी चर्चा करा!' असा संदेश देऊन ते अंतर्धान पावले. सभापतीची खुर्ची मात्र झकास होती. बहुधा लाकडाची असावी. बसायला फोमचं आसन. डोक्यावर नागाच्या फड्यासारखं खुर्चीच्या पाठीपासून निघालेलं एक छत्र. त्याच्यावर अशोकस्तंभाची प्रतिकृती. मी जरा निवांतपणे बसलो. भारतीय जनता पक्षाचे खासदार जगदीशप्रसाद माथुर याना सूचना माडण्यास परवानगी देण्यात आली.

काही सत्य परिस्थिती सभागृहासमोर माडली किंवा काही माहिती मागितली तर सत्तारूढ पक्षाच्या सदस्यांनी गोंधळ माजवू नये असं सुरुवातीलाच आवाहन करून श्री माथुर म्हणाले,

'नागरी पर्यटनखात्याचा डायरेक्टर जनरलच या प्रकरणात गुंतला असल्यामुळं त्याच खात्यातला एखादा अधिकारी चौकशीसाठी नेमणं अयोग्य आहे.' एका परदेशी कंपनीच्या एजंटनं इंडियन एअरलाइन्सला विमान देण्याचं कंत्राट मिळावं म्हणून संजयला हे विमान लाच म्हणून दिलं होतं, असा गौप्यस्फोटही श्री. माथुर यांनी केला. तसंच संजयच्या व कॅप्टन सक्सेनाच्या दुर्दैवी मृत्यूला नागरी पर्यटनखात्याचे अधिकारी आणि केंद्रीय मंत्रीही जबाबदार असल्याचा आरोप श्री. माथुर यानी केला.

श्री. माथुर भाषणासाठी जय्यत तयारी करून आले होते. साठीच्या आसपासच्या या गृहस्थांची विनोदबुद्धीही तल्लख होती. त्यांच्या हातात कसलसं पुस्तक होतं आणि ते श्री. माथुर यांनी फाइलमध्ये न ठेवता नुसतच हातात घेतलं होतं. तेव्हा एक जण त्याना थट्टेनं म्हणाला, 'ते पुस्तक आधी फायलीत ठेवा! तुमचे विरोधक त्याच्यावरचं नाव वाचून धावत-पळत लायब्ररीत जातील आणि हे पुस्तक घेऊन सगळं वाचून ठेवतील!' त्यावर श्री. माथुर म्हणाले, 'अहो, ते फक्त पुस्तक मिळवू शकतील. माझे आतले मुद्दे त्यांना थोडेच कळणार आहेत?'

श्री. माथुर यांच्यानंतर लोकदलाचे एन. पी. शाही बोलायला उभे राहिले. 'राष्ट्रपतीभवन, लोकसभा-राज्यसभेच्या इमारती, पंतप्रधानांचं निवासस्थान असलेल्या परिसरावरून विमान न्यायला सुद्धा बंदी असताना संजय गांधींना इथं आपली कलाबाजी करण्यास कोणी परवानगी दिली?' अशी पृच्छा त्यांनी केली.

अरस कॉंग्रेसच्या आबासाहेब कुलकर्णी यानी तर नियमभंग करून विमान चालवणाऱ्या संजयच्या वर्तनाबद्दल पत्र लिहून त्वरित नापसंती दाखविणारे एअरमार्शल झहीर हेच त्याचे खरे मित्र होते, बाकी सगळेजण संजयचे खुशमस्करे आहेत आणि या लोकानीच त्याला ठार मारलं आहे, असं बजावलं.

आता कम्युनिस्ट पक्षाचे श्री. भूपेश गुप्ता यांचं भाषण झालं. मी पायातली चप्पल काढून जरा निवांत बसलो. एवढ्यात एक पहारेकरी माझ्याजवळ आला आणि त्यानं मला पाय चपलेत अडकवून ठेवायला सांगितलं न जाणो, एखाद्या स्खलनाच्या क्षणी मी ती चप्पल खाली भिरकावली तर? माझ्या शेजारचा एक गृहस्थ पेंगत होता. त्याला जागं करून बहुधा तोंडावर पाण्याचा फवारा मारण्यासाठी बाहेर नेण्यात आलं. त्याच्यापलीकडे एक जण दोन हातांच्या तळव्यात हनुवटी ठेवून बसला होता. त्याला मागं टेकून ताठ बसण्यास फर्मावण्यात आल.

श्री. भूपेश गुप्तांचं भाषण म्हणजे चमचमीत मेजवानी असते. आवाजात क्षणोक्षणी चढ-उतार करत, कोपऱ्यात उभ्या केलेल्या उषा फॅनसारखं अर्धवर्तुळाकार फिरत श्री गुप्ता उपहासाचे चिमटे चांगले काढतात. केंद्रीय मंत्र्यानी न्यायालयीन चौकशी मागं घेण्याबद्दल दिलेली कारणं म्हणजे— 'Kindergarten excuses' आहेत अशी रेवडी उडवून श्री. गुप्ता म्हणाले, 'तुम्हाला जर डायरेक्टर जनरलनं चौकशी-अधिकारी नेमला आहे हेही माहीत नसतं तर तुम्ही तिथं बसता तरी कशाला? श्रीमती गांधींना स्वार्थी खुशामतखोरापेक्षा चांगली माणसं मिळतच नाहीत की काय?'

सत्तारूढ पक्षातर्फे एकटे डॉ. रफिक झकेरिया बोलले. त्यांनी आपल्या भाषणात ही सूचना मांडण्यामागं संजयची प्रतिमा डागाळणं एवढा एकच हेतू विरोधकांच्या मनात आहे असं काही तरी थातुर-मातुर सांगितलं. केंद्रीय नागरी पर्यटनमंत्री ए. पी. शर्मा तर अगदीच निष्प्रभ वाटले. कोणीही काहीही मुद्दा उपस्थित केला तरी चौकशी पूर्ण झाल्यावर हे सारं स्पष्ट होईल, एवढच त्यांच्याकडं उत्तर होतं. 'डायरेक्टर जनरलनं चौकशीसाठी अधिकारी नेमल्याचं आम्हाला माहीत नव्हतं. म्हणून आम्ही न्यायालयीन चौकशीचा आदेश दिला आणि नंतर ते लक्षात आल्यामुळं तो आदेश मागं घेण्यात आला' हे त्यांचं उत्तर तर अगदीच बालिश होतं. वाणिज्यमंत्री प्रणव मुखर्जी चर्चेला नेमका किती वेळ दिला जावा, यासारख्या क्षुल्लक मुद्द्यावर विनाकारण संतापल्याचा आव आणून बोलत होते, तर संसदीय कामकाजखात्याचे राज्य-

मंत्री सीताराम केसरी घरापुढल्या व्हरांड्यात हात मागं बांधून शतपावली करावी तसं सभागृहात सर्वत्र उगीचच हिंडत होते.

सत्तारूढ पक्षानं एकूणच हा विषय 'लाइटली' घ्यायचं ठरवलं होतं असं त्यांच्या सभासदांच्या उपस्थितीवरून आणि वर्तनावरून वाटत होतं उपसभापतीही या गटाच्या कलाकलानं सगळ्या गोष्टी घेत होते.

सर्व विरोधी पक्ष सत्तारूढपक्षावर एकत्रितपणे हल्ला चढवत असल्याचं सुखद दृश्य मात्र या चर्चेच्या वेळी पाहायला मिळालं.

¤

दुपारी दोनच्या सुमाराला चर्चा संपली आणि मॅटिनीचा शो सुटावा तशी माणसं बाहेर पडली. मीही रिसेप्शन-सेंटर-कम-कँटिनमध्ये गेलो आणि थोडं 'यज्ञकर्म' करून अरस-काँग्रेसच्या खासदार अंबिका सोनी यांना फोन लावला. त्यांनी दुसऱ्या दिवशी सकाळी साडेनउला घरी बोलावलं. फोन खाली ठेवला आणि पुण्याला परतण्यास चार-पाच दिवसच राहिले आहेत याची आठवण झाली. स्कूटरनं तडक रेल्वेस्टेशन गाठलं.

¤

दिल्लीच्या रेल्वेस्टेशनचा बाहेरचा भाग आणि भोवतालचा परिसर बराचसा पुण्याच्या रेल्वेस्टेशनसारखाच वाटतो. स्टेशनसमोरच लागणारी टॅक्सी-स्कूटर्सची रांग, थोडं बाहेर पडलं की विविध प्रकारच्या वस्तू घेऊन उभे असलेले फेरीवाले, फळांच्या गाड्या, स्टेशनरीपासून कन्फेक्शनरीपर्यंतची निरनिराळी दुकानं, मातीच्या सुंदर सुरया आणि टांगे देखील !

आत स्टेशनच्या इमारतीत रिझर्वेशनची सोयही चागली आहे. काही गाड्यांची रिझर्वेशन्स तळमजल्यावरच होतात, तर काही पहिल्या व दुसऱ्या मजल्यावर. जम्मूतावी-पुणे-झेलम एक्स्प्रेसचं रिझर्वेशन पहिल्या मजल्यावर होतं. सुदैवानं रांग फारशी नव्हती दिल्लीच्या रिझर्वेशन विभागाचं वैशिष्ट्य म्हणजे पुण्यातल्या महाराष्ट्र बँकेत जशा काउंटरवर बहुतेक ठिकाणी महिलाच असतात तशा इथं रिझर्वेशनच्या विभागात सर्वत्र महिलाच दिसत होत्या. बँक आणि पोस्टखात्यानंतर हेही खातं पादाक्रांत करायचा त्याचा बेत दिसतो. या ठिकाणची आणखी एक चांगली सोय म्हणजे प्रत्येक मजल्यावर रिझर्वेशनच्या खिडक्यासमोरच चहा-कॉफी, खाद्यपदार्थांचे स्टॉल्स आहेत.त्यामुळं रांगेत उभं राहून कंटाळा किंवा थकवा आला की प्रवाशाला ताजंतवानं होता येतं.

माझ्या गाडीचं रिझर्वेशन देणारी महिला जरा तिखटच होती. माझ्या आधीच्या एका प्रवाश्यानं रिझर्वेशन-फॉर्मवर सातचा आकडा लिहिला होता. काही कळायच्या आत काचेपलीकडून फॉर्म परत आला. सोबत एक कडकडीत वाक्य 'इसको सात कौन पढेगा?' मी माझ्या फॉर्मवरचे सर्व आकडे सर्व बाजूनी वाचता येत असल्याची खात्री करून घेतली. फॉर्म काचेखालून पलीकडे दिला. दोन मिनिटांनी एक तिकीट फडफडत माझ्या दिशेनं आलं. ते खिशात घालून स्टेशनबाहेर पडलो.

¤

आज संध्याकाळी जनता पक्षाचे खासदार मधू दंडवते यांनी वेळ दिली होती. जनता सरकारात रेल्वेमंत्री असताना त्यांनी केलेलं काम पाहून मनात आदर होताच. १९७८ च्या विधानसभा निवडणुकीच्या पुण्यात प्रचारसभेसाठीसुद्धा अगदी वेळेवर येऊन त्यांनी संयोजक, श्रोते, पत्रकार या सर्वांचीच धादल उडवून दिली होती. तो प्रसंगही मनावर छाप उमटवून गेला होता.

त्याच वर्षी मी कोकणात गेलो होतो संगमेश्वरला आप्पा भिडे नावाचे मंगलोरी कौलाचे व्यापारी राहतात. त्यांच्याकडे उतरलो होतो. त्याच दिवशी मधू दंडवते देवरुखला एका समारंभासाठी येणार होते. त्यांचं भाषण ऐकण्यासाठी आप्पांनी टॅक्सी करून देवरुखला नेलं. समारंभाच्या संयोजकांच्या मनात दंडवतेंच्याच हस्ते एका प्रतिष्ठित स्थानिक नागरिकाचा सत्कार करायचं होतं; पण मूळ कार्यक्रमात त्याचा समावेश नव्हता. 'ज्या माणसाची नि माझी फारशी ओळख नाही त्याचा सत्कार करून गौरवाचे दोन शब्द मी कसे बोलणार?' असं सांगून दंडवतेंनी त्या कार्यक्रमाला साफ नकार दिला. एकदा समारंभासाठी आल्यावर कोनशिला बसवण्यापासून वेळप्रसंगी श्रद्धांजली अर्पण करणाऱ्या काँग्रेसी पुढाऱ्यांच्या पार्श्वभूमीवर दंडवतेंचं हे वर्तन अतिशय उठून दिसलं.त्यापायी त्यांनी थोडासा रोषदेखील पत्करला. कारण सवंग लोकप्रियता हे त्यांच्या काम करणाच्या पद्धतीचं कधी उद्दिष्टच नव्हतं.

संध्याकाळी घरी पोचलो तेव्हा दंडवते नुकतेच लोकसभेतून आलेले दिसत होते. पायात सँडल्स तसेच होते. टीपॉयवरचं त्या दिवशी आलेलं टपाल भराभर चाळत होते. महत्त्वाचं वाटेल ते झटकन् वाचत होते. त्या दिवशी त्यांच्याकडे बहुधा अण्णा (एसेम) मुक्कामाला होते. राष्ट्रपतिपदासाठी नावाची चर्चा होणारा तो पंचाहत्तरी ओलांडलेला तरुण घरगुती पोषाखात एखाद्या सामान्य कुटुंबवत्सल गृहप्रमुखासारखा दिसत होता.

टीपॉयवरचं टपाल चाळून झालं नि दंडवते बोलायला लागले—

'इंदिराजींची आतापर्यंतची काम करण्याची पद्धत पाहिली तर असं जाणवतं की, त्यांच्यात संघवृत्तीनं काम करण्याची प्रवृत्तीच नाही. त्यांना सहकारी लाभले, पण सहकाऱ्यांबद्दलसुद्धा इंदिराजींच्या मनात सतत संशय. त्यामुळं सहकारी मिळाले तरी ते त्यांचे साथी किंवा मित्र होऊ शकले नाहीत. त्यांनी स्वत:च एकदा जाहीरपणे सांगितलं होतं की, ज्या वेळी मी अडचणीत सापडले, माझ्यावर विरोधकाकडून हल्ले झाले त्या वेळी माझे सर्व सहकारी गप्प बसले. एकटा संजय माझ्या पाठीशी खंबीरपणे उभा राहिला. आजच्या पार्श्वभूमीवर इंदिराजींचे ते उद्गार मला प्रकर्षाने आठवतात.

वृत्तपत्रातल्या बातम्यावरून असं दिसतं की, प्रत्यक्ष प्रशासनातही संजय भरपूर हस्तक्षेप करत असे. आजच्याच 'इंडियन एक्सप्रेस' च्या अंकात (२७ जून) एअर मार्शल झहीर यांचं जे पत्र प्रसिद्ध झालं आहे. त्यावरूनही हे स्पष्ट होतं, पण त्यांच्याविषयी अशा किती तरी कथा ऐकण्यात येतात आणि गंमत म्हणजे त्यापैकी बऱ्याचशा त्यांच्याच गोटातून कळतात !

'ही मंडळी गांधी–नेहरूंच्या काँग्रेसचा वारसा सांगतात; पण त्या काळातल्या काँग्रेसमध्ये परस्परांविषयी प्रेम, जिव्हाळा, ओलावा असायचा आत्ताच्या इंदिरा–संजय काँग्रेसमध्ये भीती आणि संशयाचं वातावरणच जास्त आढळतं. या वातावरणाला अधिक प्रबळ बनवणारी शक्ती होती संजय !

'संजय गांधीच्या निधनामुळं इंदिराजी संपूर्णपणे एकाकी पडल्या आहेत. अशा वेळी इथून पुढल्या काळात दोन शक्यता मुख्यत्वे मला दिसतात. एक म्हणजे संजयचं अस्तित्व नष्ट झाल्यामुळं इंदिरा

काँग्रेसमधलाच एखाद्या गट पुन्हा इंदिराजींच्या विरोधांत उभा ठाकेल आणि दुसरा म्हणजे या प्रसंगामुळं इंदिराजींमध्ये एक नवाच गंड निर्माण होईल. त्या अतिरेकी किंवा हटवादी बनण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळं इथून पुढल्या काळात या दोन्ही शक्यता गृहीत धरूनच विरोधकांनी वाटचाल केली पाहिजे. आणखी एक जरा दूरची शक्यता म्हणजे अशा तऱ्हेनं एकाकी पडल्यामुळं इंदिराजी कदाचित हतबलही होतील.

'आज देशापुढं विविध समस्या उभ्या आहेत. आसाम-आंदोलनासारखा प्रश्न भेडसावतो आहे. काही फ्रेंच लोक जर्मनीमध्ये घुसून वास्तव्य करून राहयले आहेत असं चित्र आपल्याला युरोपमध्ये दिसेल का ? आपल्या देशात मात्र आज तशी परिस्थिती उद्भवलेली दिसते. अशा वेळी 'आसू' ची भूमिका व मागणी मला अत्यंत न्याय्य वाटते. माझ्या पक्षाचाही त्याला शंभर टक्के पाठिंबा आहे; पण अशा स्वरूपाचा प्रश्न हाताळण्याची सुद्धा इंदिराजींची खास पद्धत आहे. त्या निरनिराळे पवित्रे घेऊन पाहतात. त्या पावित्र्यांमुळं उमटणाऱ्या प्रतिक्रिया अजमावतात आणि मग पुढचं पाऊल टाकतात. आसाम-प्रश्नाबाबतसुद्धा त्यांनी आधी दमदाटी करून पाहिली. 'या आंदोलनामागे परकीय हात आहे. आम्ही हे हातच छाटून टाकू!' असं धमकावलं. मग झैलसिंगामार्फत 'आंदोलन निपटून काढू!' असं बजावलं; पण बाई कबूल करोत किंवा न करोत, त्यांना या आंदोलनाचा अंदाज आला आहे आणि म्हणूनच त्या आता चर्चेला, संवादाला तयार झाल्या आहेत. कारण त्यांनी हा हिशेब मनात पक्का केलेला दिसतोय की, यांना जर फार डिवचलं तर तामिळनाडूमध्ये उभी राहिली तशी पर्यायी शक्ती आसाममध्येही उभी राहील! अर्थात बाईंचं राजकारण राजकीय दृष्टिकोन व अंकगणित या दोन्हींवरही अवलंबून असतं. त्यामुळं आत्ताची त्यांची भूमिका हादेखील त्यांनी घेतलेला एक पवित्रा असेल आणि त्यावरची प्रतिक्रिया अजमावून मग त्या पुढचं पाऊल उचलतील.

'जनता पक्षाच्या कारकीर्दीबद्दल बोलायचं झालं तर मला व्यक्तिशः असं वाटतं की, १९७७ साली जनतेने जे आम्हाला दिलं ते आम्ही करंटेपणाने उधळून लावलं हे मान्य केलंच पाहिजे ! आता त्यामध्ये कोणत्या गटाचा किती वाटा होता याचा हिशेब करण्यात अर्थ नाही. मातीचं मडकं पडून फुटल्यावर त्याचे तुकडे जसे अगदी रेखीवपणे होत नाहीत तशीच जनता पक्षाची झालेली फाटाफूट म्हणजेही काही फार मोठी आखीव-रेखीव तात्त्विक विभागणी नाही. वैयक्तिक महत्त्वाकांक्षा, राग-लोभ, वैयक्तिक हेवेदावे, राजकीय-तात्त्विक मतभेद या सगळ्याच गोष्टी त्याला कारणीभूत आहेत.

'अर्थात ही पडलेली फूट पुन्हा जशीच्या तशी सांधणं सोपं नाही. त्यामुळं विरोधी पक्षांचा सध्या तरी प्रयत्न असा असावा की, काही किमान कार्यक्रमांवर त्यांनी एकत्र येऊन परस्परांशी सहकार्य केलं पाहिजे. संसदेमध्ये या प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. समित्यांची निवड, स्थगन प्रस्ताव, संसदेत उपस्थित केले जाणारे काही प्रश्न इत्यादी बाबतीत सर्व विरोधी पक्षांनी एकमेकांना सहकार्य करून floor-co-ordination निर्माण करण्याचे प्रयत्न चालू झाले आहेत. त्याला यशही येत आहे; पण त्याच वेळी यातून ताबडतोबीनं सर्व विरोधी पक्षांमध्ये एकजूट निर्माण होईल असा फाजील आशावादही मला नाही. तरीदेखील इथून पुढल्या काळात परस्परांवर टीका-हल्ले



खा. मधु दंडवते

करण्यापेक्षा बिकट आर्थिक परिस्थिती, हुकुमशाहीचा धोका यावर लक्ष केंद्रित केलं पाहिजे.

'इंदिराजींच्या या नव्या सरकारची काम करण्याची ढब मोठी धूर्तपणाची आहे. त्यांनी आधी पेट्रोल, डिझेल, खतांचे भाव वाढवले; नंतर रेल्वे-अंदाजपत्रकामधून जनतेवर नवा बोजा लादला आणि विधानसभेच्या निवडणुका पार पडल्यावर अर्थसंकल्प सादर केला. त्यामध्येसुद्धा जनता पक्षाच्या राजवटीत गरीब थरासाठी ज्या रकमा मंजूर झाल्या होत्या त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर कपात केली आणि जेमतेम ३५ कोटी रुपयांची सूट देऊन १४७० कोटी रुपयांची तूट अंदाजपत्रकामध्ये दाखवण्यात आली आहे. माझा असा अंदाज आहे की, वर्षाच्या शेवटी ही तूट तीन हजार कोटींच्यावर जाईल. आत्ता चलनवाढ २३ टक्के आहे, ती तीस-पस्तीस टक्क्यांवर गेल्याशिवाय राहणार नाही. म्हणूनच अंदाजपत्रक सादर झाल्यानंतर अर्थतज्ज्ञांच्या त्यावरील प्रतिक्रिया संदिग्ध आहेत.

'शासनातर्फे जो 'इकॉनॉमिक सर्व्हे' प्रसिद्ध होतो त्यामध्ये यंदा असं स्पष्ट नमूद केलं आहे की, राष्ट्रीय उत्पन्न, दरडोई उत्पन्न परकीय चलनसाठा, सोनेसाठा, औद्योगिक विकासाचा वेग, शेती-उत्पन्न या सर्व क्षेत्रात जनता पक्षाच्या कारकीर्दीत आजच्यापेक्षा किती तरी जास्त आघाडी मारलेली होती; पण दुर्दैव असं की, आमच्या पक्षानं केलेल्या कामापेक्षा पक्षामध्ये पडलेल्या फुटीचं विकृत स्वरूपच जनतेसमोर आलं. म्हणूनच जनतेनं ज्या निर्धारानं १९७७ साली इंदिराजींना सत्तेवरून हटवलं त्याच निर्धारानं १९८० साली आम्हाला पाच वर्षं सत्तेवर राहण्यास नालायक ठरवलं. अर्थात १९८० साली इंदिराजींना मिळालेलं यश हा धोक्याचा लाल कंदिलही आहे हेही त्यांनी लक्षात घ्यावं.

'राजकारणात तरुणांना जास्त वाव दिला पाहिजे या विचाराला माझा पाठिंबा आहे. किंबहुना त्याच विचारातून मी आजच (२७ जून) लोकसभेमध्ये एक खासगी विधेयक मांडलं आहे. या विधेयकानुसार घटनेच्या ३२६ व्या कलमामध्ये दुरुस्ती करून तरुणांना २१ वर्षांऐवजी १८ वर्षे पूर्ण झाल्यावर मतदानाची परवानगी देण्यात यावी अशी तरतूद होऊ शकेल. या विधेयकाला चर्चेमध्ये चांगला पाठिंबा मिळाला; पण प्रत्यक्ष मतदान कसं होणार आहे याचीही मला कल्पना आहे.

'कोणत्याही व्यक्तीनं विशिष्ट वयानंतर निवृत्त व्हावं असं म्हणणाऱ्यांपैकी मी नाही. कारण युवावृत्ती हा वयाचा नव्हे, तर मनाचा गुणधर्म आहे असं मी मानतो. १९४२ साली गांधीजींनी नौखालीत केलेलं कार्य किंवा विकल अवस्थेतसुद्धा आणीबाणीच्या काळात व त्यानंतर जयप्रकाशजींनी उभारलेला लढा त्या दृष्टीन उल्लेखनीय आहेत. म्हणजेच काही म्हातारे युवावृत्तीचे असतात, तर काही युवक म्हातारे असतात. म्हणन मी असं म्हणेन की युवकांचं चैतन्य राजकारणात आणलं पाहिजे.

'यापुढील कळात आपण जर लाटेच्याच राजकारणावर अवलंबून राहिलो तर आपल्याला सतत हेलकावेच खात राहावं लागेल. म्हणून आता संपर्क व संघटनातून संस्थात्मक, रचनात्मक कार्य उभारण्याची आवश्यकता आहे. अन्याय होईल तिथे संघर्षही करावा; पण तो करत असताना स्वतःची शक्ती विस्कळित होऊ नये. आता नजीकच्या काळात विरोधी पक्षानी व्यापक, रचनात्मक, संघर्षात्मक कार्यावर अधिक भर दिला पाहिजे. कदाचित नव्या परिस्थितीत अपेक्षेपेक्षादेखील लवकर संघर्ष निर्माण होईल. अशा वेळी विरोधी पक्ष जर पाय रोवून स्थिर उभे असतील तर १९७७ चा इतिहास पुन्हा घडवता येईल; पण हे सर्व जाणण्याची कुवत आम्हा सर्वांच्यात असली पाहिजे !

'इतिहासापासून आम्ही एकच गोष्ट शिकलो आणि ती म्हणजे आम्ही इतिहासापासून काहीही शिकत नाही – The only thing that we learn from history is, we don't learn anything from history. आमच्या बाबतीत आम्ही हे होऊ न देण्याचा जरी निर्धार केला व त्यानुसार कृती केली तरी खूप मजल गाठता येईल.'

जवळजवळ तासभर प्रा. दंडवते बोलत होते. विचाराच्या लहरी त्याच्या मनामध्ये एकापाठोपाठ एक अशा उमटत होत्या आणि त्या ते बोलून दाखवत होते. त्या बोलण्यामध्ये खत होती. कळकळ होती. आर्जव होतं, आत्मविश्वासही होता.

संजय गांधींचं नुकतंच निधन झालं असल्यामुळं त्याचं मूल्यमापन करण्याची मात्र प्रा. दंडवते याची तयारी नव्हती. ते फक्त इतकंच म्हणाले की, 'माझी त्याच्याविषयीची मतं फार कठोर आहेत. त्यामुळं ती आता व्यक्त करणे योग्य होणार नाही!' सध्याच्या राजकारणात जिवंत माणसाशी वागतानासुद्धा तत्त्व–नीती गुडाळून ठेवली जाते. त्या दृष्टीने एका मृत व्यक्तीविषयी विचार व्यक्त करताना प्रा. दंडवते यानी अवलंबिलेली मर्यादा निश्चितच स्पृहणीय होती. योगायोग म्हणजे संजयच्या निधनाच्या एक-दोन दिवसच आधी 'इंडिया टुडे' या नियतकालिकाचे प्रतिनिधी प्रा. दंडवते यांची संजय गांधीच्या संदर्भात एक मुलाखत घेऊन गेले होते आणि प्रा. दंडवते यांनी साहजिकच त्या मुलाखतीत संजयवर जोरदार टीकास्त्र सोडलं होतं. त्यामुळं आता ती मुलाखत लगेच्याच अंकात आली तर फार वाईट दिसेल या कल्पनेने प्रा. दंडवते संचित झाले होते.

आमची चर्चा जवळजवळ संपत आली असताना एक बाई प्रा. दंडवतेकडे आल्या. त्या कोणा तरी खासदाराच्या ब्लॉकमध्ये राहात होत्या आणि त्याना तीस जूनपर्यंत जागा सोडायला सागण्यात आलं होतं. त्यामुळं दंडवतेच्या सहाय्याने दुसरीकडे कुठं जागा मिळाली तर पहावं म्हणून त्या आल्या होत्या; पण प्रा. दंडवते यानी त्यांचा पूर्ण अपेक्षाभंग केला 'हाही एक प्रकारचा भ्रष्टाचार असून मी लोकसभेत त्यावर टीका करत असतो. अशा वेळी मीही त्यामध्ये कसा सामील होऊ शकेन?' अशी सरळ पृच्छा त्यानी केली. भारतीय राजकारणात अशीही काही माणसं आहेत, याचा आलेला हा अनुभव निश्चितच अतिशय सुखद होता; इथल्या राजकारणात अजूनही नीति–तत्त्वाला स्थान मिळू शकेल हा आशावाद वाढवणारा तो अनुभव होता.

### टमरेल–दूध–समाजवाद !

बाकी दिल्लीतल्या कुल्फीची चव काही औरच ! तुम्ही लहानशा फेरीवाल्याकडे जा. किंवा 'रोशन–ए–कुल्फी 'सारख्या करौल बागेतल्या पॉश हॉटेलमध्ये. बदाम, पिस्ते आणि केशराचा स्वाद त्या कुल्फीला असणारच. शिवाय अडीच-तीन रुपयात अशी कुल्फी देतात की आधी नुसती एखादी डिश खाल्ली असली तरी तुमचा रात्रीच्या जेवणाचा प्रश्न सुटावा.

प्रा. दंडवतेकडून परत येईपर्यंत रात्रीचे नऊ वाजून गेले होते. डायरी रूमवर टाकली आणि बाहेर पडलो. दिवसभराची धावपळ उरकल्यावर रात्री गुरुद्वारारोड किंवा अजमल खाँ रोडवर नुसता फेरफटका मारला की, सारा शीण नाहीसा होत असे. तिथले फ्रूटस्, स्टॉल्स, निरनिराळ्या वस्तूंची दुकानं, शो–केसेस, रस्त्यावर मातीच्या विविध वस्तू, पुतळे घेऊन बसणारे छोटे विक्रेते नियतकालिकं, वर्तमानपत्रं, अनेक प्रकारची इंग्रजी–मराठी–हिंदी पुस्तकं, कादंबऱ्यांनी झाकून गेलेले चौकाचे कोपरे या सगळ्यातून फिरत असताना काहीही खरेदी केलं नाही तरी भरपूर मनोरंजन होतं. शिवाय कुठे तरी मकिंतीवरून चाललेली घासाघीस, अर्थबोध न होणारा गोंगाट आणि दिव्याचा झगझगाट यामुळं मार्केटचं फीलही छान होतं.

एका कुल्फीच्या दुकानाबाहेर मी थबकलो. कुल्फी खाण्यासाठी नव्हे, तर तिथलं एक दृश्य पाहून. या दुकानाबाहेर मसाला दुधाच्या गिन्हाइकानी पिऊन संपवलेल्या काही बाटल्या ठेवलेल्या होत्या. रस्त्यावरचं जवळजवळ भिकाऱ्यासारखं दिसणारं आठ–दहा वर्षांचं पोरगं त्या बाटल्यापाशी घुटमळत होतं. मला अर्थबोध होईना. फार तर एखादी रिकामी बाटली चोरून विकण्याचा त्याचा बेत असावा असं वाटलं; पण नंतर असं लक्षात आलं की त्या रिकाम्या बाटल्याच्या तळाशीही दुधाचे काही थेंब शिल्लक होते आणि ते पोरगं हातातल्या प्लास्टिकच्या टमरेलात ते थेंब गोळा करून घेत होतं. इतक्यात दुकानचा मालक बाहेर आला. त्याने पोराला दोन धपाटे घसतले. पोराने टमरेलात गोळा झालेलं दूध झटकन पिऊन टाकलं आणि मगच तिथून पळ काढला ! मालक आत गेल्यावर थोड्या वेळाने पुन्हा ते पोरगं प्लास्टिकचं टमरेल हातात घेऊन दुधाच्या बाटल्या धुडळायला लागल. समाजवादाच्या गप्पा मारणाऱ्या सर्व पोपटांना त्या टमरेलातलं दूध एकदा पाजलं पाहिजे असं वाटलं.

करौलबागेतून परतताना दिल्लीतूनच प्रसिद्ध होणाऱ्या एका नियतकालिकाचा अक पैदा केला होता. काय विचित्र योगायोग पहा! जून महिन्यात किमान अर्धा डझन नियतकालिकावाल्यांनी उगवत्या सूर्याला अर्घ्य दिलेलं असाव या विचारानं संजयवर 'कव्हर

स्टोरीज' केल्या आणि त्याच महिन्यात त्याचं अपघाती निधन झालं! त्यामुळे हे सर्वच अंक irrelevant, संदर्भ तुटल्यासारखे वाटायला लागले. या नियतकालिकातही 'द रियल संजय' अशा शीर्षकाखाली कव्हरस्टोरी सादर केलेली होती. संजयला चिकटवले जाणारे गुण हे त्याचा स्थायीभावच कसे आहेत हे दाखवण्याचा लेखकाने आटापिटा केला होता. तसंच त्याचं बुद्धिचातुर्य हजरजबाबीपणा कुशाग्रता या सगळ्याचं सोदाहरण स्पष्टीकरण दिलं होतं. थोडक्यात एक लोटांगणच बाकी होतं. इंदिराजी–संजयची राजवट म्हणजे घराण्याची राजेशाही कशी नाही हे पटवताना लेखक म्हणतो –

'निष्प्रभ झालेले विरोधक सवंग लोकप्रियतेसाठी हा राजेशाहीचा आरोप करतात. राजकीय वारसदारी घेऊन आलेल्या अनेकानी देशाच्या विकासाचं भाग्य खुलवल्याची जगाच्या इतिहासात नोंद आहे. जॉन एफ. केनेडी राष्ट्राध्यक्ष बनण्यापूर्वीची सर्व पूर्वतयारी त्यांच्या कुटुंबामधून पद्धतशीरपणे करण्यात आली होती. त्याच्या मृत्यूनंतर रॉबर्ट केनेडीनी त्यांचं अपुरं कार्य पुढं चालू ठेवलं आणि आता एडवर्ड केनेडी अध्यक्षपदाच्या उमेदवारीच्या शर्यतीत उतरले आहेत. माओच्या पत्नीने चांडाळचौकडीची उभारणी पती जिवंत असतानाच केली होती. चर्चिलचा नातू पुढे टोरी पक्षाचा खासदार बनला. आपल्या देशात सुद्धा पिलू मोदी त्यांच्या पिताजीचा वारसा (सर होमी मोदी) पुढे चालवत आहेत. स्वातंत्र्यचळवळीच्या लढ्यात कस्तुरबा गांधीनी महात्मा गांधींच्या बरोबरीने भाग घेतला. शास्त्रीजींचा मुलगा हरी आणि व्ही. व्ही. गिरींचा मुलगा शंकर हे दोघंही खासदार झाले आहेत. श्रीमती मृणाल गोरेंनी कामगारलढ्यात मारले गेलेले त्याचे पती केशव ऊर्फ बंडू गोरे याच्याकडून स्फूर्ती घेऊन सामाजिक कार्याला सुरुवात केली, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी हरिजनांचा उभारलेला लढा त्यांच्या पत्नी पुढं चालवत आहेत. श्रीपाद अमृत डांग्यांची कन्या रोझा देशपांडे कम्युनिस्ट पक्षाच्या नेत्या बनल्या आहेत. कमलापती त्रिपाठींचा मुलगा उत्तर प्रदेशातील महत्त्वाच्या राजकीय नेत्यांपैकी एक आहे; पित्याच्या निधनानंतर शशिकला काकोडकर गोव्याच्या मुख्यमंत्री झाल्या, तर विद्याचरण शुक्ला आणि श्यामचरण शुक्ला या बंधूंनी घराण्याचा राजकीय झेंडा फडकत ठेवला. हेमवतीनंदन बहुगुणांची पत्नी कमलादेवी ही देखील लोकसभेची खासदार होती.'

'ही यादी पुढं अशीच किती तरी वाढवता येईल.' असं म्हणून लेखकमहाशयानी तो मोह आवरता घेतला आहे; पण हे करत असताना त्याच्या असं लक्षात आलेलं दिसत नाही की, यादी जसजशी वाचत जावी तसतशी कर्तृत्वाच्या बाबतीत उतरती भांजणी लागत गेली आहे. त्या दृष्टीनं त्यामध्ये संजयजीचा क्रमांक सुरुवातीला लावायचा की शेवटी लावायचा हे सुज्ञ वाचकांनीच ठरवावं.

याच लेखात जगजीवनरामांच्या सूनबाई सौ. सुरेश राम, बिशनसिंग बेदी, परवीन बाबी, रणधीर कपूर, विनोद खन्ना, जथेदार संतोकसिंग यांच्याही संजयबद्दलच्या प्रतिक्रिया दिलेल्या आहेत. त्यामध्ये 'संजयजींना पाहिल्याबरोबरच ते थोर राजकारणी होतील असं मला वाटलं' असा निर्वाळा बाबूजींच्या सूनबाईंनी दिलाय. पुढं त्या असंही म्हणतात की, 'अनेक ज्येष्ठ राजकारणी लोक स्वतःच्या मुलांना राजकारणात आणण्याचा प्रयत्न करतात; पण ते जर जमलं नाही तर ते संजयला का दोष देतात, हे मला समजत नाही.' (हा घरचा अहेर फर्स्टक्लास आहे.) निवृत्त क्रिकेट-खेळाडू बेदीसाहेब संजयच्या कुटुंबनियोजन, वृक्षारोपण, शहर-स्वच्छता या उपक्रमांचं कौतुक करतात आणि तो 'इन्ट्रोव्हर्ट' वाटल्याचंही सांगून टाकतात, तर प्रसिद्ध अभिनेत्री परवीन बाबी 'संजय इज अ मॅन ऑफ गटस्' असं प्रशस्तिपत्रक देऊन मोकळ्या होतात. 'संजयच्या नेतृत्वाखाली देश सर्व आघाड्यांवर वेगानं प्रगती करील' असा विश्वास व्यक्त करून चित्रपटअभिनेते रणधीर कपूर 'झाडं लावून लोकांना सावलीची सोय करणाऱ्या या माणसालाच देशाचा पंतप्रधान केलं पाहिजे', असं बजावतात. त्यांचे जोडीदार विनोद खन्ना म्हणतात की, 'मनाला पटणाऱ्या गोष्टी अमलात आणण्याचं धाडस असणारा एकमेव नेता मला दिसतो, तो म्हणजे संजय.' शिख धर्मगुरू जथेदार संतोकसिंग संजयला तो समाजवादी आणि निधर्मी असल्याचं सर्टिफिकेट देऊन टाकतात. राज्यसभेचे खासदार व प्रसिद्ध पत्रकार खुशवंतसिंग या सर्व मंडळींच्या पुढं जाऊन म्हणतात, 'मी इंदिराजींना पाठिंबा देतो म्हणून संजयला देतो असं नाही, तर संजयमुळं मी इंदिराजींना पाठिंबा देतो.'

सर्वांच्याच मुलाखती मनोरंजक होत्या. अर्थात अलेक्झांडर द ग्रेट पासून मार्क्स-लेनिनपर्यंतच्या रांगेत संजयला नेऊन बसवणाऱ्या राजकारण्याचं चातुर्य या पत्रकार, खेळाडू आणि चित्रपट-अभिनेत्यांमध्ये नाही; पण या सगळ्यांच्या वरातीत एका देखील प्रमुख विरोधी राजकीय नेत्याचा समावेश नसावा हेही नोंद घेण्यासारखं आहे.

## फ्रेंड्स कॉलनीत....

शनिवार ता. २८ जून. अरस कॉंग्रेसच्या राज्यसभेतील खासदार श्रीमती अंबिका सोनी यांनी सकाळी साडेनऊ वाजता बोलावलं होतं. संजयमुळच त्या राजकीय प्रकाशझोतात आलेल्या. ऐन आणीबाणीच्या काळात यूथ कॉंग्रेस आमच्या अध्यक्षा आणि त्यानंतर एकदम अरस कॉंग्रेसमध्ये. त्यामुळंच त्यांना भेटण्याची जास्त उत्सुकता होती.

फ्रेंडस कॉलनी हा दिल्लीतला एक अलिशान परिसर. शहराच्या मुख्य वस्तीपासून बऱ्यापैकी दूर. रिक्षानं जायला बारा-चौदा रुपये पडतात, याच परिसरातील सात नंबरचा बंगला हे अंबिकाबाईचं निवासस्थान. सबंध कॉलनी अतिशय स्वच्छ, सुंदर. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना उंच झाडं. त्यामध्ये बरीचशी बकुळफुलांची. बहुतेक बंगले दुमजली. आतमध्ये पोर्च आणि गॅरेज. खोल्यांना कूलर्स आणि एअर-कंडिशनर्स बसवलेले. अगदी तुर्कमान गेटला जशी दिल्ली वसवण्याचं संजयजींचं स्वप्न होतं तशी दिल्ली.

साडेनऊ वाजून पाच-दहा मिनिटं झाली असतील बंगला शोधून काढण्यातच दहा-पंधरा मिनिटं गेली. अशा परिसरात गेलं की, कसं हरवल्यासारखं होतं. त्यामुळं पुण्यात सुद्धा प्रभातरोडवरचा एखादा बंगला गाठण्यापेक्षा कसबा पेठेतलं एखादं दोन खोल्यांचं घर हुडकून काढणं मी अधिक पसंत करीन.

नोकरानं दार उघडलं. मला बाहेरच्या खोलीतच बसायला सांगण्यात आलं. आतमध्ये वर्दी गेली. कोचावर बसलो आणि समोरच सत्य साईबाबांचा पूर्णाकृती फोटो पाहिला. डोक्यावर भरपूर दाट



खा. अंबिका सोनी

कुरळे केस, चेहऱ्यावर प्रसन्न हास्य. उजवा हात आशीर्वादासाठी उचललेला. बाकी या संत–महंतांचं बरं असतं. राजकीय नेत्यांपासून शत्रुघ्न सिन्हासारख्या सिनेनटापर्यंत सर्वत्र यांचा ' सोने–नाणे आम्हा मृत्तिकेसमान ' असं म्हणत मुक्त संचार असतो. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांच्याकडे गेलो. तिथेही ' फायर हाउस ' च्या वरच्या कठड्यावर शंकररावांचा सत्य साईबाबांसमवेत काढलेला फोटो होताच.

थोड्याच वेळात सुहास्य वदनानं अंबिकाबाई बाहेर आल्या. गोऱ्या, सडसडीत, उंच, भव्य कपाळ, सुंदर हास्य, पाहताक्षणीच छाप पाडणारं व्यक्तिमत्त्व. आम्ही आतल्या दिवाणखान्यात गेलो. जाड फोमच्या कोचावर बसल्यामुळं उगीचच अवघडल्यासारखं झालं. मुलाखतीला सुरुवात झाली.

' संजयच्या निधनामुळं भारतीय राजकारणामध्ये मोठा बदल घडून येणं अपरिहार्यच आहे आणि त्यामुळं माझ्या राजकीय मतांमध्येही फरक पडणार आहे.

' १९८० च्या लोकसभा निवडणुकीत नकारात्मक मतदानामुळंच इंदिराजी सत्तेवर आल्या. त्या वेळी जर देशात इंदिरा-लाट असती तर त्यांना मिळालेल्या मतांच्या टक्केवारीत निश्चितच लक्षणीय वाढ झाली असती; पण आता लोकांची जुगार खेळण्याची इच्छा नव्हती. म्हणूनच त्यांनी जशी जनता पक्षाला कारभाराची पूर्ण संधी दिली तशीच या वेळी लोकसभा व विधानसभांच्या निवडणुकींमधून इंदिराजींना दिली आहे.

' पण गेल्या सहा महिन्यात नव्या सरकारनंही भरीव कामगिरी केलेली नाही. महागाई वाढत आहे, कायदा व सुव्यवस्था तर साफ कोलमडली आहे. अर्थमंत्र्यांनी सादर केलेलं अंदाजपत्रक हे सामान्य जनतेसाठी असलेलं अंदाजपत्रक आहे असं म्हणता येणार नाही. त्यामुळे देशाच्या खालावत चाललेल्या आर्थिक परिस्थितीत काडीमात्र बदल होणार नाही. थोडक्यात, अजूनही इंदिराजींना त्यांचा सूर गवसायचा आहे.

' संजयच्या निधनामुळं आता त्यांना अगदी एकाकी वाटत असेल. त्यामुळं नव्या परिस्थितीत त्या कशा वागतील याचा तर्क करणं कठीण आहे. कदाचित आपलं दुःख बाजूला ठेवून इंदिराजी महत्त्वाच्या राष्ट्रीय प्रश्नांवर स्वतःचं लक्ष केंद्रित करतील. आसामचा प्रश्न, कुटुंबनियोजन, आर्थिक दुरवस्था या कोणत्याही एका राजकीय पक्षाच्या हातामध्ये न राहिलेल्या समस्या सोडवण्याकडे, देशाची एकात्मता टिकवून धरण्याकडे त्या इथून पुढल्या काळात अधिक लक्ष देतील; पण हे सर्व यशस्वी करण्यासाठी इंदिराजींनी इतरांचंही सहकार्य घेतलं पाहिजे. अन्यथा या प्रयत्नांना अर्थ उरणार नाही. तसंच त्यांच्यावर कोसळलेल्या आपत्तीमुळं साऱ्या देशाची सहानुभूती पुन्हा एकवार इंदिराजींना लाभली आहे. तिचा उपयोग केवळ संजयची स्मारकं उभारण्यापेक्षा राष्ट्रीय पातळीवरील समस्या सोडवण्यासाठी त्यांनी केला पाहिजे.

' संजयबरोबर मी दोन वर्षं काम केलं. त्याच्यामध्ये जबरदस्त डायनॅमिझम होता; पण त्याचं सर्व वागणं, करणं फक्त परिणामाभिमुख होतं. The end justified the means. असं त्याला वाटत असावं. परिवर्तनातील मधले टप्पे गाळून तो एकदम गलिच्छ वस्ती आणि स्वच्छ, सुंदर कॉलनी अशी दोनच टोकं पाहू शकत असे. एकूणच He was a man in a great hurry !

' खुशामतखोरांबद्दल संजयला तिटकारा होता. अशा लोकांना तो वाऱ्यालादेखील उभं राहू देत नसे. इतर राजकारण्यांसारखं लोकांना झुलवत न ठेवता तो कोणालाही एक तर पूर्ण पाठिंबा देत असे किंवा त्याच्याकडे ढुंकूनही पहात नसे. म्हणूनच त्याच्याशी एकनिष्ठ असणाऱ्यांचा एक जबरदस्त गट निर्माण झाला आणि त्याच्यावर कठोर टीकाही होऊ लागली. अर्थात लवकरच तो देशाचा पंतप्रधान होईल असं म्हणणं मात्र मला अतिशयोक्तिपूर्ण वाटत असे. कारण संजयपेक्षाही लोकमताचा भक्कम पाठिंबा श्रीमती गांधींनाच होता आणि आहे.

' यापुढील काळात इंदिराजींनी त्यांच्या स्वतःच्या पक्षातल्या लोकांशीच नव्हे, तर विरोधकांशीदेखील संघर्ष करण्यापेक्षा जुळवून घेण्याचं, सहकार्याचं धोरण ठेवलं पाहिजे.

' मी इंदिराजींचा पक्ष सोडला याला काही वैयक्तिक कारणं आहेत. काही लोकशाही मूल्यांशी बांधिलकी ठेवूनच आपण राजकारणात भाग घेतला पाहिजे, असं मला सतत वाटत आलं आहे. कारण राजकीय पक्षांच्या फाटाफुटीतून काहीही साध्य होऊ शकणार नाही. म्हणूनच काँग्रेस फोडण्याला माझा विरोध होता; पण ती फुटल्यावर जी काँग्रेस मला खरी काँग्रेस वाटते तिला मी चिकटून राहिले.

' आणीबाणीच्या काळातल्या अत्याचारांना इंदिराजी व संजयप्रमाणेच आम्हीही अनेकजण जबाबदार आहोत. खुशामतखोरी करून आम्हीही इंदिराजींचं नुकसानच जास्त केलं. सर्वसामान्य माणसापासून आम्ही त्यांना अलग पाडलं.

' मी जेव्हा यूथ काँग्रेस–आयची अध्यक्ष होते त्या काळात काही दुराचारी गट आमच्या संघटनेत जरूर निर्माण झाले; पण त्यामुळं सबंध संघटनाच बाद ठरवून चालणार नाही. त्या काळात माझ्या चारित्र्यहननाचाही बराच प्रयत्न झाला; पण ज्यांचं मन विकृत असतं तेच अशा तऱ्हेचे उद्योग करतात असं माझं ठाम मत असल्यानं मी कधीही असल्या आरोपांना उत्तर देण्याच्या भानगडीत पडले नाही; पण काही मूलभूत मुद्द्यांवर माझे मतभेद झाले. तसंच माझी निष्ठा व प्रामाणिकपणाबद्दलही संशय व्यक्त करण्यात येऊ लागले. मग मात्र त्या संघटनेत राहणं मला अशक्य झालं; पण संजयच्या

बाबतीत मी हे स्वत:च्या अनुभवांमधून खात्रीनं सांगू शकेन की तो लोकांना वाटायचा तसा हटवादी किंवा हेकेखोर नव्हता. फक्त तुमचा मुद्दा तुम्हाला त्याला पटवून देता आला पाहिजे. मी अध्यक्ष असताना उत्तर प्रदेशातील यूथ कॉंग्रेसची काही युनिटस बरखास्त करावीत असा विचार पुढे यायला लागला होता; पण तिथले कार्यकर्ते चागले आहेत हे माहीत असल्यामुळं मी त्याला जोरदार विरोध केला आणि संजयलाही माझं म्हणणं पटलं. ती युनिटस् शाबूत राहिली.

'रुखसाना सुलताना मात्र मला अजिबात परिचित नाही. तिची नि माझी कधी ओळखच झाली नाही. दिल्लीमध्ये कुटुंबनियोजनाचं काम ती स्वतंत्रपणे पहात होती; पण यूथ कॉंग्रेसशी तिचा कधीच संबंध आला नाही.

'आज भारतीय राजकारणात आयाराम-गयारामांचं प्रमाण फारच वाढलं आहे; पण तरीही गेली तीन वर्षं मी अरस-कॉंग्रेसची पंजाबमधील एकमेव खासदार म्हणून घट्टपणे उभी आहे. किमान मी एवढं तरी मोठ्या अभिमानानं सागू शकेन की मी राजकारणात कधीही पक्षांतर केलं नाही!'

अंबिकाबाईंची मुलाखत इंटरेस्टिंग झाली. एकाच वेळी अनेक विचारांनी मनात गर्दी केल्यासारखं त्यांचं बोलणं होतं. देशाची सद्य:स्थिती आणि समस्यासंबधी बोलत असतानाच एकदम त्या इंदिराजीबद्दल बोलायला लागायच्या तर तो मुद्दा कुठं तरी मध्येच सोडून संजयविषयी बोलायला सुरुवात करायच्या. त्यांचं मूल्यमापन करत असतानाच स्वतःच्या राजकीय प्रवासाची हकीकत सांगायला लागायच्या. एकदा तर बोलता बोलता त्या मधेच उठल्या आणि यूथ-कॉंग्रेस आयच्या अध्यक्षपदाच्या राजीनाम्याचं इदिराजीना पाठवलेलं लाबलचक पत्र कपटातून काढून त्यानी वाचून दाखवलं. सजयविषयी बोलताना मात्र अंबिकाबाई जरा जास्तच गंभीर आणि कॉन्शस व्हायच्या.

¤

अंबिकाबाईंच्या अलिशान फ्लॅटमधून मिरमिरणाऱ्या कॅम्पाकोलाची बाटली ढोसून बाहेर पडलो तेव्हा अकरा वाजून गेले होते. ऊन चांगलंच जाणवायला लागलं होतं; पण झाडांमुळं अधूनमधून सुखद गारवा जाणवत होता. बस-स्टॉपवर जाऊन उभा राहिलो. पधरा-वीस मिनिटांनी एक बस आली. स्टॉपवर आणखीही पाच-सहाजण होते; पण धक्काबुक्की किंवा ढकलाढकली न करता सर्वजण शांतपणे बसमध्ये चढले. 'दिल्लीत बसने प्रवास करणे अगदी नको होतं' या ऐकीव गोष्टीला धक्का बसला होता. इथल्या बसेसमध्ये कंडक्टर उभा राहून, बसभर फिरून लोकाना तिकिटं देत नाही. तो बसमध्ये दारातून आत गेल्यावर डाव्या हाताच्या सीटवर बसलेला असतो. लोकानीच त्याच्याजवळ जाऊन तिकिट घ्यायचं असतं. या कंडक्टरजवळ पैसे ठेवायला चामड्याची बॅग किंवा तिकिटासाठी पत्र्याचा स्क्रू लावलेला बोर्ड नसतो. या दोन्ही गोष्टी तो हाताच्या बोटामध्ये लीलया साभाळत असतो. तसंच तिकिट पच न करता विवक्षित जागी ते थोडंसं फाडूनच तो लोकांना देतो. बसमध्ये डाव्या बाजूची पाच-सहा बाकं खास स्त्रियासाठी राखीव असतात. त्या ठिकाणी एखादा पुरुष बसल्यास बस थाबवून त्याला तिथून उठवण्यात येईल, असा फतवा मी दिल्लीत असतानाच 'दिल्ली परिवहन निगम' तर्फे काढण्यात आला होता. त्यामुळं मी त्या बाकड्यांवरच काय, एकूण बसमध्येच बसायला बिचकू लागलो. बसच्या दारापासून पाठीमागच्या भागात बाकडीच नसतात. त्यामुळं तिथं गर्दीच्या वेळी दहा-पंधरा लोक सहज उभे राहू शकतात. तसच बाकांच्या दोन रागामधली मोकळी जागाही पुण्या-मुबईतल्या बसेसमधल्या जागेपेक्षा जास्त असते.

सुमारे वीस-पंचवीस मिनिटाच्या प्रवासानंतर बस रिगल थिएटरपाशी येऊन थांबली. तोच तिचा शेवटचा स्टॉप होता. हा सर्व भाग अतिशय गजबजलेला. मुबईच्या व्ही. टी. स्टेशनबाहेरच्या कार्पोरेशन टाइम्स ऑफ इडियाची इमारत, मेट्रो टॉकीज या परिसराची आठवण करून देणारा. रिगल थिएटरपासूनच दुसरी बस घेतली आणि 'लोदी इस्टेट'ला गेलो. जनता पक्षाचे सरचिटणीस रामकृष्ण हेगडे, खासदार पिलू मोदी याचे बंगले या भागात आहेत. रामकृष्ण हेगडे बाहेरगावी गेले असावेत. बंगल्यात कुणीच नव्हतं. पिलू मोदींच्या बंगल्यात त्यांचे पी. ए. होते. त्यानी नाव वगैरे विचारलं. संध्याकाळी सहा वाजता मोदीसाहेबाची गाठ घालून देण्याचंही आश्वासन दिलं. पुन्हा 'रिगल' बसनं येऊन तिथून स्कूटरनं करौलबागेतल्या पूना गेस्ट हाउसच्या रूमवर आलो तेव्हा दीड वाजून गेला होता.

¤

संध्याकाळी सहाला पाच मिनिटं कमी असतानाच ३, लोदी इस्टेट या खासदार पिलू मोदींच्या निवासस्थानी दाखल झालो. बंगल्या सभोवती भरपूर वृक्षराजी, विविध प्रकारची फुलझाडं. सुदर लॉन.

मोदीसाहेब बाहेरून यायचे होते. बंगल्याच्या बाहेरच्या भागात त्याच ऑफिस थाटलेलं आहे तिथं तिघे-चौघेजण गप्पा मारत होते. एक गृहस्थ वर्तमानपत्रातल्या बातम्या वाचून महत्त्वाच्या बातम्यांवर कात्रणासाठी खुणा करत होते. सव्वासहाच्या सुमारास एक ॲंबॅसेडर दारात उभी राहिली. गाडीचं दार उघडून मोदीसाहेब बाहेर पडले. अवाढव्य देह, गोरापान रंग, गोल चेहरा, चेहऱ्यावर मिष्किल हसू. भट्टीचा पांढरा झब्बा आणि लेंगा. सगळं अगदी ऐसपैस काम! माझ्याव्यतिरिक्त आणखीही दोघ-तिघे जण मोदीसाहेबाना भेटायला आले होते. त्यामध्ये मिझोरामच्या जनता पक्षाच्या अध्यक्षाचाही समावेश होता. ईशान्येकडल्या या डोंगराळ प्रदेशातही जनता पक्षाचं नाव जाऊन पोचलं आहे हे पाहून बरं वाटलं.

पंधरा-वीस मिनिटानी मला आतमध्ये बोलावण्यात आलं. एका जाड फोमच्या सोफ्यावर मोदीसाहेब पसरले होते. हॉलमध्ये टेबललॅंपचाच फक्त उजेड होता. कूलरही चालू होता. आमचं बोलणं सुरू होणार इतक्यात एक दोघंजण आत आले. मोदीसाहेबांच्या प्रकृतीची विचारपूस करत खुर्चीवर बसले. 'गेल्या काही महिन्यात मी साठ पौड वजन कमी केलंय.' मोदीसाहेब सागत होते आणि अचानक माझ्याकडे बघून म्हणाले, 'सतीश, कॅन यू इमॅजिन्?' मी म्हटलं, 'I am trying to imagine what it must be before!' मोदीसाहेब खळाळून हसले. मुलाखतीला सुरुवात होण्यापूर्वी साप्ताहिकाची चौकशी केली. मला म्हणाले, 'तू मराठी साप्ताहिकासाठी मुलाखत घेत आहेस आणि तरी तुझं इंग्लिशही चांगलं आहे, हे

कसं ? ' मी म्हटलं, 'मी इंग्लिश घेऊन एम. ए. केलं आहे.' 'मग त्यानं काय होतंय ? आमचा हा दोस्त बघ. बी. एस्सी. एल एल. बी. आहे; पण त्यामुळं त्याच्या बुद्धीत काही फरक पडल्यासारखं दिसत नाही.' मी म्हटलं, 'तो दिल्ली विद्यापीठाचा पदवीधर असेल, मी पुणे विद्यापीठाचा आहे!' पुन्हा एकदा मला हलकासा धपाटा मारत मोदीसाहेब दिलखुलास हसले. मुलाखतीला अतिशय मोकळ्या वातावरणात सुरुवात झाली. इंदिराजींच्या सरकारचं नाव काढताच मोदीसाहेबानी लोकसभेत सादर केलेल्या अंदाजपत्रकावर हल्ला चढवला.

'लोकमताचा भक्कम पाठिंबा असूनही नव्या सरकारची कार्यपद्धती दिशाहीन आहे. त्याच्याजवळ कोणताही स्पष्ट विधायक कार्यक्रम नाही आणि They have produced a hot budget, on a hot day, which will heat up the economy during a power-failure.

'या फसव्या अंदाजपत्रकामुळं किंमतवाढही फार मोठ्या प्रमाणावर होईल आणि त्यामुळं मान्सून जरी उत्तम झाला तरी देशातल्या परिस्थितीमध्ये फारसा फरक पडणार नाही. अंदाजपत्रकातील आकडेवारीमधून सामान्य जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न या शासनाने केलेला आहे. वार्षिक अंदाजपत्रकात १५०० कोटी रुपयांची तूट दाखवणारा हा पहिलाच अर्थमंत्री असावा; पण त्यामुळं १९८१ च्या मार्चमध्ये हा आकडा कुठं जाऊन पोचेल हे अस्मानातल्या देवाला आणि भुईखालच्या दैत्यालाच ठाऊक !

'सुरुवातीला मी असं म्हटलं की या सरकारची कार्यपद्धती दिशाहीन आहे. माझं चुकलं. यांची दिशा ठरली आहे. It's all upwards !

'संजयनं सतत कायद्याच्या कक्षेबाहेर राहूनच जगण्याचा प्रयत्न केला. तो सर्व नियम, कायदे, संकेत मोडूनच वागत होता. त्याच्या या जीवनपद्धतीनंच त्याचा शेवटही वर्तवला होता. कारण जे त्याच्या जगण्याचं वैशिष्ट्य होतं तेच त्याच्या मृत्यूचंही वैशिष्ट्य ठरलं !

'मी तर थोडं पुढं जाऊन असंही म्हणेन की त्याचा तऱ्हेवाईकपणा, लहरीपणा सांभाळणाऱ्या, त्याला खत-पाणी घालणाऱ्या संजयच्या मित्रानी आणि पाठीराख्यानीच त्याचा खून केला आहे आणि एअर-मार्शल झहीरसारख्या संजयच्या खऱ्याखुऱ्या मित्राला मात्र संजयचे प्राण वाचवण्याचा प्रयत्न करत असताना स्वतःचीच नोकरी गमावून बसावं लागलं. संजयमध्ये काही डायनॅमिझम होता, असं जर कोणी म्हणत असेल तर मी इतकंच म्हणेन की डायनॅमिझमचा अर्थच मला कळत नाही.

'इंदिराजींच्या दृष्टीनं मात्र संजयचं निधन हा फार मोठा 'लॉस' आहे. त्याच्या निधनामुळं त्या ज्याच्यावर विश्वास ठेवायच्या असा एकमेव सल्लागार, ज्याच्यावर अवलंबून राहायच्या असा एकमेव पाठीराखा आणि ज्याच्याभोवती भविष्यातील सर्व आशा केंद्रित झाल्या होत्या असं एकमेव आशास्थान इंदिराजींनी गमावलं आहे. आता त्यांना सल्ला, पाठिंबा व आशेसाठी दुसरीकडे पहावं लागेल आणि तसं कोणी त्याना भेटणंही कठीण आहे !

'अर्थात या घटनेमुळं इंदिराजींच्या पक्षीय राजकारण किंवा प्रशासन हाताळण्याच्या पद्धतीत फार मोठा बदल लगेच घडून येईल असं मला वाटत नाही. तूर्त तरी त्या नित्याच्या व्यवहारानुसार या गोष्टी हाताळतील; पण इथून पुढल्या काळात देशाच्या राजकारणाला योग्य वळण द्यायचं असेल तर देशातल्या सर्वसामान्य जनतेनंच त्याच्या नाड्या स्वतःच्या हाती घेतल्या पाहिजेत आणि गेल्या अडीच-तीन वर्षांच्या काळात जनतेला दगा देणाऱ्या विरोधी पक्षाच्या नेत्यांना संपवून टाकलं पाहिजे. या यादीत जनतेला वाटत असेल तर माझादेखील समावेश करायला हरकत नाही; पण हे झाल्याशिवाय सध्याच्या डफफड सत्तारूढ पक्षाला समर्थ पर्याय निर्माण होऊ शकणार नाही!'

मोदीसाहेब उजवा पाय सोफ्याच्या कडेवर टाकून डावा पाय हलवत बोलत होते. इंदिराजींच्या सरकारवर हल्ला चढवताना त्यांच्यामध्ये आवेश निर्माण व्हायचा. संजयच्या निधनाबद्दल बोलताना ते गंभीर व्हायचे; पण मध्येच कुठे तरी मिष्किलपणे हसत I don't know dynamism, असं म्हणून प्रश्नाला बगल देत देत उत्तरही देऊन टाकायचे. 'जनतेनेच दगा देणाऱ्या नेत्याना संपवलं पाहिजे' असं सांगताना झटकन स्वतःही त्या कल्पनेनं भारावून जायचे. शेवटी चर्चा जनता पक्षाच्या १९८० च्या लोकसभा निवडणुकीतील दारुण पराभवावर आली. आम्ही जनतेसाठी इतके विविध उपक्रम यशस्वीपणे राबवूनही आम्हाला पराभव पत्करावा लागला, याच शल्य मोदीसाहेबांच्या मनात खुपत होतं; पण चांगल्या कामापेक्षा केंद्रात भक्कम, स्थिर शासन असण्याला जनता अधिक प्राधान्य देते हा विचार त्याना पटत नव्हता. ◻

मोदीसाहेबांचा निरोप घेऊन बाहेर पडलो तेव्हा संध्याकाळचे सात वाजून गेले होते. आठ वाजता इंदिरा काँग्रेसचे महाराष्ट्रातून निवडून गेलेले खासदार शिवराज पाटील यानी बोलावलं होतं म्हणून मी भराभर पावलं उचलायला लागलो. इतक्यात मोदीसाहेबांच्या बंगल्यातून एक गृहस्थ, थोडासा गडबडीनंच माझ्या मागं आला. मला थांबवून त्यानं नाव वगैरे विचारलं—त्याचं नाव होतं श्री. बॅनर्जी. बंगाली माणूस. मला म्हणाला, 'आसाम आंदोलनाबाबत तुम्ही सर्व पत्रकार बंगाल्यांविरुद्ध का उठला आहात हे मला कळत नाही!' मी म्हटलं, 'आम्ही बंगाल्यांविरुद्ध उठलेलो नाही. आम्ही आसामच्या बाजूनं उभे राहिलो आहोत.' मग बॅनर्जीसाहेबानी आजपर्यन्त बंगाल्यानी देशासाठी खाल्लेल्या खस्ता आणि तरीही त्याची झालेली उपेक्षा याचं दहाएक मिनिटं विवेचन केलं. शेवटी हात जोडून मला म्हणाले, 'आत्ता तू अगदी तरुण पत्रकार आहेस पण माझी खात्री आहे की, एक दिवस तू मोठा प्रसिद्ध होशील. माझी तुला एकच विनंती आहे. तू काय हवं ते लिही, पण कृपा करून बंगाल्यांविरुद्ध काहीही लिहू नकोस...' मी तसं आश्वासन देऊन बॅनर्जीसाहेबांचा निरोप घेतला. कारण माझं एक लक्ष घड्याळावर होतं

साडेआठच्या सुमारास धावत-पळत खासदार शिवराज पाटील याचा बंगला गाठला. ९, डॉ विश्वंबरदास रोड; पण खासदार घरी नव्हते थोडासा निराश झालो. का कोणास ठाऊक, त्याच्याबद्दल बरंचसं चांगलं ऐकलं असल्यामुळं या माणसाला भेटावं असं

वाटत होतं. रात्री पुन्हा घरी फोन केला. शिवराज पाटीलच फोनवर भेटले. त्यांनी अतिशय दिलगिरी व्यक्त करून दुसऱ्या दिवशी सकाळी साडेआठ वाजता बोलावलं.

¤

रविवार, ता. २९ जून. सकाळी उठलो आणि खासदार शिवराज पाटील यांचं घर गाठलं. डॉ.विश्वंबरदास रोडवर नऊ नंबरच्या बंगल्यात श्री. पाटील राहतात; पण त्यांच्या बंगल्याबाहेर नावाची पाटी नसल्यानं थोडा गोंधळ झाला. बंगल्याचा नंबरही पावसामुळं वाढलेल्या वेली-झुडपांनी काहीसा झाकून टाकला होता. समोरच्याच बाजूला पुण्यातून लोकसभेवर गेलेले इंदिरा काँग्रेसचे खासदार बॅ. विठ्ठलराव गाडगीळ राहतात. विठ्ठलरावांच्या बंगल्यासमोरची लॉनही अतिशय व्यवस्थित कापलेली, झटकन आरामखुर्ची टाकून चहा पीत गप्पा मारत बसावं असं वाटायला लावणारी.

श्री. शिवराज पाटील हे इंदिराकाँग्रेसतर्फे महाराष्ट्रातून लोकसभेवर निवडून गेलेले तरुण खासदार. महाराष्ट्र विधानसभेचे सभापती म्हणून काम करताना त्यांनी चांगला लौकिक मिळवला आणि आता दिल्लीत आल्यावरही लोकसभेतील अंदाजपत्रकावरील चर्चेमध्ये सत्तारूढ पक्षाच्या वतीनं सर्वांत प्रथम बोलण्याची संधी त्यांना देण्यात आली. प्रसन्न व्यक्तिमत्त्व असलेले श्री. पाटील बोलताना प्रत्येक शब्द तोलून, मापून त्याचा संदर्भ व होणारा अर्थ आधीच लक्षात घेऊन बोलतात. किंबहुना बोलत असतानाच एकीकडे त्यांच्या मनात त्या विषयाच्या संदर्भात काही तरी विचारप्रक्रियाही चालू असावी असं वाटतं. सहा महिन्यांपूर्वी सत्तेवर आलेल्या इंदिरा काँग्रेस पक्षाच्या सरकारविषयी प्रतिक्रिया व्यक्त करताना ते म्हणाले–

'जनता सरकारला कोणतीच दिशा नव्हती. आमच्या सरकारची दिशा ठरलेली आहे. आम्ही 'मध्यम मार्ग' अनुसरायचं ठरवलं आहे. काही वेळा तो डावीकडे झुकल्यासारखा वाटेल, काही वेळा उजवीकडे झुकल्यासारखा वाटेल, पण तरीही कार्यपद्धतीची मुख्य दिशा मध्यम मार्गीच राहील. जनता पक्षाच्या शासनामध्ये नेतृत्वाचा अभाव होता. आमच्याकडे नेतृत्वाचा अभाव आहे असं वाटत नाही. जे नेतृत्व आहे ते भक्कम आहे. पक्षातील सर्वांना त्याच्याबद्दल आदर, आपुलकी, विश्वास आहे. अर्थात इंदिराजींनंतर कोण हा विचारच आम्ही केलेला नाही. कारण एक तर इंदिराजीच आम्हाला अजूनही कित्येक वर्षं नेतृत्व देत राहतील असा आमचा विश्वास आहे आणि दुसरं म्हणजे एखाद्या क्रांतीप्रमाणंच नेतृत्वही परिस्थितीमधून निर्माण होत असतं.

'कै. संजय गांधी अशा तऱ्हेनं परिस्थितीतून निर्माण झालेले नेता होते. त्यांच्याकडे अनेक तरुण आकर्षित झाले. कारण इथून पुढं तरुणांकडे लक्ष दिलं जाईल, तरुणांना मान मिळेल अशी आशा त्यांनी निर्माण केली होती. काही तरी करून दाखवण्याची त्यांची जिद्द होती म्हणूनच देशाच्या सर्व भागातून त्यांच्यावर विश्वास ठेवणारी माणसं निर्माण झाली होती. संजय गांधींच्या निधनानं आमच्या पक्षाला याबाबतीतील उणीव पुन्हा जाणवण्याची शक्यता आहे.

'त्यांचं व्यक्तिमत्त्व वादग्रस्त ठरलं याला माझ्या मते दोन कारणं आहेत. एक म्हणजे जेव्हा तुम्ही एखादी गोष्ट वेगानं, विश्वासानं व ताकदीनं करू इच्छिता तेव्हा त्याला तेवढाच प्रखर विरोधही निर्माण होत असतो. तसंच काही वेळा व्यक्तिमत्त्व विनाकारण वादग्रस्त बनवलं जातं.

'इथून पुढील काळात संजयच्या अनुपस्थितीमुळं इंदिराजींना पक्षीय राजकारण व प्रशासन हाताळताना थोडेसे जास्त कष्ट पडतील, पण या दोन्हीही गोष्टी त्या पूर्वीइतक्याच चांगल्या तऱ्हेनं हाताळतील.

'कोणताही महत्त्वाचा निर्णय घेण्यापूर्वी इंदिराजी सर्वांचा विचार घेत नाहीत असं म्हणणं माझ्या मते धाडसाचं ठरेल. महत्त्वाच्या विषयांवर त्यांनी नेहमी सर्वांना विचारात घेतलं आहे. म्हणूनच इंदिराजींनी घेतलेले निर्णय नेहमीच योग्य व सर्वमान्य झाले आहेत. इथून पुढल्या काळातही त्यांच्या या तंत्रात फारसा बदल होण्याची शक्यता मला दिसत नाही.

'देशापुढील आसामच्या प्रश्नासारख्या समस्या सोडवताना सर्वच राजकीय पक्षांनी हे लक्षात घेतलं पाहिजे की, अशा नाजूक प्रश्नांची उकल करताना लोकांची मनं हळूहळू तयार करावी लागतील व मगच ते प्रश्न सोडवता येतील. तेव्हा अशा वेळी सर्व पक्षांनी या समस्यांचं राजकीय भांडवल न करता व्यापक देशहित लक्षात घेऊन पावलं टाकली पाहिजेत.'



खा. शिवराज पाटील

¤

सध्या लोकसभेमध्ये मांडण्यात आलेल्या अंदाजपत्रकाबाबत बोलताना श्री. पाटील यांनी 'सध्याच्या परिस्थितीत जितकं चांगलं अंदाजपत्रक देणं शक्य होतं तितकं चांगलं अंदाजपत्रक अर्थमंत्र्यांनी सादर केलं आहे' असं मत व्यक्त केलं.

मुलाखतीनंतर नाश्ता झाला. त्या वेळीही बहुतेक सर्व गप्पा राजकारणावरच झाल्या. कुठल्याही प्रकारचा आव न आणता बोलणाऱ्या या माणसाचं वाचन आणि चिंतन चांगलं असलं पाहिजे असं या गप्पांमधूनही प्रत्ययाला येत होतं. थोडक्यात, इंदिराजींच्या पक्षातील सध्याच्या खासदारांचा दर्जा ठरवायचा झाला तर श्री. पाटील त्यामध्ये बरेच वरचढ ठरतील.

श्री. पाटील यांनी त्यांच्या पत्नींचीही ओळख करून दिली. महाराष्ट्रीय शालीनतेचं त्या उत्कृष्ट प्रतीक होत्या. आपल्याकडे बहुतेक घरांमध्ये जाणवणारा आरडाओरडा, गोंधळ, स्वयंपाकघरातील आदळआपट या गोष्टी या घरामध्ये दोन–तीनदा गेलो तेव्हा एकदाही जाणवल्या नाहीत!

मुलाखत प्रसिद्ध होण्यापूर्वी तिचं हस्तलिखित वाचण्याची इच्छा श्री. पाटील यांनी व्यक्त केली. त्यामुळं त्याच दिवशी दुपारी रूमवर जाऊन मुलाखत लिहून काढली आणि संध्याकाळी पुन्हा ९, विश्वंबरदास

रोड गाठलं. टी. व्ही. वर राजेश खन्नाचा गाजलेला 'आनंद' चित्रपट चालला होता. मुकेशचं 'कही दूर जब दिन ढल जाये–' गाणं सुरू होतं. मी बेल दाबल्यावर श्री. पाटील बाहेर आले. मुलाखत वाचली. दोन तीन लहान दुरुस्त्याही केल्या. हा गृहस्थ स्वतः बोललेल्या शब्दाबद्दल जितका जागरूक असतो तितकाच मुलाखतीत लिहिल्या जाणाऱ्या शब्दाविषयीही होता, हे पाहून बर वाटलं. मुलाखतीचे कागद घेऊन निघालो. श्री. पाटील स्वतः दारापर्यंत सोडायला आले. 'पुन्हा कधी दिल्लीत आलात की अवश्य या!' असं प्रेमाचं निमंत्रणही दिलं. दिल्लीमध्ये इतक्या लोकाना भेटलो; पण हे निमंत्रण कुणीही दिलं नव्हत. त्यामुळं श्री. पाटील याच्या निमंत्रणानं फार बरं वाटलं. एका महाराष्ट्रीय खासदारानं दाखवलेली ही आत्मीयता अधिकच जाणवली. बाकी काही म्हणा, मनाच्या कोपऱ्यात कुठं तरी आपल्या मातीबद्दल आणि जातीबद्दल सूक्ष्म आपुलकी दडलेली असते, ती अशा प्रसंगी उचंबळून वर येते. ¤

सकाळी खासदार पाटील याची मुलाखत घेऊन बाहेर पडलो. समोरून दोन-तीन बसेस, टेंपो जाताना दिसले. टपाच्या एका बाजूला इंदिरा काँग्रेसचा तिरंगी झेंडा आणि दुसऱ्या बाजूला काळा झेंडा फडकत होता. आतली मंडळी 'संजय गाधी झिंदाबाद'च्या घोषणा देत होती. पुढल्याच चौकात दिल्ली प्रदेश युवक काँग्रेस-आयच्या वतीने शोकसभा होती.

चौकात उजव्या हाताच्या रस्त्यावरच मध्यभागी भव्य व्यासपीठ उभारलं होतं. व्यासपीठावर सुमारे चाळीसएक मंडळी बसलेली. दीड-दोन हजाराचा बसेस-टेंपोमधून आणलेला जमाव. गेल्या बुधवारी झालेल्या शोकसभेचीच ही छोटी आवृत्ती होती. बऱ्याच जणाच्या छातीवर सजय गाधीचं चित्र असलेले बिल्ले लावलेले होते. एकेक वक्ता उठत होता व संजयजीचं जमेल तेवढं, जमेल त्या तऱ्हेनं गुणगान करून खाली बसत होता. अचानक जमाव थोडासा पांगला. एक अँबॅसॅडर पुढं आली. गाडीतून गृहमंत्री झैलसिग उतरले. गर्दीतून वाट काढत व्यासपीठावर जाऊन बसले. विद्याचरण शुक्लानी आधीच येऊन हजेरी लावली होती. दिल्लीचे पोलीसआयुक्त पी. एस. भिंदरसाहेब सुद्धा होते. संजयजीच्या ऋणातून त्यानाही मुक्त व्हायचं होतंच. एका फोटोग्राफरनं या संधीचा फायदा घेऊन धंदाही सुरू केला होता. संजयचे विविध अँगल्समधून आणि पोझेसमधले फोटो मांडून तो बसला होता. अर्थात नेहमीप्रमाणं इथंही बघ्यांचीच गर्दी जास्त होती.

### आमच्याही हृदयावर!...

गर्दीतून युवक कॉंग्रेसचे काही कार्यकर्ते पुढं जाताना दिसले. त्यानी छातीवरच्या बिल्ल्यांबरोबरच काळ्या फितीही लावल्या होत्या. त्याना थोडंसं बाजूला घेऊन गेलो. सजय गाधीच्या निधनानंतरची दिल्ली पाहण्यासाठी एक माणूस पुण्याहून आला आहे, हे ऐकूनच त्यांचं ऊर भरून आलं. एकानं झटकन शर्टाच्या खिशातून बिल्ला बाहेर काढला. दुसऱ्यानं टाचणी दिली. युवाहृदयसम्राट आमच्याही हृदयावर आरूढ झाले.

सुरुवातीला थोडा वेळ सजयजीच्या निधनामुळ कधीही भरून न येणारी हानी, पोकळी इत्यादीवर अश्रुपात झाला. जे झालं ते झालं, आता पुढं काय? असं विचारल्यावर एकेकजण थोड-फार बोलायला लागला. परक्या माणसाला एखादा वाजवीपेक्षा जरा जास्तच काही तरी सागतोय असं लक्षात आलं की, इतरेजण त्याला दटावायला लागले; पण तरीही चर्चा बरी झाली.

या चर्चेतून मुख्य गोष्ट लक्षात आली ती म्हणजे संजयच्या निधनामुळं इंदिराजीना जो काही धक्का बसला असेल तसाच धक्का या तरुण कार्यकर्त्यांना बसला होता. अर्थात या दोन धक्क्यामागची कारण निराळी होती. संजयच्या नेतृत्वावर आणि कर्तृत्वावर विसंबून या मडळीनी भविष्यकाळातली अनेक स्वप्नं रचली होती. ती सारी स्वप्न संजयच्या निधनाबरोबरच धुळीला मिळाली याचं दुःख याना अधिक होत. दिल्लीपासून जवळच एका लहानशा गावात यूथ कॉंग्रेसच युनिट साभाळणाऱ्या एकाला आधी तालुकापातळीवर, मग जिल्हा आणि मग राज्यपातळीवर कामगिरी बजावायची होती. 'संजयजीच्या निधनामुळ आमचा स्फूर्तिदाताच नष्ट झाला!' असं तो म्हणाला; पण स्फूर्ती होती तेव्हा काय काम केलं असं विचारल्यावर जनता सरकारच्या काळात मोर्चे काढणं, निदर्शनं करणं, खटल्यांचा निषेध करणारी भित्तीपत्रकं चिकटवणं एवढच त्याच्या खात्यावर जमा झालं होतं! अर्थात या कर्तबगारीवर आपण विधानसभेत नाही तरी विधानपरिषदेत जाऊ असा त्याला विश्वास वाटत होता. विधानसभा निवडणुकीपूर्वीच तसा करार झाला होता, असंही त्यानं सांगितलं. सरकारी खात्यातल्या सेवकांना जशा बढत्या मिळतात, तशाच आपल्यालाही राजकारणात मिळत जातील असा त्याचा साधा सरळ हिशेब होता! दुसऱ्या एका कार्यकर्त्यानं संजयच्या व्यक्तिमत्त्वानं प्रभावित होऊन कॉलेजचं शिक्षणच सोडून दिलं होत. घरची भरपूर श्रीमंती. त्यामुळं संजयजी आले की, मी नेहमी गाडी घेऊन हजर होत असे असं त्यानं अभिमानानं सांगितलं. आता शिक्षण सोडून दिलेलं आणि प्रभावी व्यक्तिमत्त्वही नष्ट झालेलं, अशा परिस्थितीत पुढं करायचं काय, हा प्रश्न त्याला पडला होता. एका कार्यकर्त्याला पुण्याच्या फिल्म इन्स्टिट्यूटमध्ये प्रवेश हवा होता, तर दुसऱ्या एकाला संजयजीसारखाच सामान्य माणसाला परवडणाऱ्या डिझेलवरच्या मोटारीचा कारखाना काढायचा होता. एकानं मात्र संजयजीच्या निधनानं भिऊन हात-पाय न गाळता दोनशे झाडं लावून पाच कलमी कार्यक्रम पुढं चालू ठेवल्याचं सांगितल. राजकारणामध्ये रस असल्यामुळं मंत्रिपदाची हाव न धरता केवळ सामाजिक कार्य करण्यासाठी आपण राजकारणात उतरल्याचंही काही जणानी बजावून सांगितलं. हे करण्यासाठी तुमच्या पाठीशी किती तरुण उभे आहेत, असं विचारल्यावर मात्र या सर्वांनी हा काय खुळचटासारखा प्रश्न आहे, असा चेहरा केला. 'आम्ही स्वतःच आहोत की!' एकानं क्षणाचाही विलंब न लावता सांगितलं. 'काम करण्यासाठी संघटन कशाला लागतं?' तुम्ही नुसत काम करत राहायचं. त्याची 'नोंद' केव्हा ना केव्हा घेतली जातेच!' दुसरा एकजण म्हणाला. राजकीय-सामाजिक कार्यासाठी संघटनात्मक पाया तयार करण्याची कोणाला गरजच वाटत नव्हती.

बरं, आता सजयजीनंतर नेतृत्व कोणाकडे असं विचारल्यावर मात्र सर्वांच्याच चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह उमटलं. त्यातल्या त्यात जो चलाख होता त्यानं 'माताजी सागतील

त्याच्याकडे ' असं उत्तर देऊन टाकलं. इतरांनीही त्याच्या सुरात सूर मिसळला; पण हळूहळू 'मला विचाराल तर....' असं म्हणून मंडळी बोलायला लागली. ह्यावरून असं लक्षात आलं की, आता या यूथ काँग्रेसमध्ये किमान चार गट पडले होते. जगदीश टायटलर, कमलनाथ, संजयसिंग आणि महाराष्ट्रातून निवडून गेलेला गुलाम नबी आझाद. या चौघाचे पाठिराखे आपलाच माणूस सध्याच्या परिस्थितीत सजयची स्वप्नं कशी साकार करू शकेल हे पटवून देण्याचा प्रयत्न करत होते. संजयचे डावे-उजवे हात असल्याचा टायटलर आणि कमलनाथचाच आता त्या जागेवर विनम्र अधिकार पोचतो. कारण त्यानाच संजयजीच्या स्वप्नातला भारत समजला आहे असं काही जणांचं म्हणणं, तर संजयसिंगला उत्तर प्रदेशांत बऱ्यापैकी 'बेस' असल्यामुळं तोच आता ही संघटना समर्थपणे हाताळू शकेल, असा काहींचा विश्वास. राजीव आणि मनेकाचा मात्र कोणी फारसा विचार करायला तयार नव्हतं. अर्थात अधूनमधून 'माताजी सांगतील तोच आमचा नेता' हे पालुपद होतंच, पण कोणत्याच गटाला ही अचानक चालून आलेली संधी सोडायची नव्हती. कारण आता जो नेता होईल, त्यालाच आम्ही माताजीनंतर पंतप्रधान करणार, असंही हे सर्व कार्यकर्ते बजावून सांगत होते.

थोडक्यात सागायचं तर सर्वच जण या नव्या संकटानं गडबडून गेले होते. त्यातून निर्माण झालेला अस्तित्वाचा प्रश्नही त्यांना भेडसावत होता आणि आता ही संधी सोडली तर पुढे अभ्युदय नाही हेही त्यांना जाणवत होतं. संजयनंच यांच्या नेत्यांना मोठं बनवलं होतं; पण आता ते अधिकारावर गेल्यावर आपल्याला मोठं करतील याची कोणालाच खात्री नव्हती. म्हणूनच आपापसात सभाविचारविनिमयाला सुरुवातही झाली होती. हे लोण केवळ दिल्ली आणि उत्तरप्रदेशपर्यंतच मर्यादित राहिलं नव्हतं. अगदी पुण्यातसुद्धा शहर युवक काँग्रेस– आयच्या अध्यक्षपदावर तिघा जणानी हक्क सांगायला सुरुवात केली होती!

निघता निघता एकानं आपला पत्ता दिला आणि पुण्यातलेच आहात तर फिल्म इन्स्टिट्यूची प्रॉस्पेक्टस आणि फॉर्म मला पाठवा, अशी विनंती केली. मंडपाच्या बाहेर पडलो. छातीवरचा संजय गांधीचा बिल्ला काढून टाकला आणि स्कूटर पकडली.

### अकबर रोड....

दुपारी असं काँग्रेसचे ज्येष्ठ नेते यशवंतराव चव्हाण यांना फोन केला. स्वतः साहेबच फोनवर आले! थोडंसं आश्चर्य वाटलं. 'केव्हा वेळ देऊ शकाल?' असं विचारल्यावर 'आज दुपारी चार वाजता या!' असं उत्तर मिळालं फार बरं वाटलं.

साडेतीन वाजताच रूमवरून निघालो. स्कूटरवाल्याला सांगितलं– १ रेसकोर्स रोड. कृष्ण मेनन रोड मार्गे टाकून स्कूटर अकबर रोडवर आली. चौकात बराच बंदोबस्त होता डाव्या हाताला श्रीमती इंदिरा गांधींचं निवासस्थान होतं–१ अकबर रोड, पोलिसांनी स्कूटर थोडी अलीकडेच अडवली. कसलं तरी पठण चालू असल्याचे सूर कानावर येऊ लागले. चालत पुढं गेलो. इंदिराजींच्या निवासस्थानासमोर जाऊन उभा राहिलो. पोलिसबंदोबस्त कडक होता. घराबाहेरच्या फूटपाथवरच चपला–बुटांची रांग लागलेली होती. कोणालाही आत जाण्यास परवानगी होती. थोडं आश्चर्य वाटलं. चपला काढल्या आणि आत शिरलो. मंदिरात उत्सवाच्या वेळी असतात तशा दोऱ्या बांधल्या होत्या. एका बाजूनं पुरुषांना प्रवेश होता, तर दुसऱ्या बाजूनं महिलांना. थोडं पुढं जाणार तोच एका कार्यकर्त्यानं हटकलं. तुमच्याजवळ टोपी नाही?' 'नाही.' 'मग काही कापड, रुमाल तरी?' 'हो, आहे. रुमाल आहे.' 'तो डोक्याला बांधा नि मग पुढे जा!' खिशातून रुमाल काढला. रुमालाबरोबर बाहेर आलेली चार नाणी पुन्हा आत कोंबली. पावसात डोकं भिजू नये म्हणून बांधतात तसा रुमालाच्या चार टोकांना गाठी मारून तो डोक्याला बांधला. इतक्यात अनाउन्समेंट झाली. 'आता प्रधानमंत्री श्रीमती इंदिराजी गांधी बोलतील!' पठण थांबलं होतं. इंदिराजींनी गंभीर आवाजात बोलायला सुरुवात केली.

'गेली काही वर्षं भारतीय जनता माझ्यावर आणि माझ्या कुटुंबियावर जो प्रेमाचा वर्षाव करत आहे त्याबद्दल आम्ही सर्वजण आपले अत्यंत ऋणी आहोत.

'सजय माझा फक्त मुलगाच नव्हता. एखादा मोठा भाऊ जसा संकटाच्या वेळी पाठीशी उभा राहतो तसा तो माझ्या अडचणीच्या, आपत्तीच्या काळात कायम माझ्या पाठीशी खंबीरपणे उभा राहिला तो स्वतःला सबंध देशाचा, भारतमातेचा पुत्र मानत असे!

'माणसं काही विशिष्ट ध्येय घेऊन जन्माला येतात आणि अशा ध्येयांपोटीच मृत्यूला कवटाळतात. आता संजय आपल्यामध्ये राहिलेला नाही; पण ज्या गोष्टींमध्ये त्याला रस होता. ज्या गोष्टी घडवण्याचा त्याचा मनोदय होता, त्या करणं एवढं तरी आपण आता करू शकतो '

'पुन्हा एकवार तुमच्या प्रेमाबद्दल आभार!'

बाई जेमतेम पाच मिनिट बोलल्या असतील. आवाज जड झाला होता. गळा सारखा दाटून येत होता. प्रत्येक वाक्यानंतर थोडं थांबत होत्या. बाहेर फुटणारा हुंदका दाबून टाकण्याचा प्रयत्न करत होत्या. आपलं पंतप्रधानपद काही क्षण प्रथमच विसरत होत्या. सर्वत्र कमालीची शांतता होती. संजयच्या मृत्यूनंतर जनतेसमोर इंदिराजींनी केलेलं हे पहिलंच भाषण किंवा निवेदन!

'विधानसभा निवडणुकीच्या वेळी बारामतीला झालेल्या प्रचारसभेला गेलो होतो त्या सभेतही बाई दहा-बारा मिनिटंच बोलल्या होत्या. त्या वेळचा नूर काही वेगळाच होता. नशिबानं हात देऊन पुन्हा एकदा त्या या देशाच्या सत्ताधीश झाल्या होत्या; आता त्याच नशिबानं दगा देऊन त्याना विकलांग केलं होतं!

बाईंचं भाषण झालं नि तिथून बाहेर पडलो. समोरच्याच बाजूला खासदार यशवंतराव चव्हाणाचा बंगला आहे आत शिरलो. उजव्या हाताला असलेल्या भव्य दिवाणखान्यात बसायला सांगण्यात आलं. कोचावर टेकलो. मागं भिंतीवर वाघाची भव्य ट्रॉफी लटकत होती.

थोड्याच वेळात आत बोलावणं आलं. समोरच्या बाजूला असलेल्या एका लहानशा खोलीत गेलो. साहेब आले. धोतर आणि लांब बाह्याचा शर्ट अशा घरगुती पोषाखात होते. माझं मन एकदम भूतकाळात गेलं.

१९६५ साल. शास्त्रीजींच्या नेतृत्वाखाली पाकिस्तानबरोबरच्या युद्धात भार-



स्वा. यशवंतराव चव्हाण

¤

तीय सैन्यानं अभिमानास्पद कामगिरी बजावली होती. १९६२ च्या दारुण पराभवाच्या पार्श्वभूमीवर तिचं मोल जरा जास्तच वाटत होतं. यशवंतराव तेव्हा संरक्षणमंत्री होते. सह्याद्रीचा छावा हिमालयाच्या मदतीला धावून गेला होता! युद्धानंतर प्रथमच यशवंतराव नाशिक शहरात येत होते. संध्याकाळी उघड्या गाडीतून यशवंतरावांची मिरवणूक निघणार होती. ज्या रस्त्यावरून मिरवणूक जाणार होती त्या रस्त्यावर अग्निशामकदलाच्या बंबांनी पाण्याचे फवारे मारले होते. कै. ग. दि. माडगूळकरांनी 'औंधाचा राजा' या शीर्षकाखाली एक लेख लिहिला आहे. त्या लेखात त्यांनी राजा गावाला भेट देणार म्हणून गावात उडालेल्या धांदलीचं जे वर्णन केलं आहे अगदी तशीच धांदल त्या वेळच्या त्या छोट्या शहरात उडाली होती.

मिरवणूक निघाली. यशवंतराव गाडीमध्ये उभे होते. शेरवानी, बंद गळ्याचा जोधपुरी कोट, डोक्याला खादीची टोपी, बहुधा उजव्या हातात तलवारही होती. हारांचा वर्षाव होत होता. यशवंतराव प्रसन्न हसून अभिवादनाचा स्वीकार करत होते.

'म्हणजे संजयनंतरच्या दिल्लीची चाचपणी करायला आला आहात!' साहेबांनी हसत हसत विचारलं. माझी तंद्री भंग पावली. दिल्लीमध्ये येण्याचा उद्देश मी त्यांना सांगत होतो. राजकारणावर मनमोकळी चर्चा झाली. ज्या माणसाची भाषणं उन्हा–तान्हात हजारो फूट अंतरावरून ऐकली होती तो समोर जेमतेम पाच फुटांवर आरामखुर्चीत बसला होता; पण साहेब आता थकायला लागल्याचं स्पष्ट जाणवत होतं. विधानसभा-निवडणुकीच्या वेळी पुण्यात शनिवारवाड्यावर साहेबांची उत्कृष्ट प्रचारसभा झाली. त्या सभेच्या आरंभीच त्यांनी प्रकृती आता साथ देत नसल्याची तक्रार केली होती. तरीदेखील अजून उभारी कायम होती! 'वाड्या'वरून बाहेर पडलो तेव्हा साहित्य–संस्कृतीचा अनोखा ढंग असलेल्या एका मोठ्या राजकारणी माणसाला भेटल्याचा आनंद मनात दाटला होता.

¤

यशवंतरावांकडून निघालो. नेहमीप्रमाणं स्कूटर मिळण्याचा प्रश्न होताच. म्हणून पुढं मागं न पाहता सरळ चालायला लागलो. इंदिराजींच्या निवासस्थानी चाललेलं 'श्रीगुरु ग्रंथसाहेब'चं पठण संपलं होतं. बहुतेक गर्दीही निघून गेली होती. पोलिसखातंही 'रिपोर्ट' करून निघण्याच्या बेतात होतं. कृष्णमेनन रोड आला. याच रोडवर जगजीवनरामांचा बंगला आहे. सहज जाता जाता भेटले तर पहावं म्हणून आत शिरलो. बाबूजी बंगल्यात होते; पण त्यांच्याकडं कुणी तरी येऊन बसलं होतं. त्यांच्या पी. ए. नं सांगितलं की, तुम्ही उद्या संध्याकाळी सातच्या सुमाराला या. बाबूजींशी गाठ घालून देतो. बाहेर पडलो. बरंच अंतर चाललो. रायसीना रोड आला. या रोडवर अटलबिहारी वाजपेयींचा बंगला आहे. अटलजी तरी भेटतात का पहावं म्हणून बंगल्यात शिरलो; पण त्यांना तर तब्येत नादुरुस्त झाल्यानं सफदरजंग हॉस्पिटलमध्येच दाखल केलं होतं. चोवीस तास डॉक्टरांच्या देखरेखीखाली राहायचं होतं. एव्हाना आठ वाजायला आले होते. स्कूटर पकडली आणि पूना गेस्ट हाउस गाठलं.

¤

सोमवार, ता. ३० जून. आज सकाळी तिघा जणांनी मुलाखतीसाठी वेळ दिली होती. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे खासदार समर मुखर्जीकडे शुक्रवारी खासदार मधू दंडवतेंची मुलाखत घेतली तेव्हाच गेलो होतो. मुखर्जीसाहेब लुंगी आणि बनियन अशा वेषात होते. गोरापान रंग, भव्य कपाळ, उत्तम देहयष्टी. नाकावर जाड चष्मा. केस जवळजवळ पिकलेले. शनिवार-रविवार ते दिल्लीत नव्हते म्हणून त्यांनी आज सकाळी साडेआठ ते नऊच्या दरम्यान बोलावलं होतं.

सकाळी जरा लवकरच उठलो. तोंड वगैरे धुतलं आणि बाहेर पडलो. चहाची चूळ भरणं आवश्यक होतं. 'स्टेट्समन' विकत घेतला आणि समोरच्याच चहावाल्याच्या दुकानात जाऊन बसलो. दिल्लीतल्या या चहावाल्यांचंही एक वैशिष्टय आहे. ते स्टोव्हवर एकदम सात-आठ दहा कपांचं आधण कधीच ठेवत नाहीत. एका वेळी एकच कप. एकदम जास्त कप ठेवले नि तितक्या प्रमाणात लवकर गिऱ्हाईक आलं नाही तर नंतर तोच चहा पुन्हा उकळावा लागतो. त्यामुळं चहाची चव तर बिघडतेच; पण असा चहा अपायकारकही असतो, असं त्यांचं यावरचं स्पष्टीकरण! 'ग्राहक देवो भव' हे सूत्र याहून वेगळं काय सांगतं?

¤

१२, विंडसर प्लेस. खासदार समर मुखर्जींचं निवासस्थान. मुखर्जीसाहेब आंघोळीला गेले होते. पाचच मिनिटात आले. हॉलशेजारच्या लहानशा खोलीत चर्चेला सुरुवात झाली.

'जनता पक्षाच्या सरकारचं धोरण आणि इंदिराजींच्या सरकारचं धोरण यामध्ये मला कोणताच मूलभूत फरक दिसत नाही. उलट सध्याच्या सरकारचा इतिहास ते एकाधिकारशाहीवादी असल्याचं सांगतो. त्यामुळं आता भारतीय लोकशाहीला पुन्हा एकदा सरळसरळ धोका निर्माण झाला आहे. 'जनता' सरकारात काढून टाकण्यात आलेल्या अधिकाऱ्यांना पुन्हा मानाच्या जागा देऊन या सरकारनं ती भीती जास्त वाढवली आहे शिवाय राज्यांमध्येही आपल्या हाती सत्ता यावी म्हणून त्यांनी नऊ राज्यांच्या विधानसभाही बरखास्त करून निवडणुका घेतल्या व आपला हेतू साध्य केला. बहुपक्षीय पद्धती व संघराज्यात्मकतेवर हा उघड हल्ला आहे. यातून एकाच पक्षाच्या हाती सर्वंकष सत्ता केंद्रित करण्याचा डाव स्पष्ट होतो. त्यामुळं इतर राज्यातील बिगर इंदिरा काँग्रेसवादी आणि विशेषत: डाव्या विचारसरणीच्या शासनांच्या अस्तित्वाचाच

श्न निर्माण झाला आहे.

'याचबरोबर घटनेमध्ये आवश्यक ते दल करून संसदीय शासनपद्धतीच्या जागी ध्यक्षीय राज्यपद्धती आणण्याकडेही नव्या रकारचा कल दिसतो. त्यामुळं सध्या सत्तेत सलेल्या पक्षाची निरंकुश सत्ता कायम स्थापित करता येईल; पण हे होण्यासाठी ाज्यसभेमध्ये सत्तारूढ पक्षाला दोनतृतियांश हुमत आवश्यक आहे. म्हणून इंदिराजींनी या दृष्टीनंही प्रयत्न चालू केले आहेत.

'अर्थात अशा प्रकारची वृत्ती या शास- ाच्या आर्थिक धोरणांमधूनच निर्माण होत ाहे. यांचं आर्थिक धोरण भांडवलदारी, क्तेदारी, सरंजामदारी, परकीय मदत ाणि मल्टीनॅशनल्सना उपकारक असं आहे. ातूनच महागाई व चलनफुगवटा होण्यास दत होणार आहे; पण हे सगळं सुरळीत- णे पार पाडण्यासाठी या शासनाला सर्व कारच्या सामाजिक चळवळी आणि आंदो- ल्नं दडपून टाकणं आवश्यकच आहे. त्यामुळं यांना एकाधिकारशाहीच्या दिशेनं वाटचाल रणं क्रमप्राप्तच झालं आहे.

'संजय पंतप्रधानांच्या प्रोत्साहनामुळं देवसेंदिवस शासनामागील वाढती शक्ती नत चालला होता. मक्तेदार आणि भांडवल- तारांनीही त्याला उचलून धरलं. कारण त्यांचे वार्थ साधण्याचं तो अधिक विश्वासार्ह ाधन होता.

'पण त्याच्या निधनामुळं इंदिराजींच्या ासनपद्धतीमध्ये फारसा बदल घडून येईल सं मला वाटत नाही. सहकाऱ्यांचा सल्ला णं ही पूर्वीप्रमाणंच यापुढंही केवळ औप- चारिक बाब राहील. इंदिराजींचे पक्षातील हकारीही इंदिराजींनी घालून दिलेल्या ोरणांच्या चौकटीत बसतील असेच सल्ले ेत राहतील त्यामुळं नजीकच्या काळात तरी पंतप्रधानांच्या प्रशासन किंवा स्वतःचा क्ष हाताळण्याच्या पद्धतीत विशेष फरक डणार नाही.

मुखर्जीसाहेबांच्या बोलण्यामध्ये दोन विशेष ाणवले. एक म्हणजे कमीत कमी शब्दात े स्वतःचे मत तर्कशुद्ध पद्धतीनं मांडत होते आणि दुसरं म्हणजे संजयपासून विरोधी क्षांपर्यंत कोणत्याही विषयावर बोलताना प्रत्येक डाव्या विचारसरणीचा मनुष्य करतो तसं मुखर्जीसाहेब त्या विषयाचा सांधा अर्थ- शास्त्राशी कुठं ना कुठं नेऊन भिडवत होते.

¤

साडेनऊ वाजता राज्यसभेतील विरोधी पक्षनेते लालकृष्ण अडवानी यांनी बोला- वलं होतं. मुखर्जीसाहेबांकडून बाहेर पडलो तेव्हा नऊ वाजून दहा मिनिटं झाली होती. सुदैवानं स्कूटर चटकन मिळाली.

६, पंडोरा पार्क. अडवानींच्या बंगल्यात शिरलो तेव्हा साडेनऊला पाचएक मिनिटं कमी होती. वेळेवर पोचलो या समाधानात बेल वाजवली. एक गृहस्थ पुढं आले. अड- वानींनी मला साडेनऊची वेळ दिली आहे, हे ऐकून थोडे आश्चर्यचकितच झाले. कारण साडेनऊ वाजताच त्यांना एका महत्त्वाच्या मीटिंगला जायचं होतं. त्या गृहस्थांनी आत जाऊन निरोप सांगितला आणि मला आत- मध्ये बोलावण्यात आलं. अडवानी सोप्यावर बसले होते. भरपूर उंची. गोरा रंग. पांढरं- स्वच्छ दुटांगी धोतर आणि पांढराच शर्ट. पायात चपला अडकवलेल्या. मला अपॉइंटमेंट दिल्यानंतर अचानक एक महत्त्वाची मीटिंग ठरल्याचं अडवानींनी दिलगिरीच्या स्वरात सांगितलं. ह्या दिवशी संध्याकाळी किंवा रात्रीही त्यांना वेळ नव्हता. शेवटी दुसऱ्या दिवशी सकाळी मी पुन्हा फोन करायचं ठरलं; पण त्या अनिश्चिततेमुळं मी जरा नाराजच झालो होतो.

अडवानींकडून बाहेर पडलो. पुन्हा स्कूट- रच्या शोधात. थोडी झपाझप पावलं उचलत होतो. दहा वाजता खासदार शंकरराव चव्हा- णांनी बोलावलं होतं. इतक्यात मागून एक इंग्लिश कलरची अँबॅसॅडर आली. स्वतः अडवानीच ड्रायव्हिंग करत होते. गाडी माझ्यापाशी येऊन थांबली. 'कहाँ जाना है?' अडवानींनी हात बाहेर काढत विचा- रलं. 'अशोक रोड. ड्रायिंग टू टेक अ स्कूटर' राष्ट्रभाषेबद्दल आत्मविश्वास नसल्यानं आंग्लभाषेच्या कुबड्या घेतल्या. 'आओ, मैं रिक्षा-स्टॅंडतक छोड देता हूँ।' डाव्या हातानं अडवानींनी गाडीचं दार उघडलं. आत जाऊन बसलो. एक माजी केंद्रीय मंत्री – जो पुन्हा कधीही ते स्थान मिळवण्याची शक्यता आहे – ड्रायव्हिंग करत होता आणि मी शेजारीच आरामात बसलो होतो. फार थ्रिलिंग वाटलं.

कुठल्या तरी अरुंद रस्त्यावरून अडवानींनी सफाईनं गाडी काढली आणि रिक्षास्टॅंडपाशी आणून सोडलं. रिक्षावाला बहुधा त्यांना ओळखत असावा. तो एकदा त्यांच्याकडे नि एकदा माझ्याकडे आश्चर्यानं पहात राहिला.



खा. लालकृष्ण अडवानी

¤

¤

अशोक रोडवरच्या चाळीस नंबरच्या बंगल्याकडे चालू लागलो तेव्हा आकाश ढगांनी पूर्ण झाकळून गेलं होतं. बंगल्यात पोचेपर्यंतच पावसाला सुरुवात झाली. थेंब एवढे टपोरे होते की, बेल वाजवून शंकर- रावांच्या बंगल्याचे दार उघडलं जाईपर्यंत मी बऱ्यापैकी भिजलो होतो. शंकरराव आले. लोकसभेमध्ये जायच्या तयारीतच होते ते. त्यांची अपॉइन्टमेंट घ्यायला गेलो तेव्हाच शंकररावांनी प्रश्न लेखी मागून घेतले होते. कोचावर बसले आणि भराभर बोलायला लागले.

'संजयच्या निधनामुळं इंदिराजींच्या कार्यपद्धतीत काही फरक पडेल असं मला वाटत नाही. कारण त्याच्या मृत्यूमुळं पंत- प्रधानांना खाजगी रीतीनं सल्ला देणारी व्यक्ती नाहीशी झाली, यापलीकडे या घटनेचा फारसा परिणाम होणार नाही. कारण संजय असतानासुद्धा पक्षीय राजकारणात त्याचं कार्य उत्तरप्रदेशच्या हद्दीपर्यंत चालत होतं. ते वगळता इतर बाबतीत तो फक्त विविध घडामोडी पंतप्रधानांच्या कानांवर घालत असे एवढंच. स्वतः इंदिराजी मात्र ज्या ठिकाणी त्यांना सहकाऱ्यांच्या सल्ल्याची आवश्यकता वाटेल तिथं तो घेतच होत्या. हेच धोरण यापुढंही चालू राहील.

'ही गोष्ट खरी आहे की, संजयजी तरुणाना राजकारणात अधिक वाव मिळावा यासाठी प्रयत्न करत. त्यांच्या वर्तनामध्येही फरक जाणवू लागला होता. १९७५–७६ साली मी जेव्हा संजयजींना पाहिलं तेव्हा ज्येष्ठ माणसाबद्दल त्यांच्या मनात आदराची भावना फारशी नसायची. १९८० सालच्या संजय गांधींमध्ये मात्र ही भावना चांगलीच निर्माण होऊ लागली होती. सर्व ज्येष्ठ व्यक्तीचा योग्य तो मान ठेवून, आदर करून ते निर्णय घेऊ लागले होते. संजयजीनंतर इंदिराजी पुन्हा कुटुंबातलीच व्यक्ती पुढं आणतील असं नाही; पण तरुणांना पुढं आणण्याचा निश्चितपणे प्रयत्न करतील.

'संजयबरोबर आलेल तरुण रक्त जुन्या 'कॉंग्रेस संस्कृती' पेक्षा निराळं आहे असं मला वाटत नाही. ही जुनीच परंपरा आहे. तसंच पक्षाच्या मूळ तत्त्वज्ञानातही या नव्या रक्तामुळं काही फरक पडला आहे असं मला वाटत नाही. आता आचरणाबद्दलच बोलायचं झालं तर जुन्या आणि नव्या, दोघाबद्दलही तेच बोलता येईल.

'आपल्या देशातल्या विरोधी पक्षाचं खरं दुखण हे आहे की, ते एखादी तात्त्विक भूमिका घेऊन पक्षबांधणी करतच नाहीत. जे तसं करायचा प्रयत्न करतात ते कम्युनिस्ट पक्षासारख पक्ष अजूनही बरेच दुर्बल पक्ष आहेत; पण जर या निरनिराळ्या पक्षानी आपली तात्त्विक भूमिका निश्चित करून कामाला सुरुवात केली तर त्यातून जी शक्ती उभी राहील ती खरी विरोधी शक्ती ठरेल!'

लोकसभेला जाण्याची थोडी घाई असल्यामुळं शंकररावानी आपले विचार अगदी सूत्ररूपानं मांडले. त्यावर आणखी जास्त चर्चा होणंही शक्य होतं. विशेषतः त्यानी चार दिवस आधीच प्रश्न लेखी मागून घेतले होते. त्यामुळ त्यांच्याकडून जरा जास्त सविस्तर विश्लेषणाची अपेक्षा होती. त्यांच्या आजपर्यंतच्या कर्तृत्वानं ही अपेक्षा वाढवली होती; पण ती पूर्ण होऊ शकली नाही. कदाचित शंकररावाना पुरेसा वेळ मिळाला नसेल किंवा कदाचित असही असेल की मी दिलेल्या प्रश्नांवर याहून जास्त काही बोलावं असं त्याना वाटलं नसेल.

¤

माझ्यापाठोपाठच शंकरराव बाहेर पडले. त्यांना आधी रेसकोर्स रोडवर कोणाकडे तरी जायचं होतं आणि तिथूनच ते संसदेत जाणार होते. पाऊस थांबला होता, पण पुन्हा येणार नाहीच, याची हमी देता येत नव्हती. सहज लोकसभेत चक्कर टाकावी असं मनात आलं, म्हणून त्या दिशेनं चालायला लागलो. एवढ्यात पावसाला सुरुवात झाली. शेजारच्या पोस्टऑफिसच्या इमारतीत आसरा घेतला. पावसाचा जोर वाढतच होता.

### आग्नेयास्त्र ?

बसल्या–बसल्या सहज डायरी चाळायला लागलो. राज्यसभेत जाण्यासाठी घेतलेला पास डायरीत तसाच होता. वेळ काढायचाच होता त्यामुळं पासच्या पाठीमागच्या बाजूला हिंदी आणि इंग्रजीमध्ये दिलेल्या सूचना वाचायला लागलो. चार नंबरच्या सूचनेपाशी अडलो. 'गैलरी के अंदर छडी, छाता, हैंडबैग, अटैची केस, 'आग्नेयास्त्र', पुस्तकें आदि ले जाना मना है।' बाकी सर्व शब्द आणि त्यांचे अर्थ कळत होते. पण 'आग्नेयास्त्र'चा बोध होत नव्हता. पुराणकाळातल्या कथा मनात घोळायला लागल्या. लहानपणी या कथा ऐकताना यातल एखादं तरी अस्त्र आपल्या दप्तरात असाव असं सारखं वाटत असे. पासवरच्या त्या शब्दानं पुन्हा एकदा बालपण जागं केल. शेवटी इंग्रजी सूचना वाचायला लागलो आणि मग लक्षात आलं की 'फायर आर्म्स' या शब्दाच ते भाषांतर होत. संस्कृतप्रचुर भाषेचा भारदस्तपणा एका अगदी निराळ्या संदर्भात लक्षात आला.

त्या पासमुळंच लोकसभा – राज्यसभेच्या इमारती डोळ्यांसमोर उभ्या राहिल्या. ज्या व्यक्ती आपल्याला लांबून फार प्रभावी वाटतात त्याच खर मूल्य त्या विराट पसाऱ्याच्या पार्श्वभूमीवरच लक्षात येतं. खासदार यशवंतराव चव्हाण काळ्या अॅम्बॅसेडरमधून लोकसभेच्या मुख्य पोर्चमध्ये उतरतात आणि एकटेच आतमध्ये चालत जातात. ज्यांचं एके काळी भारताच्या पंतप्रधानपदासाठी नाव घेतलं जात होतं ते बाबू जगजीवनराम पोपटी रंगाच्या अॅम्बॅसेडरमधून मुख्य पोर्चच्या उजव्या हाताला असलेल्या लहान दरवाजापाशी उतरतात आणि आत जातात. त्यांच्याकडे दरवाजावरचा रखवालदार सोडता कुणाचंच फारसं लक्ष नसतं. महाराष्ट्रातून निवडून गेलेले इंदिरा कॉंग्रेसचे एक खासदार तर रंग उडालेल्या स्कूटरमधून येतात, स्कूटरवाल्याशी बदललेल्या भावाबद्दल थोडी घासाघीस करतात आणि त्यानं दिलेले सुट्टे पैसे पँटच्या खिशात टाकून सभागृहाकडे चालायला लागतात. अखिल भारतीय पातळीवर स्वतःची प्रतिमा निर्माण करणं ही किती अवघड गोष्ट असेल ते इथं लक्षात येतं. ज्यांना ते जमत नाही त्यांची किंमत साडेपाचशे जणांपैकी एक, एवढीच असते!

¤

पावसाचा वेग कमी झाला होता. एक स्कूटरही पोस्टऑफिसच्या इमारतीसमोर येऊन थांबली. चपळाईनं आत शिरलो. पाऊस नुसता ओतत होता. रस्त्यावर जागोजाग पाण्याची तळी–डबकी साठली होती. ती चुकवून वाट काढणं मोठं मुश्कील होतं. एका ठिकाणी तर कहरच झाला होता. रस्त्यावर डिव्हायडरच्या उंचीपर्यंत पाणी साचलं होतं. दहा-बारा पोरं कमरेला चड्डया अडकवून त्या पाण्यात अक्षरशः पोहत होती. स्कूटरवाल्यानं स्कूटर तशीच रेटली. स्कूटरच्या एका दारातून पाणी आत येत होतं आणि दुसऱ्या दारानं बाहेर निघून जात होतं. माझे पाय घोट्यापर्यंत पूर्ण भिजले होते. त्या पाण्यातून वाट काढत असताना काही मोटारीसुद्धा बंद पडल्या होत्या. काही क्षणातच आमच्या स्कूटरवरही ती पाळी आली. स्कूटरवाल्यानं खूप प्रयत्न केला; पण चालूच होईना! शेवटी त्या डुंबणाऱ्या पोरांनी नाचत येऊन धक्का दिला. स्कूटर पाण्याबाहेर निघाली.

त्या दिवशी दिल्लीमध्ये पावसामुळं दुसरा एक प्रसंग घडला तो तर लाजवाबच होता. दिल्लीत 'मिंटो ब्रिज' नावाचा एक पूल आहे. या पुलावरून जशी वाहतूक चालू असते तशीच पुलाखालूनही चालू असते. या पुलाखालून जाणाऱ्या रस्त्याला दोन्ही बाजूनी उतार आहे आणि बरोब्बर पुलाच्या कमानीखाली तो सर्वांत जास्त आहे. त्या दिवशी पावसामुळं इतर ठिकाणाप्रमाणं याही ठिकाणी पावसाचं भरपूर पाणी साठलं होतं. एक बस त्या रस्त्यानं चालली होती. ड्रायव्हरला वाटलं की पाणी जरी बरंच असलं तरी बसचं धूड त्यामधून सहज बाहेर काढता येईल. म्हणून त्यानं बस पाण्यात घातली आणि पुलाच्या कमानीखाली ती आल्यावर जाम रुतून बसली. बराच प्रयत्न केला, पण बस जागची हालेना. दरम्यान गंमत म्हणजे

त्या रस्त्याला दोन्ही बाजूंनी उतार असल्या-मुळं पाणी साचत चाललं होतं. त्याची पातळीही वाढत चालली होती. हळूहळू पाणी बसमध्ये शिरलं, बाकंसुद्धा पाण्याखाली गेली. आता मात्र सर्वांच्याच तोंडचं पाणी पळालं. आतमध्ये तीस-पस्तीस प्रवासी होते. ते सर्वजण काही तरी कसरत करून बसच्या टपावर चढले. शेवटी बोटी आणून या सर्वांची सोडवणूक करावी लागली !

¤

सकाळी एवढा धुवांधार पाऊस झाला; पण संध्याकाळी स्वच्छ ऊन पडलं होतं. सात वाजता जगजीवनरामांच्या पी. ए. नं बोलावलं होतं. थोडा आधीच निघालो. आज तरी अटलजी भेटले तर पाहायचं मनात होतं.

६, रायसीना रोड. अटलजींच्या बंगल्यात प्रवेश केला. एक मनुष्य पुढं आला. अटल-जींची चौकशी केल्यावर म्हणाला, 'आहेत की नाहीत हे पाहतो.' माझ्या साधारण लक्षात आलं. मी त्याच्याबरोबर एक चिठ्ठी दिली. त्यामध्ये 'माणूस'चा उल्लेख आवर्जून केला. कारण अटलजींना 'माणूस' चांगल्या तऱ्हेनं माहीत होता. मागं मुंबईत प्रचार-सभांसाठी आले असताना, अतिशय गडबडीत असूनसुद्धा त्यांनी श्री. विनय सहस्रबुद्धे यांना 'माणूस'साठी मुलाखत दिली होती. शिवाय एक स्वतः रचलेली कविता !

थोड्याच वेळात तो माणूस बाहेर आला. पाठोपाठ अटलजी. दोन आरामखुर्च्या समोरच्या हिरवळीवर टाकायला सांगण्यात आलं. अटलजींचं भव्य रूप प्रथमच इतक्या जवळून पाहात होतो. भव्य कपाळ, सावळा रंग, ओठांवर मिष्किल हसू. पांढरं शुभ्र धोतर आणि नेहरू शर्ट.

अटजींच्या पाठोपाठच तीन बुटकी, केसाळ कुत्री उड्या मारत आली. ती सारखी अटलजींच्या पायांत घोटाळत होती. हिर-वळीवर ठेवलेल्या खुर्च्यांमध्ये जाऊन बसलो. अटलजींना येण्याचा हेतू सांगितला. एकदम भाषणाला सुरुवात केल्याच्या थाटात अट-लजी बोलायला लागले —

'संजय होता तो अच्छा होता ! लोग समझ जाते कि क्या चैलेंज है !

'पण त्याच्या निधनानंतर इंदिराजींच्या



खा. अटलबिहारी वाजपेयी

¤

पक्षातले काही जुने नेते बंड करून उठतील असं मला वाटत नाही. निरनिराळ्या पक्षांच्या पसाऱ्यात इंदिराजी त्यांना सामावून घेतील. मला तर उलट असं वाटतं की, 'या क्षणी इंदिराजींना आपल्या आधाराची गरज आहे' असं म्हणून आजपर्यंत कसंबसं पक्षा-बाहेर राहिलेले लोकही त्या पक्षात घुसा-यचा प्रयत्न करतील. अर्थात आता कोणी पक्षातून बाहेर पडलं तरी त्यांनी विश्वासा-र्हता केव्हाच गमावली आहे.

'इंदिराजींच्या तंत्रामध्येही झालेच तर अगदी किरकोळ बदल होतील; पण त्यावर आपल्याला अवलंबून राहता येणार नाही. आपण तळापासून पक्षउभारणीच्या कामाला लागलं पाहिजे.

'Within five years Bharatiya Janata Party will emerge as a national alternative.' सभेतल्या भाष-णाचा उच्चबिंदु गाठल्याप्रमाणं अटलजी गरजले.

आजही त्यांना पुन्हा हॉस्पिटलमध्ये तपासणीसाठी जायचं होतं त्यामुळं इतर थोड्या गप्पा मारून आम्ही उठलो. इतका वेळ आजूबाजूला लोळत पडलेली कुत्री टुण-कन उड्या मारून पळायला लागली. अटलजी त्यांच्याशी काही तरी लाडंलाडं बोलत होते. एका राष्ट्रीय पातळीवरच्या प्रतिभावान नेत्याचं ते रूप विलोभनीय होतं.

¤

अटलजींकडून तृप्त होऊन निघालो, तेव्हा साडेसहा वाजायला आले होते. बाबूजींकडे सात वाजता बोलावलं होतं. अर्धा तास घालवायचा कुठं ? या परिसरात एखादं बरं हॉटेलही दिसत नव्हतं. सरळ चालायला लागलो. काही अंतर चालून गेल्यावर राष्ट्रपतीभवनाकडे जाणारा रस्ता आडवा आला. या चौकाच्या थोडं अलीकडे एक सुंदर 'इव्हनिंग स्पॉट' आहे. दिल्लीतले मसालेदार पदार्थ, चहा-कॉफी, थंड पेयं सगळं मिळतं. उघड्यावरच टेबल-खुर्च्या टाकलेल्या आणि शेजारी पाण्याचा लांब-लचक सुंदर तलाव. त्यामध्ये नावा सोडलेल्या. कोणीही बसावं आणि वल्हवत वल्हवत चंद्रकिरणांच्या प्रदेशात निघून जावं !

¤

बाबुजींकडे पोचलो तेव्हा सात वाजले होते पी. ए. नं बसायला सांगितलं होतं. बाबुजींकडे कोणी पाहुणे आलेले होते. जवळ-जवळ पाऊण तास बसलो. इतर फारशी कोणी माणसं येत-जात नसल्यामुळं करम-णूकही नव्हती. आता निघून जावं, असं वाटायला लागलं असतानाच पाहुणेमंडळी बाहेर पडली. मला आत बोलावण्यात आलं. खोलीचं दार लावलेलं होतं. वरून पडदा सोडलेला. जणू आतमध्ये सत्ता उलथवण्याचा कट शिजतो आहे ! पडदा बाजूला केला. दार उघडलं. आत गेलो. समोरच बाबुजी कोचावर बसले होते. फक्त डोक्यावर टोपी नव्हती. बाकी सगळा वेष नेहमीप्रमाणेच. अगदी जाकिटासह ! का कुणास ठाऊक, मला बाबुजींचा चेहरा केविलवाणा वाटला. ज्या माणसाला १९८० च्या जानेवारीपर्यंत जनतेच्या खांद्यावर नाचत राहण्याचं भाग्य लाभलं होतं तो आता संध्याकाळच्या वेळी कृष्ण मेनन रोडवरच्या एका बंगल्यात बसून जो येईल त्याला भेटत होता. त्याच्या पक्षांतराची संभावना विरोधक 'डॅम्सबिन फॉलिंग इन ए डस्बिन !' अशी करत होते आणि तरीही तो काहीही करू शकत नव्हता. दात-नखं काढून घेतलेल्या सिंहाप्रमाणे त्याची अवस्था झाली होती. 'you cannot fool all the people all the time,' या विधानाला तोही अपवाद ठरला नव्हता.

मी भेटीमागचा उद्देश सांगितला. बाबु-

जीनी सारं ऐकून घेतलं आणि शांतपणे सांगितलं, 'मी राजकीय विषयावर मुलाखती देण बंद केलं आहे!' आता याच्यासारख्या माणसाकडे राजकीय विषयावर बोलण्यासाठी यायचं नाही तर काय गोवधबंदी आणि भूदानयज्ञाबाबत प्रतिक्रिया विचारायला यायचं? पण मला फार आग्रह धरावासाच वाटलं नाही. मी सरळ उठून, दार उघडून, पडदा बाजूला सारून चालायला लागलो. स्कूटर न मिळाल्यामुळ बरंच अंतर चालावं लागलं. करौलबागेत येऊन पोचलो तेव्हा रात्रीचे नऊ वाजून गेले होते.

¤

मंगळवार, ता. १ जुलै. आज ११ वाजून दहा मिनिटांनी सुटणाऱ्या जम्मू-तावी-पुणे-झेलम एक्सप्रेसने दिल्ली सोडायची होती. बॅग रात्रीच आवरली होती. सकाळी फक्त खासदार लालकृष्ण अडवानींना फोन करायचा होता. नेहमीप्रमाणे पूना गेस्ट हाउसचा फोन बिघडलेला होता. दिल्लीतल्या फोनव्यवस्थेतल्या गलथानपणाचा अनुभव दिल्ली टेलिफोन एक्स्चेंजनं शेवटल्या दिवशीही न चुकता दिला. मग 'महाराष्ट्र टाइम्स' चे दिल्लीतले वार्ताहर अशोक जैन याच्याकडे गेलो. त्यांनी मस्त कडक कॉफी तयार केली होती. कॉफीचे घोट घेत-घेतच डायल फिरवली. –३८४३९७. स्वत: अडवानीच फोनवर होते. 'आता लगेच पंधरा मिनिटांत येत असाल तर या!' असं सांगितलं. आता स्कूटर दारात उभी असली तरी करौलबागेतून पढारापार्कपर्यंत जायला किमान वीस मिनिटं लागतात; पण मी 'येतो' म्हटलं. श्री. जैन याचे गेले आठ दिवस त्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल घाईघाईनंच आभार मानले आणि चपलेत पाय अडकवत जवळजवळ पळतच निघालो.

अडवानींच्या घरी पोचलो तेव्हा नऊला जेमतेम पाच मिनिटं उरली होती. ते वाटच पहात होते. एका लहानशा हॉलमध्ये बोलायला सुरुवात झाली.

'लोकसभेच्या निवडणुकीच्या वेळी इंदिराजींनी दोन आश्वासन दिली होती. एक म्हणजे महागाई रोखली जाईल आणि दुसरं म्हणजे कायदा व सुव्यवस्था सुधारण्यात येईल. या दोन्ही आघाडयावर गेल्या सहा महिन्यात इंदिराजी अयशस्वी ठरल्या आहेत. किमतींनी उच्चांक गाठला आहे आणि कायदा व सुव्यवस्थाही पूर्णपणे हाताबाहेर गेली आहे!

'इंदिराजी काही विशिष्ट धोरण आखून त्यानुसार शासन चालवत आहेत असं वाटत नाही. प्रस्थापित मूल्यं आणि संस्थाचं महत्त्व कमी करून राजकीय तसंच प्रशासकीय सर्वमान्य संकेत दाबून टाकण्याचा मात्र पद्धतशीर प्रयत्न चालू आहे. याचा एकच परिणाम आहे-लोकसभा, न्यायालय आणि वृत्तपत्रक्षेत्र या तिन्ही सस्थाच मनोधैर्य खचलं आहे आणि अवमूल्यनही झाल आहे.

'संजयच्या निधनामुळ इंदिराजीमध्ये काही चांगला बदल घडून येईल अशी मी आशा करतो; पण त्याबद्दल हमी देता येणार नाही. त्यासाठी काही काळ वाटच पाहिली पाहिजे!

'भारतीय जनता पक्षाचा जन्म होऊन तीन महिने सुद्धा झालेले नाहीत. या काळात पक्षानं अपेक्षेइतक काम केलेलं नाही; पण इतर विरोधी पक्षांच्या मानानं आमची स्थिती बरी आहे. आज आम्हाला फक्त स्वत.चा पक्षच बांधायचा नाही तर सामान्य जनतेमध्ये असा विश्वास निर्माण करायचा आहे की, या देशातले एकजात सर्व राजकारणी सत्तेच्या तुकडयासाठी आसुसलेले नाहीत. इथं अजूनही असे काही राजकारणी आहेत की जे काही विशिष्ट हेतूनं, ध्येयान प्रेरित होऊन निरपेक्षपणे काम करत आहेत.

'भारताच राजकीय भवितव्य फक्त एक मनुष्य काय करतो किंवा करत नाही यावर अवलंबून असावं हे दुर्दैव आहे. इंदिराजी यापुढील काळात कशा जरी वागल्या तरी त्याचा परिणाम फक्त त्यांच्याच पक्षावर होणार आहे. आम्हाला आमचा कार्यक्रम आणि कृती स्वतंत्रपणेच आखून अमलात आणायची आहे. अर्थात हे करत असताना जी काही परिस्थिती अनपेक्षितपणे उद्भवेल तिला तोड द्यावच लागेल; पण म्हणून दुसरा पक्ष काय करत आहे किंवा काय करेल यावर आपले हिशेब आधारित करण योग्य होणार नाही. अशा कार्यात 'शॉर्ट-कटस्' असूच शकत नाहीत.

'भारतीय राजकारणावर काँग्रेस पक्षाची पकड स्वातंत्र्य-चळवळीपासूनच आहे. याउलट इथं विरोधी पक्ष मात्र स्वातंत्र्यानंतरच निर्माण झाले. १९६७ साली या पक्षाचा प्रभाव काही प्रमाणात प्रथम जाणवला १९७७ साली मात्र मुख्यत्वे आणीबाणीतील अत्याचारांच्या पार्श्वभूमीवरच आम्ही दैदीप्यमान यश मिळवलं. अशी परिस्थिती पुन्हाही निर्माण होईल; पण दरम्यानच्या काळात विरोधकांनी स्वत:ची शक्ती मात्र वाढवून ठेवली पाहिजे!'

इंदिरा काँग्रेसचे खासदार शिवराज पाटील यांच्याप्रमाणेच अडवानीही सथपणे विचार करत करत बोलत होते. बोलताना त्यांची दृष्टी सतत जमिनीकडे वळलेली असायची. वाजपेयींची प्रतिभा त्यांच्याजवळ नसेलही कदाचित; पण त्यांच्यामध्ये कुठे तरी जबरदस्त व्यवहारीपणा जाणवत होता.

अडवानींकडून निघालो तेव्हा साडेनऊ व्हायला आले होते. अजून रूमवर जाऊन आठ दिवसांचं बिल भरून, बॅग उचलायची होती. समोर एक स्कूटर येऊन उभी राहिली. क्षणाचाही विलंब न लावता आत घुसलो. पूना गेस्ट हाउसवर गेलो. गेस्ट हाउसच्या श्री. कुलकर्णी यानी अचानक जाऊनही उत्तम सोय केली होती. त्यांचे आभार मानून बाहेर पडलो. रेल्वेस्टेशनवर 'झेलम' दहा मिनिटं लेट होती. नाश्ता उरकला. गाडी आली. दहा मिनिटं उशीरा सुटली. आठ दिवस केलेल्या भ्रमंतीनंतर प्रथमच जरा निवांतपणा मिळाला. डोक्यामध्ये अनेक चक्रं सुरू झाली.

¤


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य या मूलभूत मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना विचार करायला लावणारी प्रभावी जीवनकथा

मॅक्झिम गॉर्की

सुमती देवस्थळे

मूल्य वहा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

# नव्या वाटांच्या शोधात....

संजयच्या अंत्यसंस्कारांचं वर्णन करताना 'लंडन टाइम्स'च्या वार्ताहरानं लिहिलं होतं, 'The funeral was plain and brief, still it was a prince's funeral.' त्याचं वर्णन शब्दश: खरं होतं; पण आता राजपुत्राचा अकाली अस्त झाल्यावर गादीला वारस कोण? २४ जूनच्याच 'टाइम्स'च्या अंकात म्हटलं होतं–End of a Dynasty. गेल्याच महिन्यात भारताचा भावी पंतप्रधान असं ज्याच्याविषयी भाकित केलं होतं त्याच्याचविषयी आता असं म्हणावं लागलं होतं. लेखात म्हटलं होतं–

'संजय गांधीचा मृत्यू म्हणजे एका राजेशाहीचा मृत्यू आहे आणि याचे भारतीय राजकारणावर फार प्रभावी पडसाद उमटतील!

'या घटनेचा एक दूरगामी परिणाम म्हणजे इथून पुढील काळात भारतात घराण्याची सत्ता अस्तित्वात राहणार नाही. राजकारणातील इतर स्पर्धकांनाही आता सत्तेचं क्षेत्र खुलं झालेलं आहे.

'त्याचबरोबर काही लगेचच घडून येणाऱ्या परिणामाचाही विचार केला पाहिजे. श्री संजय गांधी हे भारतीय राजकारणातील नव्या पिढीचे मुख्य सूत्रधार होते त्यामुळं त्यांचं बोट धरून गेल्या जानेवारीत अनेक तरुणानी संसदगृहात प्रवेश केला आहे. या नव्या गटापुढं कोणताही आदर्श नाही. लोकशाहीशीही त्यांची बांधिलकी नाही. त्यांच्यामध्ये धदेवाईकपणा जास्त आहे आणि आधुनिकीकरणाचा त्यांना हव्यास आहे.

'आता त्याच्यापुढं कोणतंही नेतृत्व नाही आणि अशा परिस्थितीत दिल्लीच्या राजकारणात अनेक वर्षं मुरलेल्या राजकारण्यांसमोर ते कितपत टिकाव धरू शकतील याची शंका आहे.'

संजय गाधीच्या अनुयायाची सध्याची मनस्थिती 'टाइम्स'नं अचूक पकडली आहे. त्यानी इदिराजीवर फारसं भाष्य केलेलं नाही; पण इंदिराजीची सध्याची मानसिक स्थिती हा सर्वांच्याच कुतूहलाचा विषय आहे

एका इंदिरा कॉंग्रेसच्या खासदारानं इंदिराजीच्या वैयक्तिक जीवनाची तुलना छत्रपती शिवाजीमहाराजाच्या जीवनाशी केली. दोघानीही राजकीय यश भरपूर मिळवलं; पण ज्या ज्या वेळी त्यांनी काही मोठी कामगिरी केली त्या त्या वेळी दोघांच्याही वैयक्तिक जीवनात काही ना काही आघात होत राहिले. शिवाजीमहाराजाचे पिताजी, बंधू व पत्नी महाराज ज्या वेळी मर्दुमकी गाजवत होते त्याच काळात गेले! महाराजांना राज्याभिषेक झाला आणि काही दिवसांतच जिजाबाईंचं निधन झालं. इंदिराजीच्या जीवनातही असंच होत राह्यलं आहे. त्याचे पती व पिता अशाच तऱ्हेनं इंदिराजी यशाचे एकेक टप्पे गाठत असतानाच निधन पावले! एका प्रचंड गर्तेतून वर येऊन आता इंदिराजी पुन्हा दिमाखानं उभ्या राहात आहेत तोच पुत्रवियोगाचा धक्का त्याना सहन करावा लागला आहे!

संजयच्या निधनामुळं पोटचा मुलगा तसंच एकमेव विश्वासू सहकारी गमावल्याचं दुहेरी दु:ख इंदिराजीना झालं असणार आणि ते स्वाभाविकच आहे; पण याच घटनेनं भारतीय राजकारणाला फार मोठं नाट्यमय वळण दिलं आहे. इंदिराजीची सर्वंकष सत्ता आणि 'सीदन्ति मम गात्राणि मुखं च परिशुष्यति!' या अवस्थेला पोचलेले विरोधक यांच्या कात्रीत भारतातला सामान्य मतदार सापडला होता; पण संजयच्या निधनामुळं सर्वच विरोधी पक्षाच्या नेत्यामध्ये आणि कार्यकर्त्यांमध्ये नवी उभारी निर्माण होत आहे असं अनेकांशी बोलताना जाणवलं. एका विरोधी पक्षाच्या खासदारानं यामागचं मानसशास्त्र फार चागल्या तऱ्हेनं उलगडून दाखवलं. तो म्हणाला–'आता माझं वय पन्नास-पंचावन्न वर्षांचं. मी इंदिराजीशी एकदा नाही, दहा वेळा सामना देईन! कारण माझ्यामध्ये तेवढा जोम अजूनही शिल्लक आहे; पण मी इंदिराजीशी लढायचं; त्यात जर यशस्वी झालो तर ठीक, अयशस्वी झालो तर त्या आपणहून बाजूला होण्याची असहायपणे वाट पहात बसायचं. त्यानंतरही पुन्हा माझ्या हातात फारसं काही करण्यासारखं नाहीच. कारण बेटा विंगमध्ये ढाल–तलवार घेऊन आणि डोक्यावर मुकुट चढवून सज्ज आहेच! मनुष्य साधारणत: स्वतःच्या आयुष्यापुरतं पहात असतो. फार तर त्यापलीकडे पाच-दहा वर्षं; पण मी माझं आयुष्य झुजत घालवायचंच आणि तरीही, माझ्या मृत्यूनंतरदेखील माझं स्वप्न साकार होण्याची काहीच शक्यता नाही, हा विचार मन अधिक खच्ची करणारा असतो आम्हा विरोधकाची गेल्या चार-सहा महिन्यात मानसिक स्थिती अशी व्हायला लागली होती. शेवटी समाजसेवेचा किती जरी डांगोरा पिटला तरी आपल्याला हवी तशी समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी सत्तेचं पाठबळ हवंच ते तसं न मिळण्याचीच शक्यता वाढायला लागली की मनुष्य नैराश्यानं ग्रासला जातो. आमची त्या दिशेनं वाटचाल सुरू झाली होती संजयच्या मृत्यूमुळं काळाची ही रुंदावलेली चौकट पुन्हा जाग्यावर आली' काही विरोधी पक्षनेत्यांनी हे जरी उघड उघड बोलून दाखवल नाही तरी त्यांच्या बोलण्यातून ते प्रतिबिंबित होत होतं.

पंडित जवाहरलाल नेहरूंच्या काळापासून दिल्लीच्या राजकारणात मुरलेल्या व गेली तीन वर्षं इदिराजीशी एकाकीपणानं लढत देणाऱ्या एका ज्येष्ठ विरोधी पक्षनेत्याशी चर्चा झाली तेव्हा इंदिराजीच्या पुढील हालचालींबद्दल ते म्हणाले–

'सुरुवातीला स्वत:च्या कुटुंबियापैकीच कोणाला तरी संजयप्रमाणे हाताशी धरून पुढं आणण्याची इंदिराजी खटपट करतील. ते जर त्याना जमलं तर पुन्हा घराण्याच्या राजवटीला प्रारंभ होईल; पण जर जमल नाही तर पक्षातलेच काही जुने लोक बंड करून उठण्याची शक्यता आहे. अर्थात या संदर्भात काही प्रत्यक्ष कृती घडण्यास अजून किमान चार सहा महिने तरी जावे लागतील; परंतु काहीही जरी झालं तरी इंदिराजीच्या तंत्रामध्ये बदल घडून येण्याची शक्यता मला दिसत नाही. त्यांच्या मन्त्रिमंडळात दोन-तीन

लायक माणसं आहेत; पण त्यांना राजकीय उंची आणि व्यक्तिमत्त्व नाही. त्यामुळं सर्व खेळ इंदिराजींभोवतीच केंद्रित झालेला असेल!'

विरोधकांमध्ये निर्माण झालेला आत्मविश्वास आणि आशावाद अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण सत्तेवर कोणीही असो, विरोधक जर गलितगात्र झाले असतील तर त्या ठिकाणी लोकशाहीला भगदाड पडण्याची शक्यता असते. १९७७ सालीही हीच परिस्थिती होती. फक्त वाकांवरची माणसं वेगळी होती आणि त्याही वेळी पक्षीय राजकारणापेक्षा थोडं वरच्या पातळीवर जाऊन विचार करणाऱ्यांनाही लोकशाहीच्या निरोगीपणाची चिंता लागली होतीच.

आता विरोधक नव्या दमानं, नव्या वाटा शोधू लागले आहेत. आम्ही परस्परांवर हल्ले न करता किमान कार्यक्रमांवर एकत्र आलं पाहिजे, परस्परांशी सहकार्य केलं पाहिजे, आम्ही मुळापासून पक्षबांधणी केली पाहिजे, आम्ही पाच वर्षांत देशातील जनतेला नवा राष्ट्रीय पर्याय देऊ, १९७७ सालची पुनरावृत्ती घडणारच नाही असं नाही—आम्हाला तयारी ठेवली पाहिजे—हे या विरोधकांचे उद्गार त्या दृष्टीनं पुरेसे आहेत. अजून त्यांना नव्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर व्यूह कसा रचावा याचा अंदाज आलेला नाही; पण किमान त्या दृष्टीनं हालचालींना तरी सुरुवात झालेली आहे.

जानेवारीतल्या लोकसभा निवडणुकीनंतर आपण पुन्हा १९७२ सालावर जाऊन पोचलो होतो. संजयच्या निधनानं ही दरी पुन्हा मिटवून टाकली आहे. एका अत्यंत नाट्यपूर्ण पण मानवी जीवनाच्या दृष्टीनं शोकान्त असलेल्या या घटनेमुळं आपण पुन्हा १९८० सालच्या जुलैपाशीच येऊन थांबलो आहोत. पुढली वळणं कशी असतील याचा प्रत्येकजण अंदाज घेत आहे. गाडीच्या काचेला काळे पडदे लावलेले आहेत. काही द्रष्टे त्यातूनही आरपार पाहण्याचा प्रयत्न करत आहेत. काहीही न दिसणाऱ्यांच्या मनात सुद्धा दिंडी मुक्कामाला पोचेल असा भरवसा नव्यानं निर्माण झाला आहे. एक राजपुत्र स्वतःबरोबरच स्वतःच्या घराण्याची वारसदारीची गादीही घेऊन गेला आहे. ती गादी पुन्हा निर्माण करण्यासाठी आतापर्यंत घेतले होते त्यापेक्षा किती तरी जास्त कष्ट घ्यावे लागतील. कारण विरोधकांच्या डोळ्यांवरची भूल आता दूर झाली आहे. कायद्याला पायदळी तुडवू पाहणाऱ्यानंच कायद्याचं राज्य पुन्हा निर्माण होईल असा अंकुर फुलवला आहे. □


# शहरकरी - गावकरी यांच्या सहभागाची वैशिष्ट्यपूर्ण कथा

माणूस

२६ जुलै किसान कामगार विशेषांक

किंमत: तीन रुपये

मुंबईच्या झोपडपट्ट्यात हलाखीचे जीवन जगणाऱ्या शेकडो कामगार कुटुंबांना, ज्यांनी पुन्हा 'किसान' बनण्याची ताकद दिली, त्यांची कथा सादर करणारा अंक...

• साप्ताहिक माणूस •
१०२५, सदाशिव, पुणे ४११०३०.

यापुढील अंक

# गेल्या वर्षीप्रमाणे याही वर्षी प्रकाशित होत आहे.

प्रसिद्धी : २६ जुलै । मूल्य : तीन रुपये